श्रीगणेशदत्तगुरुभ्योनमः

# दसरा

दर वर्षी दस-याला श्री महाराजांना सोने द्यायला जायची प्रथा १९७९ सालपासून सुरु झाली होती. नवरात्रात महाराजांच्याकडे मोठा उत्सव असतो. ते स्वतः श्रीदुर्गासप्तशतीचे पाठ करीत प्रकृतीने झेपले तो पर्यंत स्वतः आरत्या करीत. उदंड अन्नदान होत असे. सर्वात शेवटी ते प्रसाद घेत.

१९८४ नंतर बरेच वेळा सौ ताईमहाराजही तिथे आवर्जून मुक्कामाला जात. महाराज त्यांच्याकडे प्रसंगानुसार साक्षात भगवती रेणुकामाता, तुळजाभवानी म्हणून पहात. नवरात्राच्या पहिल्या दिवशी घटस्थापनेच्या वेळी ते अत्यंत आदर श्रद्धा भक्तिपूर्वक ताईच्याकडे जाऊन त्यांना प्रार्थना करीत की त्यांनी आता त्यांचे स्थान ग्रहण करावे. आणि मग पूजेला आरंभ करीत. संध्याकाळी किंवा रात्री त्यांचे कुटुंबीय कुलपरंपरेने चालत आलेली पदे भक्ति गीते वगैरे म्हणत.

एकदा असेच सहज बोलताना महाराज म्हणाले होते, संकुचित ममता हा दोष आहे पण व्यापक ममता हा गुण आहे.

दस-याच्या दिवशी सौ आईसाहेब सर्व कुटुंबीय, आप्तेष्टांना कुलपरंपरेप्रमाणे संध्याकाळी औक्षण करीत. एकदा म्हसवडकरांबरोबर नेहमीप्रमाणे महाराजांच्या दर्शनाला आणि सोने देण्याकरता संध्याकाळी

गेलो. महाराजांचे घर म्हणजे भरले गोकुळ ! घरची बाहेरची खूप मंडळी जमली होती. आम्ही कसे तरी वाट काढत महाराजांच्या खोलीत गेलो दर्शन घेऊन सोने दिले आणि गर्दी पाहून पटकन आल्या पावली निघायचे म्हणून बाहेर आलो. महाराजांच्या खोलीत जाताना पाहिले होते की आईसाहेब देवासमोर समोर औक्षणाचे तबक घेऊन बसल्या आहेत आणि कांही आप्तेष्ट शोकेस जवळ टाकलेल्या चटईवर बसले आहेत औक्षणाकरता. आता अशा वेळी आईसाहेबांशी बोलायचा आग्रह धरणे प्रशस्त वाटले नाही म्हणून बाहेर पडण्याकरता अंगणाकडे आलो. पुढच्या अंगणाच्या जवळच्या हॉलमध्ये ताई बसल्या होत्या. हॉलही गर्दीने भरला होता. पटकन ताईंना नमस्कार करुन बाहेर पडणार एवढ्यात ताईंनी विचारले, ''आईसाहेबांना भेटलात की नाही ?'' न भेटण्याचे खरे कारण सांगितले. त्यावर त्या म्हणाल्या, ''तसे करु नका त्यांना वाईट वाटेल. जाऊन नमस्कार करा आणि जा''

त्यांची आज्ञा पालन करण्याकरता गर्दीतून वाट काढत देवाच्या हॉलमध्ये आलो आणि आईसाहेबांना नमस्कार केला आणि परत फिरणार एवढ्यात त्या म्हणाल्या, ''चाललात कुठे ? बसा समोर'' आणि त्यांनी आप्तेष्टांपूर्वी आम्हा दोघांना औक्षण केले. आम्हाला संकोचल्यासारखे झाले पण त्याच वेळी मन भरुन आले. महाराजांचे वर उधृत केलेले शब्द आठवले,

*संकुचित ममता हा दोष आहे पण व्यापक ममता हा गुण आहे.*

आपलं कोणी नाही या जगात हे तत्वज्ञान सांगते पण त्याच वेळी एका भूमिकेतून सगळेच आपले आहेत असेही मानून इतरांशी प्रेमाने वागायचे असते. ज्या महाराजांनी रोज आजन्म ''दत्ता मजला प्रसन्न होसी -----''

अभंगातले "अनासक्तीने मी वागावे" असे वरदान मागितले त्यांनी गुरुंच्या अवतार कार्यात प्रत्येकावर इतके अलोट प्रेम केले की त्यांच्या संपर्कात आलेल्या प्रत्येकाला वाटायचे महाराजांचे माझ्यावर प्रेम आहे आणि महाराज माझेच आहेत.

व्यापक ममता हा गुण आहे हे त्यांनी त्यांच्या जीवनांत उतरवून दाखवले होते.

ππππ ππππ

## प्रत्येकाच्यात परमेश्वर

श्रीरामकृष्ण परमहंसांचे प्रेमानंद नांवाचे अंतरंग भक्त होते. ते जेव्हां सुरवातीला ठाकूरांकडे आले तेव्हां त्यांची पूर्व संचित लक्षात घेऊन ठाकूरांनी त्यांना विचारले, "तुला कोणत्या देवतेचे दर्शन – गणपती, शंकर, राम वगैरे – घेण्याची इच्छा आहे ?"

प्रेमानंदांनी विनम्रपणे सांगितले, "ठाकूर ! मला प्रत्येक जीवात परमेश्वर दिसेल असा आशीर्वाद द्या"

एकदा मुंबईच्या नीलाताईबरोबर महाराजांच्या दर्शनाला जाणे झाले. वेळ रात्रीची होती. महाराज निवांतपणे त्यांच्या खोलीत कांही वाचन करीत बसले होते. समोर गेल्यावर नीलाताई अतिशय भावनाविवश होऊन म्हणाल्या, "महाराज ! आम्ही आपल्यात परमेश्वर बघतो हो"

महाराज गोड हंसत म्हणाले, ''नीलाताई, आम्हीही प्रत्येकाच्यात परमेश्वरच पहातो हो''

ππππππ

## श्रीपादवल्लभांच्या आईने अतिथीला आधी अन्न दिले

श्री महाराजांच्या संपर्कात आल्यापासून देऊळगांवराजाबददल खूप ऐकून होतो. महाराज अधून मधून तिथे जात असत. तिथे श्री बालाजी महाराजांचे स्थान आहे. त्यांना उत्तरेतला बालाजी समजतात. एखाद्याने दक्षिणेतल्या तिरुपती बालाजीला नवस केला आणि त्याला तो फेडायला तिथे जायला मिळाले नाही तर तो देऊळगांवराजाला येऊन फेडता येतो. ईशकृपासंपन्न कवीश्वर घराण्याकडे बालाजीमहाराजांची मोठी मानाची पुराण सेवा आहे. प पू श्री वक्रतुंड महाराज देऊळगांवराजाला आले. तो पर्यंत श्री बालाजी महाराजांचे तसेच देऊळगांवराजाचे महात्म्य फक्त परंपरागत ऐकून पंच क्रोशीतल्या लोकांना माहीत होते. लिखित स्वरुपात कांहीच उपलब्ध नव्हते. श्री वक्रतुंड महाराजांनी भक्तिरसपूर्ण ''देऊळगांव महात्म्य'' नांवाचा ग्रंथ लिहिला.

दसरा तिथला मोटा उत्सव असतो. तिथल्या मंदिरासमोरच्या मुख्य रस्त्यावर उंच लाकडी खांबांवर भव्य तंबू उभा केलेला असतो. त्या खांबांना

लाटा म्हणतात. दस-याच्या दिवशी त्या लाटा आपोआप पडतात पण त्यांच्या खाली कोणी चिरडले जात नाही हेच त्याचे वैशिष्ट्य आहे. हे पहाण्याकरता असंख्य लोक आवर्जुन जातात. श्री महाराजही जात असत.

विदर्भात श्री वक्रतुंड महाराजांपासून चालत आलेली कुलगुरु परंपरा आजही चालू आहे. त्या भागात सर्व समाजातील हजारो कुटुंबे आहेत ज्यांना वक्रतुंड महाराजांनंतर धुंडिराज महाराज व त्यांच्या नंतर महाराजांचा मंत्रानुग्रह आहे.

देऊळगांवराजाच्या राजांकडून कवीश्वरांची दर वर्षी यथोचित संभावना होते.

या स्थानाच्या जागृतीचे महात्म्य वर्णन करताना श्री महाराजांनी पाहिलेला एक प्रसंग सांगितला होता. एका व्यापा-याचा मुलगा आजारी पडला. तो कांही केल्या बरा होईना. तो बालाजीमहाराजांचा भक्त होता. त्याने नवस केला की मुलगा बरा झाला तर मुलाला दर्शनाला आणून ५०० रु अर्पण करीन. त्याप्रमाणे मुलगा बरा झाला. तो गृहस्थ मुलाला घेऊन देऊळगांवराजाला आला. ५०० रु देवाला कबूल केलेले देताना मात्र त्याच्यातला व्यापारी जागा झाला आणि त्याने जायचा यायचा खर्च वजा करुन पैसे दान पेटीत टाकले. पण तसे करताच तिथल्या तिथेच मंदिरात त्या मुलाला ताप भरला.

याने देवाला मनोमन विचारले, असे कसे झाले ? आणि त्याची जरा तंद्री लागली. देव म्हणाले, तूं जी वजावट केलीस ना नवसाच्या रकमेतून त्याचा हा ताप आला आहे. तो हिशोब झाला की ताप जाईल.

त्याप्रमाणे पुढे तो मुलगा बरा झाला वगैरे

या निमित्ताने महाराज म्हणतात, तो व्यापारी हिशोबी जरी असला तरी पुण्यावान म्हटला पाहिजे कारण त्याची चूक झाल्यावर देवाने त्याला तसे सांगितले. आपल्या हातून अशा किती चुका होती देव थोडाच आपल्याला येऊन सांगतो ?

इथे श्रीगुरुचरित्रातील पीठापूरप्रमाणे एक प्रसंग घडला. आमच्या आईसाहेबांनी सुमतीची भूमिका केली. एके वर्षी देऊळगांवराजात प पू श्री धुंडिराज महाराजांच्या पुण्यतिथीचा प्रसाद घ्यायचा योग आला. तिथला प्रसाद भंडारा काय असतो, तो कधी होतो वगैरे कांहीच कल्पना नव्हती. तिथे जायची पहिलीच वेळ होती.

पुण्यतिथीच्या दिवशी अक्षरश: हजारो लोक जमले होते. संस्थानतर्फे होणा-या भंडा-याच्या पंगती मंदिरासमोरच्या मुख्य रस्त्यात बसतात. या करता सर्व रस्ते धुवून स्वच्छ केलेले असतात. त्या शिवाय गांवाबाहेर भंडारा होतो तो वेगळाच. हे सर्व पाहून आवाकच व्हायला होते. गंमत म्हणजे भंडा-याला सुरवात संध्याकाळी ५ वा होणार होती हे माहीत नव्हते. पण इतक्या गडबडीत आईसाहेब अतिथींबददल जागृक होत्या. त्यांच्या लक्षात आले की आम्हाला भंडारा उशीरा सुरु होणार आहे याची कल्पना नाही आणि मुंबईकरांना रोज ऑफिसमध्ये जाताना नाश्ता किंवा जेवण करुन जायची संवय तेव्हां आम्हाला संध्याकाळपर्यंत उपाशी राहावे लागेल. एवढा सगळा विचार करुन या सुमतीने ११ च्या सुमारास त्यांच्या (देऊळगांवराजातल्या ) घरात श्राद्ध चालू असतानाही आम्हाला मागच्या

खोलीत बोलावले आणि म्हणाल्या, ''तुम्हाला इतका वेळ जेवणावाचून राहाण्याची संवय नाही तेव्हां तुम्ही आधी जेवून घ्या'' आणि आम्ही जेवण केले.

श्रीगुरुचरित्र आजही घडते आहे.

ππππ ππππ

## ही ट्रिप आहे

प पू श्री महाराजांबरोबर गुजरात दौ-यावर असताना तसं पहायला गेलं तर तीर्थक्षेत्रांनाच भेटी होत्या, देवदर्शन होते तेव्हां सहज बोलण्याच्या ओघांत तीर्थ यात्रा हा शब्द येत होता. महाराज हंसत हंसत म्हणाले, ''ही ट्रिप आहे.'' बरोबरचे सगळे जण याला तीर्थ यात्राच समजत होते. म्हणून त्यांना जिज्ञासेने विचारले ''मग तीर्थ यात्रा कशाला म्हणतात ?'' त्यांनी लगेच सांगितले, ''महाभारतात त्याचा उल्लेख आहे. वनवासात असताना पांडवांनी तीर्थ यात्रा कशा केल्या, तीर्थ यात्रा म्हणजे काय, त्याचे काय नियम आहेत, वगैरे सगळी माहीती त्यात दिलेली आहे''

ππππ ππππ

## आम्ही दर वर्षी श्राद्ध पक्ष करतो

प प श्रीवासुदेवानंद सरस्वती पूर्वाश्रमात माणगांवमध्ये राहात असताना योग्यतेनुसार कोणा कोणाला योगाभ्यास सांगत. त्यांच्या विव्दत्तेची ख्याती सर्वत्र पसरत चालली होती. मुंबईचे एक वैदिक शास्त्री खास

महाराजांबरोबर वादविवाद करुन नामोहरम करण्याकरता माणगांवला आले. त्यांना आपल्या वेदाभ्यासाचा खूप अभिमान (?) होता आणि महाराजांची भेट घेऊन ते महाराजांना म्हणाले, तुम्ही सगळयांना योगाभ्यास कसा सांगता ? वेदांमध्ये तर त्याचा कुटेच उल्लेख नाही. इ

महाराज शास्त्रीबुवांचा अपमान करायचा नाही म्हणून स्वतःची योग्यता त्यांच्यापेक्षा जास्त असतानासुद्धा अत्यंत विनम्रपणे म्हणाले, शास्त्री महाशय आपला वेदांचा शास्त्राचा सखोल अभ्यास आहे मला तर शास्त्राची कांहीच माहीती नाही त्यामुळे मी आपल्याशी कांहीच चर्चा करु शकत नाही.

शास्त्रीबुवांचे समाधान झाले. त्यांना तेच हवे होते महाराजांना वादात हरवल्याचे भ्रामक समाधान पाहिजे होते ते त्यांना मिळाल्यावर मुंबईला जाण्याकरता ते वेंगुर्ले बंदरावर बोट पकडण्याकरता गेले. तिथे त्यांना एक साधू भेटला आणि त्याने शास्त्रीबुवांशी आपणहोऊन वैदिक वाङमयाचा विषय काढला आणि वेदांतमध्ये योगाचा उल्लेख कुटे आहे ते दाखवून दिले. शास्त्रीबुवांचा आपल्याला पूर्ण वैदिक ज्ञान असल्याचा गर्व नाहीसा झाला. आणि ते महाराजांची क्षमा मागण्याकरता परत माणगांवला आले.

सर्व वृत्तांत सांगितला. महाराजांनी शास्त्रीबुवांची कशी जिरली हा असुरी आनंद न घेता एवढेच म्हटले, ''शास्त्रीबुवा ते जाऊं द्या पण तुम्ही त्या साधूचे पाय धरायचे विसरलात. तो साधू कोण होता असे वाटते तुम्हाला ? ते साक्षात् दत्तप्रभु होते !''

१९८३ साली श्री महाराजांच्याबरोबर कांही मुंबईकरांना काशीला जायचा योग आला. तिथल्या मुक्कामात अखिल भारतीय ब्रम्हवृंद संघाच्या स्थानिक प्रमुख ब्राम्हणाने सर्वांना सांगितले, अमूक अमूक रक्कम खर्च करुन इथे एकदाच श्राद्ध करा म्हणजे परत कधीही तुम्हाला श्राद्ध पक्ष करायची गरज नाही. आजही अशा स्थानात हे सांगितले जाते.

नंतर न राहवून महाराजांना सत्य काय विचारल्यावर कोणत्याही वादात न पडता ते एवढेच म्हणाले, आम्ही दर वर्षी श्राद्ध पक्ष करतो. (वास्तविक ते या पूर्वी तीन वेळा काशीला येऊन सर्व क्षेत्रस्थ विधी करुन गेले होते)

वास्तविक त्या ब्राम्हणाला महाराजांची योग्यता माहीत होती. असो. वास्तविक महाराजांना त्याला उलटा सुलटा करता आला असता पण नाही. विद्या विनयेन शोभते.

धारवाडला जगद्गुरु शंकराचार्य पाटशाळेत असे ऐकायला मिळाले की महाराज अनेक शास्त्रीय ग्रंथ शेवटपासून सुरवातीपर्यंत उलट म्हणू शकत होते. तसेच कोणत्या पानावरील मजकूर तिरका खालून वर वाचत.

त्यांनी निमंत्रण आले म्हणून विव्दत सभा प्रसंगाने जिंकल्या पण वादविवाद केले नाहीत.

# सहज बोलणे हाची उपदेश

वाडीत असताना कामतांच्या संशोधीत प्रतीवरुन पारायण झाले तेव्हां बरोबरच्या एका गुरुबंधूंनी महाराजांना सांगितले की वाडीतले पुजारी कामतांनी संशोधित केलेली श्रीगुरुचरित्राची प्रत मानत नाहीत वगैरे. त्यांनी

सांगितले, तुमचे शाळेत संस्कृत होते. तुम्ही सप्तश्लोकी वाचत जा. महिन्याचे पारायण करावे. रोज साधारण २५० ओव्या वाचाव्यात फक्त २०-२१ व ३०-३१-३२ अध्याय एकत्र वाचावेत.

कोणत्याही वादात ते पडले नाहीत किंवा मतभेद वाढवले नाहीत.

वाडीला तीर्थ स्नान करण्याकरता सर्व प्रथम घाटावर गेल्यावर महाराज साष्टांग नमस्कार घालीत आणि मग शास्त्राप्रमाणे कृष्णामाईला वंदन करुन मग स्नानाला उतरत.

वेरावळला गेल्यावर समुद्रदर्शन झाल्यावरही त्यांनी साष्टांग नमस्कार घातला आणि मग स्नान केले. त्या वेळी सहज सांगून गेले – "तुम्हाला बरं आहे. तुम्ही समुद्र किना-यावरच राहाता तुम्हाला समुद्र स्नान नेहमी घडू शकते. समुद्राला सर्व तीर्थाचा राजा म्हणतात (कारण सर्व नद्या शेवटी समुद्रालाच येऊन मिळतात. )

प पू श्री गोंदवलेकर महाराजांच्या एका भक्ताने असे म्हटले आहे की देव आहे असे सगळेच म्हणतात पण देव आहेच अशी भावना सर्वांची नसते.

वाडीला प्रथम गेल्यावर महाराज देवाकडे गेलेत समजले म्हणून थेट देवाकडे गेलो. महाराज उत्तर व्दाराजवळ उभे होते. त्यांना पाहिल्यावर सहाजिकच कधी एकदा जाऊन पाया पडतो असे झाले. तसे नमस्कार करायला जाताच त्यांनी रोखत म्हटले, अहो, हे काय करता !

म्हटलं, काय झालं महाराज ?

ते देवाकडे (पादुकांकडे) इशारा करीत म्हणाले, अहो, ते बसलेत ना तिथे !

म्हणजे त्या नुसत्या पाषाणाच्या पादुका नसून साक्षात दत्त प्रभु आहेत ही त्यांची ठाम श्रद्धा, निष्ठा होती.

म्हणजे दत्तप्रभुंच्या समोर आम्ही महाराजांना नमस्कार केला तर तो दत्तप्रभुंचा अवमान आहे अशी त्यांची भावना होती.

आम्हीही तशीच ठेवावी अशी त्यांची अपेक्षा होती.

वाडीवर त्यांचे नितांत प्रेम होते. वर्षातून दोन वेळा त्यांचा वाडीत मोठा मुक्काम असायचा. एकदा श्री नारायणस्वामींच्या उत्सवाला व नंतर गुरुव्दादशीच्या निमित्ताने. ते दिवस मोठे भारावलेले होते. त्यांच्या मुक्कामात प्रथम वाडीला जायचा प्रसंग आला तेव्हां एका अनुग्रहीताने त्यांना आधी विचारले, महाराज वाडीला गेल्यावर काय काय उपासना करावी ?

ते म्हणाले, काय काय? अहो तुम्ही जे कराल त्याला लक्षपट फळ आहे. थोडाही वेळ न घालवता जास्तीत जास्त उपासना, साधना, सेवा करा असे त्यांचे सांगणे होते. नंतर ठरले की महाराजांबरोबर पहाटेची काकडारती व्हायची. त्यानंतर ते मुक्कामाच्या ठिकाणी जाऊन त्यांचे आन्हिक करायचे. आन्हिक आटोपले की ते देव दर्शनाला येत. शक्य असतील तेवढ्या प्रदक्षिणा घालीत आणि परत मुक्कामावर जात. तो पर्यंत आम्हीही आमचे

वाचन वगैरे जे असेल ते उरकून तयार असू. महापूजेपर्यंत मग त्यांचे पत्रलेखन चाले. रोज आळी पाळीने महापूजा असायची आणि तो यजमान महाराजांबरोबर आम्हालाही प्रसादाला बोलवायचा त्यामुळे महाराजांच्या पंगतीचा लाभ व्हायचा. भोजनोत्तर विश्रांती घेऊन महाराज देवाकडे यायचे नारायण स्वामींच्या मंदिराबाहेर प्रवचन होई. सूर्यास्ताला आत जाऊन ते संध्या करीत आणि मग स्वारी सजवायला सुरवात झाली की तिथे बसून ते देवाला श्रीपादवल्लभांचे चरित्र ऐकवीत.. वर्षा नु वर्ष त्यांनी फक्त श्रीपादवल्लभांचे चरित्र देवाला सांगितले. कदाचित असे असू शकेल की पादुकारुपाने ते तिथे आहेत. स्वारी खाली गेली की ते मोटया महाराजांच्या ओवरीत येऊन बसत. किंवा नारायणस्वामींच्या मंदिराच्या बाहेरच्या ओट्यावर त्यांची खिडकीखाली एक टरलेली जागा आहे तिथे बसत. पालखी झाल्यावर तीर्थ अंगारा मात्र मोटया महाराजांच्या ओवरीच्या बाहेरच्या ओट्यावर घेत आणि मग मुक्कामाला परत येत.

दुपारची विश्रांती झाल्यावर प्रवचनाला येण्यापूर्वी मूड असेल तर बोलणे होई. १९८४ च्या गुरुव्दादशीच्या दिवशी असेच सगळे बसले असता महाराज त्या मुक्कामाच्या (मुकुंदा वाडीकरच्या घराच्या) मागे प्रचंड पुरातन वृक्ष आहे त्याच्याकडे इशारा करुन म्हणाले, पिताजी म्हणत असत या वृक्षावरचे पक्षी जसे सकाळ झाल्यावर चारा पाणी शोधायला जातात पण संध्याकाळी मात्र परत याच वृक्षावर येऊन बसतात. तसे आपले आहे. नोकरी धंद्याच्या निमित्ताने आपण कुटेही गेलो तरी शेवटी आपल्याला इथेच येऊन राहायचे आहे.

नोकरी धंदा करणा-यांनी वर्षातून एकदा वाडीला जाऊन एक पारायण व महापूजा केली तरी पुरे असे त्यांचे मत होते. इथे स्थान महात्म्य आणि पावित्र्य आहे त्यामुळे फळ अधिक आहे. शहरात एवढे पावित्र्य पाळता येत नाही.

त्यांना एकदा का पक्के समजले की समोरच्या जीवाला जिज्ञासा आहे की मग निवांतपणा असेल तर ते आपणहोऊन विषय काढून उपदेशपर कांही तरी सांगत.

एकदा असेच आश्रमात ते बसले होते दुसरे कोणीच आलेले नव्हते. त्यांनी बोलायला सुरवात केली आणि जीवनाचे अत्यंत महत्वाचे मार्गदर्शन सहजतेने केले.

म्हणाले, आपण जे सुखदुःख भोगतो ते आपल्याच पूर्व कर्माचे फळ असते हे तुम्हाला माहीतच आहे. दुःखं कोणालाच नको असते. पण ते भोगावे तर लागतेच. सुखही टिकणारे नसते तसे दुःखंही टिकणारे नसते. जसं दुःख न मागता मिळते तसेच सुखाचे असते पण तेवढा विचार आपल्या मनांत टिकत नाही. जेव्हां दुःखं आपण भोगत असतो तेव्हां सुखं दारात येऊन उभे असते आणि म्हणते दुःखाचा काळ संपला की मी आंत जातो.

या प्रारब्धाचा क्षय करण्याचे सर्व श्रुत तीन मार्ग आहेत – योग मार्ग, ज्ञान मार्ग आणि भक्ति मार्ग. या व्यतिरिक्त चौथा मार्ग आहे तो म्हणजे तितिक्षेचा.

आपला जर कोणी अपमान केला आणि आपण जर त्याचा प्रतिकार केला नाही किंवा त्याचा प्रतिकार करायचा विचारही आपल्या मनांत अभ्यासाने येऊ दिला नाही तर आपल्या प्रारब्धाची कांही युनिटस डिलीट होतात.

प्रारब्ध क्षय करण्याचा किती सोपा उपाय आहे ! तो अभ्यास जेवढा वाढेल तेवढे दुःखं कमी होत जाते.

अशा छोट्याशा प्रसंगाने कायमचे मार्गदर्शन मिळत असे.

वाडीच्या या मुक्कामात एकदा ते समोर अमरेश्वरला पायी दर्शनाला जाऊन येत. तिथे बरीच वर्ष गोव्यातून परशुराम महाराज म्हणून एक संन्यासी पायी औरवाडला येऊन राहात. १९८४ च्या गुरुव्दादशीच्या वास्तव्यात ते इथे आले असता परशुराम महाराजांनी त्यांना प्रार्थना करताना ऐकली की ''आपणच साक्षात दत्तप्रभु आहात आपण इथे या वास्तव्याला आणि आम्हाला मुक्ती द्या''

या स्थानात त्यांचे गुरुसहवासात ( प प श्री दीक्षितस्वामींच्या) बालपण गेल्यामुळे या स्थानाबददल त्यांना विशेष आत्मीयता होती. इथे आल्यावर त्यांच्या त्या सर्व सुखद स्मृतींना मनांतल्या मनांत उजाळा मिळत असेल. १९९४ च्या डिसेंबर महिन्यात महाराज व नीलाताई बरोबर औरवाडला

जायचा योग आला तेव्हां तिथे गेल्यावर नीलाताईंनी महाराजांना प्रार्थना केली की त्यांनी एखादी बालपणची या स्थानाशी निगडीत आटवण सांगावी. अमानित्वाची मूर्ती असल्याने महाराजांनी आटवणी कधी सांगितल्याचे ऐकिवात नाही. असतीलही कोणाला सांगितल्या. कल्पना नाही. महाराजांनी मोटया महाराजांच्या दीक्षितस्वामींनी केलेल्या नमःश्रीगुरोमेशधीशे दयाब्धेमधला – त्वयि भक्तिंमे वर्धय धुहृत्तम ईश नाशय --- हा श्लोक घेतला आणि दोन चार वाक्य बोलल्यानंतर ते इतके भावनाविवश झाले की त्यांना अश्रु आवरेनात, अक्षरशः हुंदके देऊन रडू लागले, उपरण्याने डोळे पुसू लागले. तो आवेग आवरल्यावर कसे तरी त्यांनी ते निरुपण पूर्ण केले.

नियतीची काय इच्छा आहे समजत नाही वर उल्लेखलेल्या एका कॅसेटप्रमाणेच ही कॅसेटही एका प्रतिष्ठित व्यक्तिकडून अनवधानाने हरवली.

ππππ ππππ

एका गुरुबंधूच्या मनांत सहज एक प्रश्न यायचा – जर ही शक्तिपात दीक्षा मुक्ति देणारी आहे मग महाराज ती सर्वांना मुक्त हस्ते कां देत नाहीत? सर्वांचे कल्याण होईल ना ! आज हा प्रश्न विचारायचा टरवून आम्ही आश्रमात गेलो. महाराज खालच्या हॉलमध्ये बसले होते. पुढे कांही मंडळी बसली होती. एकेक जण येऊन बसत होता. आता दुस-या कोणी कांही विचारण्यापूर्वी आपण आपला प्रश्न विचारावा म्हणून गुरुबंधू पुढे होणार एवढ्यात पुढे बसलेल्या एका गृहस्थाने तोच प्रश्न महाराजांना विचारला.

महाराजांनी थोडक्यात असे सांगितले की पूर्व जन्मातल्या ऋणानुबंधानुसार आणि त्या जीवाच्या अभ्यासानुसार सद्गुरु दीक्षा देत असतात. त्या प्रमाणे पूर्व संचितानुसार ज्याच्या प्राक्तनात दीक्षा आहे तो कसाही सद्गुरुपर्यंत येऊन पोहोचतो. अथवा सद्गुरु त्याच्या पर्यंत पोहोचतात आणि त्याचे कल्याण करतात.

प प श्री लोकनाथ तीर्थ महाराज म्हणत ''दीक्षा लेने देने की नहीं होने पानी की चीज है''  महाराजांनी व्दिसाहस्त्रीवर प्रवचन करताना एका ठिकाणी म्हटले आहे की एरव्ही मानवी भावात असणारे सद्गुरु तशा योग्यतेचा जीव समोर आल्यावर त्यांच्यातले ईश्वरत्व जागृत होते आणि त्या जीवावर अनुग्रह होतो मागायची गरजच पडत नाही.

दादरच्या एका कॉलेजात शिकणा-या मुलाच्या मनांत दैवयोगाने महाराजांच्याबददल ओढ निर्माण झाली आणि तो प्रथम आश्रमात गेला महाराज खालच्या हॉलमध्ये समोरच बसले होते आणि आंत शिरताच याला क्रिया सुरु झाल्या.

असे किती तरी जणांच्या बाबतीत घडले आहे.

ππππ ππππ

अज्ञानी जीवांच्या मनांत साधना, उपासना कमी आणि प्रश्नच जास्ती असतात.  एकदा नीलाताईच्याकडे सायंसंध्या आटोपून महाराज निवांतपणे बसले असताना त्यांच्याशी संवाद साधण्याकरता कांही साधक गेले.

त्यातल्या एका साधिकेने विचारले, ''महाराज, साधना किती काळ करायची ?''

महाराज गोड हंसून म्हणाले, ''एखाद्याने जर विचारले, विहीर किती खणायची तर काय उत्तर देणार ? अर्थात पाणी लागेपर्यंत. तसे आहे'' पुढे त्यांनी त्याचा खुलासा केला.

मग त्या साधिकेने प्रश्न विचारला, साधनेत बदल कसा करायचा ?

पुन्हा महाराज हंसून म्हणाले, औषध योजनेत बदल पेशंटने करायची की डॉक्टरने ?

व्यवहारातील सोपी उदाहरणे महाराज देत. एक अनुग्रहीत भक्त असाच साधनेत कधी काय मिळणार या विचाराने व्याकूळ झाला होता. तो प्रामाणिक होता. त्याच्या मनांत येणारे उलट सुलट विचार त्याने महाराजांजवळ प्रांजळपणे बोलून दाखवून काय करु विचारले. महाराजांनी त्याला पुन्हा विहीरीचे उदाहरण दिले. ते म्हणाले, आपण विहीर खणायला लागलो की लगेच थोडे पाणी लागते ! प्रथम दगड काढावे लागतात, नंतर चिखल निघतो आणि शेवटी स्वच्छ पाणी लागते. तसे साधनाचे आहे. साधनेला सुरवात केल्यावर ती शक्ति आपल्या मनांतला दगडरुपी कुसंस्कार संचय, चिखलरुपी मळ दूर करते आणि नियमितपणे चिकाटीने साधना चालू टेवल्यानंतर स्वच्छ पाणी लागते म्हणजे ध्येय प्राप्ती होते.

ππππππ

एकाने नोकरीकरता प्रयत्न सुरु केले होते पण कुठे यश येत नव्हते. महाराजांनी त्याला शेतक-याचे उदाहरण दिले. कसलेला शेतकरी उन्हाळयात शेताची मशागत करतो, ते नांगरुन टेवतो, शेतीची अवजारे नीट आहेत की नाही तपासतो, बी बियाणे तयार टेवतो आणि पावसाची वाट पहातो. पावसाचे चिन्ह दिसताच बी पेरतो आणि पिक घेतो. तसे आपण नुसतेच अजून कॉल येत नाही म्हणून नाराज होऊन स्वस्थ बसण्यापेक्षा जो अवधी मिळाला आहे त्याचा उपयोग ज्ञानात भर घालाण्याकरता कां करु नये ? सध्याचे जग स्पर्धात्मक आहे. जीवघेणी स्पर्धा आहे त्यात टिकायचे असेल तर आपली योग्यता जास्तीत जास्त वाढवली पाहिजे.

महाराजांचा कायम सकारात्मक दृष्टीकोन असे. त्यांच्या एका आप्ताने एका टिकाणी अर्ज केला होता पण कॉल नाही आला. पुढे कांही महिन्यांनी भेटल्यावर महाराजांनी त्याला त्या संबंधात विचारले. तो वैतागून म्हणाला, तिथे अर्ज करुन कांही उपयोग झाला नाही. नोकरी मिळाली नाही.

महाराजांनी त्याला विचारले त्याने परत तिथे अर्ज नंतर केला होता का ? त्याने आणखीनच वैतागून वैफल्यग्रस्त होऊन नकार दिला.

त्यावर महाराजांनी त्याला समजावले त्याने अर्ज केला तेव्हां तिथे पद रिक्त नसेल पण ती स्थिती कांही कायम राहात नाही. कोणी निवृत्त होतात, कोणाची बदली होते, कोणाला प्रमोशन मिळते पद

रिकामे होऊ शकते. परत अर्ज करुन पहायला काय हरकत आहे.

ππππ πππ

प्रयत्नवादावर त्यांचा भर होता. प्रसंगाने अपयश आले म्हणून खचून जायचे नसते, प्रयत्न सोडायचे नसतात हे पटवण्याकरता ते अमेरिकेच्या नासाचे उदाहरण देत. अमेरिकेने चंद्रावर माणूस उतरवायचे ठरवले. म्हणून असे झाले नाही की त्यांचे पहिलेच अंतराळ यान चंद्रावर जाऊन पोहोचले. पण तसे झाले नाही म्हणून त्यांनी प्रयत्न सोडले नाहीत म्हणून शेवटी ते चंद्रावर माणूस उतरवण्यात यशस्वी झाले. अंतराळ यान बिघडले म्हणून वैतागण्यापेक्षा ते कां बिघडले याचा त्यांनी शोध घेतला आणि त्या चुका, ते दोष दूर करण्याचा प्रयत्न केला तेव्हां यश आले. तसे आपण सतत आपल्याला तपासून पहावे, आपण कुठे कमी पडतो याचा शोध घ्यावा, आपली योग्यता वाढवावी असे त्यांचे सांगणे असे.

ध्येय निश्चिती नसेल तर कांहीच मिळवता येत नाही जीवनात असे त्यांचे मत होते. एका ठिकाणी त्यांनी म्हटले आहे जिथे

व्यवहारात आमचे ध्येय पक्के होत नाही तर परमार्थात काय होणार ? आणि ध्येय पक्के नसेल तर प्रयत्नच घडणार नाहीत.

ππππ ππππ

एकदा हरिहरेश्वरला जायचे होते. महाराजांशी कांही बोलून मग जायचे म्हणून पुण्याला आश्रमात गेलो. संध्याकाळी घरी जाताना महाराज म्हणाले, त्यांना (सौ कोडणीकरांना) उद्या सकाळी तुम्हाला कांही तरी पोहे वगैरे करुन द्यायला सांगा. इथून खाऊन निघालेले बरे. कारण घरी पोहोचेपर्यंत तुम्हाला वाटेत कांही खायला मिळणार नाही.

बाहेरचे खाऊ नका असे त्यांनी किती खुबीने सुचवले !

साधकाने शक्य तो हॉटेल किंवा तत्सम स्थानात अथवा परान्न घेऊ नये असे शास्त्र सांगते. अगदीच नाईलाज झाला तर घरी आल्यावर गायत्रीचा जप करावा म्हणजे दोष लागत नाही असे शास्त्र सांगते.

ππππ ππππ

महाराजांच्याकडे जायची हौस, त्यांच्याकडून दीक्षा घेण्याची हौस, त्यांच्या सहवासात राहायला मिळावे कधी तरी (आपल्या सोयीने) असेही वाटत असते. पण हे सर्व पूर्ण विचारांती असेल तर ठीक नाही तर तेरड्याचा रंग तीन दिवसासारखे होते. थोड्याच दिवसात साधना कमी करण्याकरता, प्रसंगाने टाळण्याकरता सबबी सांगायला सुरवात होते. मानवी मनाची ही दुर्बलता आहे.

मुंबईतल्या मुंबईतच पण दुसरीकडे जरा घरापासून थोडी लांब बदली झाली. लगेच सकाळच्या उपासनेत कांही सूट मिळते का विचार सुरु झाले. सरळ सांगायचे धाडस नव्हते म्हणून गुरुबंधूंच्या मार्फत महाराजांच्या कानावर घातले. नंतर जेव्हां त्यांची भेट झाली तेव्हां बोलण्याच्या ओघात एवढेच हंसत म्हणाले, राजाभाऊ जोशी तुमच्या परिचयाचे आहेत. ते सकाळी ७ वा कॉलेजात जायला घर सोडतात. तत्पूर्वी त्यांचा १२०० गायत्री जप आणि ऋग्वेद संहितेचे एक पारायण झालेले असते.

ππππ ππππ

सकाळची इंद्रायणी पकडून सुट्टीच्या दिवशी पुण्याला जाणे व्हायचे. पूजा आटोपून जायचे म्हणजे ---- परत आलेच कन्सेशन. महाराजांना विचारले, संध्याकाळी / रात्री घरी गेल्यावर पूजा केली तर चालेल का ?

ते शांतपणे म्हणाले, थोडे लवकर उठले म्हणजे होते.

ππππ ππππ

मुंबईच्या एका विद्यार्थीनीने तिने जर्मन भाषेच्या परिक्षा दिल्याचे महाराजांना कळवले. त्याबददल तिचे कौतुक करताना त्यांनी एक विचार सुचवला – संस्कृतही समृद्ध भाषा आहे.

ππππ ππππ

दुस-यात दिसणा-या दोषातून आपल्याला शिकण्यासारखे कसे असते हे त्यांनी एका प्रसंगाने शिकवले. जालन्यात एका कार्यक्रमाला बरीच मंडळी जमली होती त्यात एक बहिरे वयस्कर गृहस्थ होते. ते जिथे जिथे चार

माणसे एकत्र येऊन बोलत असतील तिथे जाऊन कानाला हात लावून ती माणसे काय बोलत आहेत ते ऐकण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत. असे बराच वेळ चालले होते. महाराज सहज म्हणाले, या वयात अनावश्यक गोष्टी कानावर न पडण्याची पूर्वसंचिताने देवानी व्यवस्था केली आहे तेव्हां आपल्या अनुसंधानात, नामात राहायचे सोडून काय बुद्धि होते ते पहा.

सांभाळुनी मार्गावरता । आणिता न दुजा त्राता

साधना सुरु झाल्यावर प्रथम नाडी (देह) शुद्धि आणि नंतर चित्त शुद्धि होत असते. पण त्या प्रक्रियेत एखाद्याच्या बाबतीत विकल्प, मनातले पूर्व संस्काररुपी दोष इ विक्षेप निर्माण करतात. आपण साधक आहोत म्हणजे इतरांपेक्षा वेगळे आहोत असा वृथा भ्रामक अभिमान निर्माण होतो. असाच खोटा अभिमान निर्माण होऊ लागला. अमका स्वतःला फार मोटा समजतो, तो असा आहे, तसा आहे वगैरे अनावश्यक व घातक विचार मनांत काहूर उटू लागले. अचानक महाराजांचे पत्र आले आणि त्यात (मी) कोणताही संदर्भ दिलेला नसताना किंवा त्या व्यक्तिचा उल्लेख केलेला नसताना महाराजांनी इतर गोष्टीमध्ये सहजतेने ज्या गृहस्थाबददल तसा विचार आला होता त्याचे नांव लिहून म्हटले ''तेही मोटे गुरुभक्त आहेत'' मन शुद्ध टेवण्याचे शिक्षण किती सहजतेने देत होते.

ππππ ππππ

1978 सालातला प्रसंग आहे. त्या वेळी महाराज पुण्यात असताना वरच्या मजल्यावर श्री गुरुमहाराजांच्या खोलीच्या बाहेरच्या जागेत बसत असत. त्या वेळी विशेष कोणी फिरकायचे नाही त्यामुळे त्यांचा जवळून आणि एकांतात सहवास मिळायचा. त्यांच्या समोर बसून कांही शंका समाधान करुन घ्यायला मिळायचे. ते पत्र लेखन करीत आपण बसून राहायचे. अधून मधून एखादे वाक्य बोलीत. एकदा असेच त्यांच्याकडे जाण्यापूर्वी पॉल ब्रंटनचे सीक्रेट सर्च इन इंडिया हे पुस्तक वाचले होते. असेच त्यांचे पत्र लेखन चालू असता त्यांच्यासमोर बसलो असता सहज एक (चुकीचा) विचार येऊन गेला. महाराज तर शास्त्री, वैदिक वगैरे त्यांना पॉल ब्रंटन कोण काय माहीत असणार ? असा विचार आला आणि पत्र लिहित असता महाराजांनी ते थांबवून एक क्षण समोर माझ्याकडे दृष्टीक्षेप टाकला आणि परत पत्र लिहायला घेतले. ते पूर्ण केले बाजूला टेवले आणि मला म्हणले, हं तुमचे पॉल ब्रंटन काय म्हणताहेत !

ππππ ππππ

श्रीरामकृष्ण परमहंस असो किंवा श्री अक्कलकोट स्वामी असो किंवा अन्य अवतारी संत असोत त्यांच्याजवळ सेवेत राहाणा-या व्यक्तिंबददल न विचार करणेच चांगले. श्री रामकृष्णांचा भाचा हृदय त्यांची सेवा करायचा पण पुढे त्याची दादागिरी इतकी वाढली की त्याला शेवटी हांकलून द्यायला लागले.

या लोकांच्या तावडीतून कोणी सुटत नाही. कधी कधी असह्य झाले की माणूस बोलून दाखवतो ते एका दृष्टीने बरोबर नाही हे त्यालाही मान्य असते पण तितिक्षा कमी पडते. जालन्याचे एक गृहस्थ महाराजांच्या सेवेत राहाणा-या माणसाच्या उर्मटपणाला असेच कंटाळले होते आणि त्यांना कधी तरी ते त्या माणसाला महाराजांच्या समोरच सुनवायचे होते.

एकदा महाराजांना कारने जालन्याहून पुण्याला घेऊन येताना वाटेत रांजणगांवच्या श्री गणपतीच्या दर्शनाला महाराज गेले. तिथे श्री गणपतीसमोरचा मोटा उंदीर पाहून ते म्हणाले, कसा मोटा झाला आहे पहा.

त्यांना तो माजला आहे असेच म्हणायचे होते पण त्यांनी थोडा संयम टेवला.

महाराज त्या वेळी कांही बोलले नाहीत पण नंतर कारमध्ये बसल्यावर जालन्याच्या गृहस्थांना म्हणाले, तुम्ही कधी सज्जनगडावर गेला होतात का ? तिथे जे दोन मोटे हंडे आहेत पाण्याचे ते आज दोन माणसांनासुद्धा उचलले जाणार नाहीत. पण कल्याणस्वामी खालच्या पायथ्याशी असलेल्या नदीचे पाणी त्यात भरुन ते वर रोज आणीत असत समर्थाकरता.

आणि नंतर विषय बदलला.

(कल्याणस्वामींचीही ते धष्टपुष्ट होते म्हणून खिल्ली उडवली जायची. )

ππππ ππππ

लातूरच्या एका स्त्री भक्ताने महाराजांच्या सेवेत असलेल्या गृहस्थांच्या जवळ श्री वामन निवासच्या बांधकामाकरता ६,००० रु दिले. पुढे जेव्हां ती

आश्रमात आली असता महाराजांना भेटली तेव्हां तिने सहज विचारले, महाराज, देणगीची रक्कम मिळाली ना !

महाराजांनी चातुर्याने सर्व लक्षात घेऊन म्हटले, हो, तुम्हाला पावती मिळाली नाही का ?

त्या बाईंनी नकार दिला.

महाराज तेवहां वरच्या मजल्यावर बसले होते. त्या भगिनींना म्हणाले, जरा थांबा आम्ही खाली ऑफिसात जाऊन विचारुन येतो.

आणि ते खाली आले. तेव्हांच्या व्यवस्थापकांना म्हणाले, मागच्या तारखेची एक ६००० रु ची पावती बनवून द्या आम्ही तुम्हाला नंतर ती रक्कम देतो. आणि ती पावती त्या लातूरच्या भगिनींना आणून दिली व म्हणाले, पावती तयारच होती पण कामाच्या गडबडीत तुम्हाला पाटवायची राहिली होती ही घ्या.

नंतर त्यांनी त्या गृहस्थाला एका शब्दाने या घटनेबददल विचारले नाही. आणि त्यानेही इतक्या ईश्वर शक्तिच्या सहवासात राहून प्रामाणिकपणे महाराजांना पैसे दिले नाहीत.

ππππ ππππ

## यवनराजनी टाळी पीड । जातपातनी तने न चीड

पुण्यातली एक भक्त आश्रमात दर्शनाला येत असे. तसेच प्रसंगाने तिचे घरीही जाणे व्हायचे. कधी कोणाच्या मनांत काय विकल्प येईल सांगता येत नाही. एकदा अशीच ती दुपारी जेवणाच्या वेळी आश्रमात दर्शनाला आली

आणि प्रथेप्रमाणे हॉलमधून ती मागच्या अंगणात पाय धुवून औदुंबराला प्रदक्षिणा घालण्याकरता जात होती. ऑफिसच्च्या बाजूच्या खोलीत सोवळ्याची पाने घेतली होती. महाराजांवर श्रद्धा भक्ति असूनही मनांत आले आपण ब्राम्हण नसल्याने आपल्याला कधीच महाराजांच्या पंगतीला बसायला मिळणार नाही ना !

पाय धुवून औदुंबराला प्रदक्षिणा घालून हॉलमध्ये देव दर्शन करुन ती परत जात असताना तिथल्या एका गृहस्थांनी तिला परत बोलावले आणि सांगितले तिला महाराजांनी प्रसादाला बसायला सांगितले आहे. तिचा विश्वासच बसेना. सगळे ब्राम्हण सोवळयात बसलेले आणि हिचे पान महाराजांच्या बाजूला घेतले होते.

एवढे झाले तरी परत एक प्रसंग घडलाच. महाराजांच्या घरी योगायोगाने कुलधर्माचा प्रसाद होता त्या दिवशी जायची वेळ आली. तेव्हांही पूर्वीचाच विचार मनांत आला. अशा प्रसंगी आपल्याला बोलावणे येणार नाही कारण आपण ब्राम्हण नाही. इ दर्शन घेऊन ती निघून गेली. ती नोकरी करीत असे. पुढे ती दर्शनला आली असता महाराजांनी तिला अमूक एक तारखेला सु ट्टी आहे का विचारले. तिने नकार दिला. णहाराजांनी आपल्याला असे कां विचारले असेल हे तिच्या लक्षात आले नाही.

महाराजांनी विचारलेल्या तारखेला दुपारी तिच्याकडे एक गृहस्थ जेवणाचा डबा घेऊन आले आणि म्हणाले, महाराजांनी हा प्रसाद दिला आहे आणि सांगितले आहे की ते किंवा कोणीही अजून त्यांच्याकडचे जेवलेले नाही. नैवेद्य झाल्यावर तुम्हाला प्रथम प्रसाद पाटवला आहे.

महाराजांच्या शिडस्त स्वभावामुळे त्यांना प्रसंगाने त्रास होत असे पण त्यांनी तो सहन केला. भिवंडीतला सप्ताह संपल्याच्या दुस-या दिवशी महाराजांच्याकडे श्राद्ध होते म्हणून त्यांनी दुस-या दिवशीच्या महाप्रसादाला न थांबता पुण्याला जायची इच्छा आयोजित करणा-या भक्तांना सांगितली. त्यांच्या पुढा-याने सांगितले असे चालणार नाही महाराजांनी थांबलेच पाहिजे. महाराजांनी पुन्हा पुन्हा त्या पुढा-याला कळवळून सांगून पाहिले पण तो ऐकायला तयार नाही. एवढेच काय त्याने आपली भक्ति (?) सिद्ध करण्याकरता महाराजांना धमकी दिली की जर त्यांनी हे मान्य केले नाही तर ते आयोजक महाराजांकडे मोर्चा आणतील आणि धरणे धरतील.

तमाशा टाळण्याकरता महाराजांनी शेवटी होकार दिला. ही मंडळी परत गेल्यावर ते एवढेच म्हणाले, आम्हाला परेच्छा प्रारब्ध भोगावे लागते.

१९७४ साली प पू श्री गुरुमहाराजांनी देह ठेवल्यावर त्यांनीच लिहून ठेवल्याप्रमाणे श्री महाराज त्यांच्या गादीवर आले. जशी गुरुमहाराजांनी आपल्या गुरुंच्या – प प श्री वासुदेवानंद सरस्वतींच्या – स्मृतीप्रित्यर्थ श्री वासुदेव निवास बांधला तसा गुरुमहाराजांच्या नांवे श्री वामन निवास व्हावा असे महाराजांना वाटत होते. त्यांच्या बांधकामाकरता निधी जमा करण्याच्या दृष्टीने ते श्री

भागवत सप्ताहाच्या निमित्ताने आणि लोक संग्रह करण्याच्या, आहे तो लोक संग्रह सांभाळण्याच्या दृष्टीने सतत दौ-यावर असत. जवळ जवळ संपूर्ण भारतभर पसरलेला आणि विशेष करुन महाराष्ट्रात विखुरलेला त्यांचा लोक संग्रह किती प्रचंड होता याची आपल्याला कल्पनाच करता येणार नाही. प पू श्री धुंडिराजमहाराजांचा शिष्य परिवार, गुरुमहाराजांचा शिष्य परिवार आणि नव्याने झालेला त्यांचा शिष्य परिवार एवढा त्याचा विस्तार होता. धुंडिराज महाराजांच्या शिष्यांना ते धुंडिराज महाराज होते तर गुरुमहाराजांच्या शिष्यांना ते गुरुमहाराज होते.

१९८५ च्या ऑगस्ट महिन्यात जालन्याला जाताना वाटेत औरंगाबादला ते श्री क्षीरसागरांकडे उभ्या उभ्या भेटण्याकरता गेले. सौ माईंनी महाराजांना कांही तरी घेण्याचा खूप आग्रह केला. महाराज त्यांची समजूत काढत म्हणाले, ताईमहाराज आमची वाट पहात थांबल्या आहेत त्यामुळे आम्हाला लवकर जाणे भाग आहे पण तुमच्या घरावरुन जाताना तुम्हाला न भेटता जाणेही बरोबर वाटले नाही म्हणून आलो. असं म्हणतात देव दर्शनाला निघाल्यावर एकाच खेपेत सगळया मंदिरात ओळीने जाऊ नये. एका देवाचे दर्शन घेऊन घरी येऊन परत पुढच्या देवळात जावे. तसे आम्ही तुमच्याकडे स्वतंत्र येऊ ना!

नीलाताईसारख्या असंख्य भक्तांना ते गुरुमहाराज होते. म्हणजे काय तर जसे गुरुमहाराज यांच्याशी वागत तसे महाराज वागत.

तीच गोष्ट धुंडिराज महाराजांची. विदर्भ मराटवाड्यातल्या हजारो लोकांचे ते धुंडिराज महाराज होते. १९८५ सालचा एक छोटासा प्रसंग आहे. जालन्याच्या काद्राबादमधे राहाणा-या हेसवणकरांकडे महाराजांच्याबरोबर जाण्याचा प्रसंग आला. पूर्वीचे भरपूर मोटे घर. पुढे मोटे अंगण आणि नंतर ओसरी मग घर वगैरे. घरात गेलो तेव्हां अंगणात व ओसरीवर कोणी नव्हते. मंडळींना महाराज येतील याची कल्पना नव्हती. महाराज घरच्यासारखे पुढे गेले. त्यांची पिशवी ओसरीवर एका टिकाणी टेवली. अंगणातल्या नळावर हात पाय धुतले. ओसरीवरचा पाट घेऊन तिथे बसले तो पर्यंत हेसवणकर आलेच. मग पुढे बोलणे झाले. न राहवून हेसवणकरांना विचारले महाराजांनी हे असे कसे काय केले. ते म्हणाले, आमचे मोटे महाराज (धुंडिराजमहाराज) घरी आले की असेच करायचे.

नीलाताईंनी एक प्रसंग सांगितला होता. गुरुमहाराज २० नारायण पेटमध्ये राहात असताना जस जसा शिष्य संग्रह वाढत गेला तस तसा गुरुपौर्णिमेच्या उत्सवाला जागा मिळवण्याचा प्रश्न आला. एखादा हॉल वगैरे घेऊन तो होत असे. शेवटी गुरुमहाराजांनी परगांवच्या कांही लोकांना सांगितले की त्यांनी आपापल्या गांवी

एखाद्याच्या घरी सोयीने उत्सव करावा. नीलाताईंनी गिरगांवात त्यांच्या घरी तो सुरु केला. ते स्वतः गुरुपौर्णिमेच्या आधी दोन दिवस तिथे येऊन राहून जात. नंतर त्या बोरिवलीच्या मोटया जागेत गेल्यावरही तिथे ते जात राहिले.

ते स्नानाला गेल्यावर नीलाताई बाहेर थांबत आणि स्नान होत आले की महाराज त्यांना हांक मारुन म्हणत, नीलाताई या दोन तांबे टाका. १९७५ साली महाराज प्रथम गुरुपौर्णिमेच्या प्रथेप्रमाणे नीलाताईकडे गेले. नीलाताईंच्या मनांत प्रश्न होता आता दत्तमहाराज आहेत की गुरुमहाराज ? जर महाराजांनी दोन तांबे पाणी टाकायला बोलावले तर ते आणि गुरुमहाराज एकच आहेत आणि गुरुमहाराजच त्यांच्या रुपाने आले आहेत असे समजायचे. महाराज स्नानाला गेल्यावर त्या बाहेर थांबल्या त्यांची उत्सुकता शिगेला पोहोचली होती आणि स्नान संपण्यापूर्वी महाराजांनी नीलाताईंना गुरुमहाराजांप्रमाणेच हांक मारुन म्हटले, नीलाताई, या दोन तांबे घाला.

संपलं. मनांतले व्दैत संपले. हे गुरुमहाराजच आहेत ! त्या नंतरही अनेक प्रसंगातून महाराजांनी त्यांचे एकत्व दाखवून दिले.

१९७२ साली एका भक्ताला गुरुमहाराजांनी नोकरी सोडून व्यवसाय करण्यासंबंधी कांही सूचना केली होती. त्यांना कांही कारणाने ती प्रत्यक्षात आणणे शक्य झाले नव्हते आणि त्यांनी तो

विचार बाजूला टेवला. पुढे १९७६ साली महाराज मुंबईला आले असता बोलण्याच्या ओघात त्यांनी गुरुमहाराजांची सूचना जशी न तशी त्यांना बोलून दाखवली आणि त्या कार्यात यश मिळेल असे खात्रीपूर्वक सांगितले. मग मात्र यांनी मनावर घेऊन त्याप्रमाणे केले आणि महाराजांच्या कृपेने यश मिळाले.

त्या शिवाय त्यांच्या असामान्य विव्दवत्तेमुळे आसेतु हिमाचल त्यांची कीर्ती पसरलेली होती. भारतातल्या प्रत्येक शंकराचार्य पीठांकडून त्यांचा सत्कार झाला होता. अनेक विव्दत् सभा त्यांनी सहजगत्या जिंकल्या होत्या. भारतातल्या अनेक साधु सत्पुरुष त्यांना परिचित होते. पण अमानित्व परिपूर्ण असल्याने हे कधी कोणाला कळू दिले नव्हते.

श्री गुरुमहाराजांच्या चरित्रात एक प्रसंग आहे. महाराजांना दक्षिण भारतातल्या एका विव्दत सभेला आमंत्रण होते. तिथे जाऊन आल्यावर गुरुमहाराजांनी त्यांना तो कार्यक्रम कसा झाला विचारल्यावर यांचा तिथे सर्वोच्च सत्कार झाला एवढे सोडून महाराजांनी सगळे सांगितले.

त्यामुळे त्यांना भेटण्याकरता लोकांना ते जिथे असतील तिथे जावे लागे. पण महाराजांना तो संकोच वाटे. आपल्याला भेटायला

आलेल्या मंडळींमुळे यजमानांची गैरसोय होऊ नये या करता ते जागृक असत. त्यांच्या चाहत्यांना वाटे त्यांचा सहवास मिळेल तितका घ्यावा.

एकदा देऊळगांवराजात महाराजांचा श्रीमत भागवत सप्ताह होता. त्यांच्या मोटया कन्येला – सुमनताईला समजेना काय करावे ? सप्ताहाला बसलं तर तिकडे शेतीची कामे वाट पहाताहेत आणि वैरागला शेतीच्या कामाकरता जावं तर सप्ताहाला बसायला मिळत नाही. त्यांनी हा संभ्रम महाराजांना बोलून दाखवला. त्यांनी पटकन सांगितले, सप्ताहाला बसून शेतीच्या कामाचे चिंतन करण्यापेक्षा शेतीची कामे करताना भागवताचे चिंतन करणे चांगले.

१९८१ साली देऊळगांवराजात महाराजांच्या हस्ते नव्याने बांधलेल्या समाधी मंदिरात श्री दत्तात्रेय आणि श्री धुंडिराज महाराजांच्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठा होती. तो कार्यक्रम पहावा आणि तिथले महाराजांचे भक्त वैभवही पहावे म्हणून मुंबईहून चौघे जण प्राणप्रतिष्ठेच्या आधी चार दिवस तिथे जाऊन पोहोचले. महाराजांचे स्वतःचे वडिलोपार्जित घर जरी तिथे असले तरी तिथे पाहुण्यांच्या राहाण्याची व्यवस्था करणे शक्य नव्हते. हे या मंडळींना माहीत नव्हते. तिथे जाऊन पोहोचल्यावर महाराज यांना म्हणाले जवळच श्री जगनशेट धन्नावतांचे घर आहे. (त्यांच्याकडे प पू श्री वक्रतुंड महाराजांपासून

गुरुपरंपरा आहे) त्यांच्याकडे जाऊन स्नान इ आटोपून इकडे आलाच आहात तर देव दर्शनाचा लाभ घ्या. इथून प्रथम औंढ्या नागनाथ करुन नंतर परळी वैजनाथचे दर्शन घ्या. ते झाले की घृष्णेश्वरचे दर्शन घेऊन चौथ्या दिवशी (प्राण प्रतिष्ठेच्या दिवशी) इथे या.

मंडळींना सहाजिकच आनंद झाला महाराजांच्या आज्ञेने ज्योतिर्लिंगाचे दर्शन झाले. प्राणप्रतिष्ठेचा कार्यक्रमही पहायला मिळाला. आणि देऊळगांवराजात कोणाकडे राहायचे हा प्रश्नही मिटला.

त्यांनी जर कोणावर एखादी जबाबदारी सोपवली तर ते खंबीरपणे त्या गृहस्थाच्या मागे उभे राहात. श्री नागल्यांना श्रीवामन निवासाचे बांधकाम करण्याची आज्ञा केल्यावर त्यांची राहाण्याची सोय श्री वासुदेव निवासात तर केलीच पण सुरवातीलाच अधिकार पत्र लिहून दिले ते महत्वाचे होते. त्याचा आशय असा होता की श्री नागल्यांनी बांधकामाच्या बाबतीत घेतलेला निर्णय हा महाराजांचा निर्णय असेल त्याला कोणी चॅलेंज करु नये.

तोच अनुभव जालन्याच्या मंदिराच्या बांधकामाबाबत आला. प पू सौ ताईमहाराज बांधकामात सूचना घेण्याकरता वारंवार पुण्याला पाटवत. असे बरेच वेळा झाल्यावर एक दिवस श्री महाराज म्हणाले, "असे

किती वेळा तुम्ही पुण्याला येणार ? तुम्ही तुम्हाला योग्य वाटेल तो निर्णय घ्या आम्ही तो आमचा निर्णय आहे असे सांगू''

त्यांना म्हटलं, त्या निमित्ताने आपले दर्शन तरी घडते. नाही तर आपल्याला भेटायला कांही कारणच नाही.

नंतर लक्षात आले की निर्णय घेण्यात चूक होणारच नाही कारण सौ ताईमहाराजांचे बांधकाम असल्याने श्री महाराजांचे बुद्धि प्रेरणारुपाने मार्गदर्शन आहे. भीती होती ती चूक होण्याची पण महाराजांनी ती दूर केली.

तसेच ते कायम समोरच्याचा विचार करीत. समोरच्या माणसाला आपल्या भेटण्यात कष्ट पडू नयेत, अकारण पैसे खर्च करायला लागू नयेत. १९८० साली एकदा एक मोटे ९ दिवसांचे अनुष्ठान करायचे होते ते सुरु करण्यापूर्वी महाराजांचे आशीर्वाद घेण्याकरता पुण्याला गेलो. ते नेमके दौ-यावर गेले होते म्हणून परत पुढच्या रविवारी गेलो. ते म्हणाले, ''तुम्ही येऊन गेल्याचे कळले. काय काम होते ?'' त्यांना सांगितले काय काम होते ते. त्यावर ते म्हणाले, ''आम्हाला पत्र पाटवून विचारले असते तरी चालले असते उगीच इतक्या लांब यायचे वगैरे आज आम्ही तुम्हाला सांगून टेवतो तुम्ही कोणतेही पुण्यकर्म करा ईश्वराचे आशीर्वाद सदैव तुमच्या पाटीशी आहेत. पुन्हा प्रत्येक वेळेला विचारायला यायची आवश्यकता नाही.''

पूर्ण अमानित्व असल्यामुळे त्यांनी ''ईश्वराचे'' असा शब्दप्रयोग केला ''गुरुंचे'' असे म्हणाले नाहीत.

केवळ ते पुण्यात राहातात म्हणून कोणतेही कार्य असले की पुण्यात जाऊन खरेदी करावी अशी कांहीची भावना असते. महाराज ती स्वीकारुन व्यवहाराला धरुन म्हणत, खरेदी नेहमी स्थानिक बाजारात करावी. कांही कमी जास्त वाटले दुकानदार परिचयाचे असल्यामुळे माल परत करता येता, बदलून घेता येतो, भाव कमी जास्त करता येतो वगैरे

ते श्रीरेणुका निवासात राहायला आल्यानंतर लोकांचा राबता वाढल्यामुळे तेव्हांच्या तीन खोल्या अपु-या पडू लागल्या. सौ ताईमहाराजांच्या ही गोष्ट लक्षात आली आणि त्यांनी त्यांच्या विश्वासातल्या महाराजांच्या भक्ताला महाराजांच्याकरता एक खोली आणि देवाकरता एक खोली अशी बांधायची आज्ञा केली. महाराज त्याला परवानगी देईनात. ते म्हणाले, आम्ही वर्तक वाड्यात राहायला आलो तेव्हां सुरवातीला एकच खोली होती. पुढे दुसरीही मिळाली आणि शेवटी तर देवाच्या कृपेने तीसरीही मिळाली. गरज भागत होती. जागेचे असे आहे ती कितीही मिळाली तरी कमीच वाटते.

आपण विचारपूर्वक ठरवायचे आपल्याला खरोखर गरज किती आहे?

मुंबईच्या छोट्या जागेत एक रात्र राहाण्याचा प्रसंग आला तेव्हां यजमानाने संकोच्याने दिलगिरी व्यक्त केली तेव्हां त्याला वाईट वाटू नये म्हणून त्यांनी सांगितले, कानडीत म्हण आहे – जागा लहान असली तरी हरकत नाही मन मोटे असले म्हणजे झाले. .

अहंकाराचा वारा न लागो राजसा ।

माझिया विष्णुदासा ----

असा एक अभंग आहे. आपल्या अनुग्रहिताला अहंकाराचा वारा लागू नये म्हणून महाराज जागृक असत. १९८३ साली काशीयात्रेचा योग आला. महाराजांबरोबर मुंबईहून काही मंडळी गेली होती. महाराजांबरोबर संपूर्ण काशीयात्रा घडावी म्हणून त्यांनी तिथल्या संबंधिताला पैसे पाटवून १५ दिवसांनंतरची परतीची तिकीटे काढण्यास सांगितले होते. तो शेवटी क्षेत्रस्थ पुरोहित ! त्याने सरळ व्यवहारिक विचार केला इतकी माणसे १५ दिवस राहिली तर आपल्याला एकदाच पैसे मिळतील त्यापेक्षा यांना लवकर परत पाटवावे म्हणजे आपल्याकडे लोकांची आवक चालू राहून उत्पन्न चालू राहील. त्याने चारच दिवसांनंतरची महाराज आणि परिवार सोडून सर्वांची परतीची तिकीटे काढली. सगळे हिरमुसले झाले पण इलाज नव्हता. मे महिना असल्यामुळे कोणत्याच तारखांची तिकीटे मिळणे शक्य नव्हते.

एका गृहस्थाच्या वडिलांचे पहिले वर्ष श्राद्ध योगायोगाने त्या दिवसात येत होते. त्याने तसे महाराजांना सांगितल्यावर महाराजांनी श्री कृष्णा आर्वीकरांना विचारले की त्यांच्या ऐवजी हे गृहस्थ वडिलांच्या श्राद्धाकरता मागे राहिले तर चालेल का ? श्री आर्वीकरांनी आनंदाने होकार दिला आणि ते पुढे आले आणि हे गृहस्थ मागे थांबले.

५ व्या दिवशी निघताना सगळे मुंबईकर महाराजांच्या समोरच्या बाजूला उभे राहिले आणि हे गृहस्थ मागे राहाणार म्हणून महाराजांच्या बाजूला थांबले. सगळयांना यांच्या नशिबाचे कौतुक वाटले. पण यांना अहंकराचा वारा लागू नये म्हणून महाराज इतक्या खुबीदारपणे म्हणाले, तुमच्या सगळयांचे प्रतिनिधी म्हणून हे मागे राहिले आहेत.

दादरच्या एका दीक्षिताकडे त्याने बोलावल्यावर ते प्रथमच १९७८ साली त्याच्या घरी आले. या गृहस्थाला वाटले आता महाराज फक्त आपले आणि आपल्याकरता आले आहेत. ते दुपारी १२ च्या सुमारास आले. आल्यावर प्रासंगिक चार शब्द बोलल्यावर यजमानांना म्हणाले, आम्ही जरा विश्रांती घेतो तुम्हीही जेवून वगैरे घ्या. (ते जेवूनच आले होते)

त्याप्रमाणे महाराज पहुडल्यावर यांनी जेवून घेऊन गॅलरीत बसून तिथे गडबड गोंगाट होणार नाही इकडे लक्ष देत होते. संध्याकाळी

४।। च्या सुमारास दोन गृहस्थ त्यांचा पत्ता शोधत आले. त्यांनी विचारले, महाराज तुमच्याकडे आलेत ना ? यांना आश्चर्य वाटले. यांना कसे कळले ? यांनी विचारल्यावर ते म्हणाले, आम्हाला महाराजांनीच पत्राने कळवले होते आणि आता आम्ही त्यांना आमच्याकडे न्यायला आलो आहोत.

यजमान बघतच बसले. थोडा वेळाने महाराज उटले आणि औपचारिक चार शब्द बोलून यजमानांच्या कुटुंबीयांचे समाधान करुन त्या लोकांबरोबर त्यांच्याकडे गेले.

यजमानांचा गोड गैरसमज दूर झाला आणि त्यांना समजून चुकले की महाराज सर्वांचे आहेत आणि सर्वांना समाधान देण्याकरता आहेत फक्त आपले नाहीत. महाराज सर्वांचे आहेत आणि सर्व आपले आहेत.

असे त्यांचे अप्रत्यक्ष शिक्षण देणे चालू असे.

महाराजांच्या तोंडी नेहमी एक वाक्य असे – कलियुगात संघ शक्तिला महत्व आहे. धार्मिक असो किंवा सामाजिक असो कोणत्याही कार्याकरता संघ शक्तिची आवश्यकता असते. श्री

महाराजांनी अशा कार्याला योग्य अशा व्यक्तिंची निवड करुन त्यांना सेवेची संधी दिली. अशा लोकांना ते एकत्र आणत असत.

जालन्यातल्या दत्ताश्रमाची व्यवस्था लावण्याकरताही त्यांनी अशाच कांही लोकांना एकत्र आणून त्यांच्यावर ती जबाबदारी नुसती सोपवली नाही तर ती कशी पार पाडायची याचे सविस्तर मार्गदर्शन केले. यात सेवक भक्तांची आणि ताईंची भूमिका काय असावी हेही त्यांनी स्पष्ट केले. एवढेच काय पण त्यांनी ताईंच्या कुटुंबीयांनाही एक अप्रतिम पत्र लिहून त्यांची भूमिका काय असावी याचे मार्गदर्शन केले आहे.

१९९४ साली जालन्याच्या दत्ताश्रमात पहिला श्रीविष्णु पंचायतन याग झाला. त्याच्या तयारी करता आधी जाऊन राहाणे झालेच होते. तो संपल्यावर वाटले सगळे निघाले आहेत आता काय काम आहे आपल्यालाही लगेच निघायला हरकत नाही. याग संपल्याच्या दुस-या दिवशी महाराज हिंगोलीला जाणार होते. सकाळी सगळे महाराजांचा निरोप घेण्याकरता त्यांच्या खोलीत गेले. सगळयात शेवटी गेलो. जाताना स्थानिक व्यवस्थापकाला आमची आजची रात्रीची मुंबईची तिकीटे काढण्यास सांगितली. आंत दर्शनाला गेल्यावर महाराज प्रसन्नपणे हंसून म्हणाले, काय मुक्काम आहे ना?

आता काय बोलणार ? दोनच मिनिटांपूर्वी परतीची तिकीटे काढायला सांगितली होती. पण त्यांनी काय बुद्धि दिली तोंडून होकार बाहेर पडला. मग ते हंसत हंसत म्हणाले, हं! खरी कामे नंतरच असतात. मांडववाला, वाणी, दूधवाला, वगैरेंची बिलं चुकती करायची असतात. भाड्याने गाद्या, उशा, चादरी, खुर्च्या, स्वैपाकाची भांडी वगैरे आणलेले असते ते मोजून त्याचा हिशोब द्यायचा असतो. हे सगळे नंतरच करायचे असते.

एका छोट्या प्रसंगाने त्यांनी किती मोलाचे कायम स्वरुपी मार्गदर्शन केले !

१९८६ सालची गोष्ट आहे. श्रावणात नेहमीप्रमाणे महाराज तुळजापूर गाणगापूरच्या यात्रेला गेले. सोबत सौ ताईमहाराजही होत्या. तुळजाभवानीची महापूजा झाल्यावर महाराज, आईसाहेब आणि ताई पुजा-याच्या घरी आले. प्रसादाला वेळ होता. त्यांच्या एका हाताला त्या दोघी बसल्या होत्या. महाराज सहसा कोणत्याही स्त्रीकडे नजरेला नजर देऊन बोलत नसत. तसे आत्ता समोर पहात म्हणाले, काय गंमत आहे पहा. तुळजाभवानी ताईच्या रुपाने आपल्यात येऊन बसली आहे आणि लोक तिकडे मळवट भरायला जाताहेत.

ताई कोण आहेत हे महाराजांनी अशा प्रसंगाने उघड केले.

आपण जसे दुस-याला फसवायचे नसते तसेच आपणही फसवुन घ्यायचे नसते. आश्रमातून घरी किंवा घरुन आश्रमात रिक्षाने जाताना साधारणपणे किती भाडे व्हायचे हे त्यांना पक्के माहीत होते जर एखाद्या रिक्षावाल्याने त्यांच्याकडून जास्त भाडे घेतले तर त्याला ते त्याची जाणीव करुन देत.

प्रत्येकाने आपापली जबाबदारी टाळून देव धर्म भक्ति वगैरे करु नये असे त्यांचे मत होते. दादरच्या १० वी च्या परिक्षेला बसणा-या एका विद्यार्थीनीला तिच्या काकांनी महाराजांची दृष्टी पडावी म्हणून भिवंडीला महाराज आले होते तिथे संध्याकाळी नेले. तिला पहाता क्षणीच महाराज म्हणाले, ''आता तुम्ही इथे आलात म्हणजे तुमचा क्लास बुडला''

जेव्हां कोणी विद्यार्थी अपेक्षेपेक्षा कमी मार्कस मिळाले म्हणून तक्रार करी तेव्हां ते त्याला समजावताना सांगत, तुम्ही परिक्षकाला दोष देण्यापेक्षा त्याला अपेक्षित पेपर लिहिला नसावा. परिक्षेचा पेपर कसा लिहायचा हे समजून घ्या.

नीलाताईच्या नातवाला – आश्विनला त्यांनी अभ्यास कसा करावा याचे अप्रतीम मार्गदर्शन एका पत्रातून केले आहे.

महाराजांचा वक्तशीरपणा वाखाणण्यासारखा होता. दिवसें दिवस वाहानांची संख्या वाढत चालली आहे, वाहातुकीची कोंडी होऊन कधी

आपण अडकून पडू सांगता येत नाही. म्हणून महाराज प्रवासाला जाताना एक तास आधी रेल्वे स्टेशनवर जायला निघत. आणि तिथे जाऊन बसत.

त्यांच्या सहवासाला आसुसलेल्या भक्ताला ही सुवर्ण संधी असे. कारण महाराज पूर्णपणे निवांत असत आणि गाडी सुटेपर्यंत भरपूर बोलता येत असे. त्यामुळे त्यांना निरोप द्यायची संधी शक्यतो सोडली नाही.

एकदा ते मुंबई सेंट्रलहून राजधानी एक्स्प्रेसने दिल्लीला चालले होते. तिथे त्यांच्या हस्ते मूर्तीची प्राणप्रतिष्ठा होती. नेहमीप्रमाणे त्यांना निरोप द्यायला गेलो. आम्हाला आंत येऊन गैरसोय होऊ नये म्हणून ते डब्याच्या दारात येऊन आमच्याशी बोलत थांबले. गाडी सुटण्याची सूचना देणा-या घंटा व्हायला सुरवात झाली. त्यांनी आम्हाला निघण्यास सांगितले पण आमचा पाय काय निघतोय ! गाडी सुटेपर्यंत निघायचे नाही. राजधानी एक्स्प्रेसच्या खिडकीच्या काचेला काळी फिल्म लावलेली असल्याने खिडकीकडे जाण्यात अर्थ नव्हता म्हणून आम्ही दाराजवळच घुटमळत होतो. तेवढ्यात टी सी ने आम्हाला सांगितले ''तुम्ही पुढे जा तुम्ही ज्यांच्याशी बोलत होतात ते खिडकीजवळ येऊन तुम्हाला हात करताहेत.'' महात्म्याची दया काय असते आणि भावना त्यांच्यासारखी दुसरा कोणी जपूच

शकणार नाही. आम्हाला त्यांना ओळखण्यास त्रास पडू नये म्हणून त्यांनी खिडकीच्या कांचेला त्यांचा पंजा लावला होता. तो लावण्याकरता त्यांना ओणवे व्हावे लागत होते खिडकीजवळच्या सीटवर पण त्यांनी आमच्याकरता ते केले. काय याची उतराई होणार ?

साधारण १९८३ सालची गोष्ट आहे. त्या काळात त्यांचे बरेच वेळा पुढील कोणत्या तरी प्रवासाकरता मुंबईला येणे होई. भारताच्या काना कोप-यात जाणा-या ब-याचशा लांब पल्ल्याच्या मध्य व पश्चिम रेल्वेच्या गाडी रात्री सुटतात. णहाराजांना निरोप द्यायला जाणारे सर्वश्री नागले, श्रृंगारपुरे प्रभृती अशी ठरलेली मंडळी होती. कधी कधी गुजरातमध्ये जाणा-या गाड्या रात्री ११।। व त्याच्याही पुढे सुटत. मग गाडी गेली तरी महाराजांच्या आठवणीत रंगून जाण्यात किती वाजत याचे भान नसे. त्यामुळे घरी यायला चांगलाच उशीर. मध्य रात्र व्हायची. त्यामुळे दुस-या दिवशी नाही म्हटलं तरी उठायला उशीर, मग आन्हिकाला उशीर आणि शेवटी धावत पळत ऑफिसला निघावे लागे. हे सर्व अंगवळणी पडले होते. त्यातला आनंद सोडवत नव्हता. तरीही कधी तरी आपले पाप उफाळून येते आणि मनांत विकल्प निर्माण करते.

एकदा असाच विकल्प निर्माण झाला. महाराज त्यांच्या आप्तांकडे उतरले होते तिथून मुंबई सेंट्रलला जायचे होते. संवयीप्रमाणे ते तासभर आधी निघणार. वर उल्लेखलेला (रात्री घरी पोहोचायला उशीर, सकाळी उठायला उशीर वगैरे) उशीर होण्याचा विचार करुन आज कांही मुंबई सेंट्रलला जायचे नाही असे ठरवून त्यांच्या मुक्कामाच्या स्थळी गेलो. पण वात्सल्य काय असते ते अनुभवाला आले.

सांभाळूनी मार्गावरता आणिता न दुजा त्राता ।

त्यांना नमस्कार करायला वांकल्यावर त्यांनीच बोलायला सुरवात केली – काय आज मुंबई सेंट्रलला ----- हो पण मग घरी जायला खूप रात्र होते, त्यामुळे दुस-या दिवशी उठायला उशीर होतो, मग आन्हिकाला उशीर होतो आणि शेवटी ऑफिसला धांवपळ करीत जावे लागते१

मनांत जे विचार आले होते ते त्यांनी जसे न तसे बोलून दाखवले. त्यांना काय म्हणायचे होते ते त्यांनी दयाळुपणे समजावले. निरोपाच्या प्रथेत कशाला खंड पाडायचा ?

नमस्कार करुन तसाच तडक निघालो. घरी येऊन पैसे वगैरे बरोबर घेतले (कारण आपल्याला मुं सेंट्रलला जायचे नाही म्हणून रेल्वेचा पास, पैसे वगैरे कांहीच बरोबर आणले नव्हते) आणि

परस्पर मुंबई सेंट्रलला गेलो. महाराजांनी असे सिंक्रोनाझेशन केले की त्यांची कार पोहोचता पोहोताच तिथे जाऊन पोहोचलो. जराही वेळ गेला नाही.

त्यांच्या या जाणीव करुन देण्याने परत अशी चूक झाली नाही.

कोणालाही भेटायची वेळ दिली असेल त्या पूर्वी कमीत कमी १५ मिनिटे ते तयार होऊन बसत. समोरच्याच्या वेळेला महत्व देत.त्याचा वेळ जाऊं द्यायचा नाही.

१९७८ सालचा प्रसंग आहे. नुकताच त्यांच्या कृपाछत्राखाली आलो होतो. कांही नाजूक आणि महत्वाच्या गोष्टीत त्यांचे मार्गदर्शन घेण्याकरता पुण्याला गेलो. गेलो ते थेट त्यांच्या शनिवार पेटेतल्या वर्तक वाड्यातल्या घरीच गेलो. ते पूजा करीत होते. त्यांनी विचारल्यावर येण्याचे कारण सांगितले. त्यांनी विचारले, मुक्काम किती आहे ? म्हटलं, आपल्याला वेळ झाल्यावर आपल्याशी बोलेपर्यंत. मग त्याला कितीही वेळ लागो जर आपल्याला आज शक्य नसेल तर उद्या, परवा. पण आपल्याशी बोलल्याशिवाय जाणार नाही.

ते दुपारी ४ ते ६ आश्रमात जात. जरा इकडचे तिकडचे बोलणे झाल्यावर ते म्हणाले, तुम्ही आजच २ वा आम्हाला भेटा.

त्याप्रमाणे त्यांना भेटून पूर्ण मार्गदर्शन घेतले आणि त्याच दिवशी परत आलो.

त्यांनी त्यांच्या वेळात माझ्याकरता कपात केली. त्यांनी विचार केला असावा मला जर वेळ दिला नाही तर मला इथे मुक्काम करावा लागेल. आश्रमात तशी मुक्कामाची तेवढी सोय नव्हती. त्या पेक्षा आपली गैरसोय झाली तरी हरकत नाही पण मला वेळ देऊन मार्गदर्शन करुन परत पाठवणे श्रेयस्कर.

१९८५ सालच्या ऑगस्ट महिन्यातला प्रसंग. ताईच्या (जुन्या) आश्रमात श्री विष्णुयाग चालू होता म्हणून महाराजांचा मुक्काम होता. एक दिवस सकाळी ६।। च्या सुमारास अच्युतराव पोटभरे महाराजांना भेटायला आले. तत्पूर्वी महाराजांनी त्यांचे अंघोळीचे पाणी तापवण्यास सांगितले होते. पाणी तापायला किती वेळ लागतो पण महाराज पोटभ-यांसारख्या लेखकाशी बोलताहेत त्यांत व्यत्यय कसा आणायचा या विचाराने त्यांना कांही बोललो नाही. कांही वेळ झाल्यावर महाराजांनी विचारले, पाणी तापले की नाही ? म्हटलं, कधीच तयार आहे. ते म्हणाले, मग आम्हाला सांगायचे नाही का ! आम्ही आपले वाट बघत बसलो. हे काय (म्हणजे लोक भेटायला येणे) चालतच राहाणार. आपल्या वेळेचे काय ?

आमोदने एक प्रसंग सांगितला तो शाळेत असताना घडलेला. असेच लोक घरी येत होते महाराजांशी बोलत होते. हा तिथे बसून गप्पा ऐकत होता. बराच वेळ झाल्यावर महाराज त्याला म्हणाले, तुम्हाला अभ्यास नाही का ? इथे बसून गप्पा ऐकून काय होणार ? जा आपल्या उद्योगाला.

१९८५ सालपर्यंत महाराजांचा मुंबईकरांबरोबर कुटे ना कुटे तरी दौरा होत असे. योगायोगाने तो मार्च एप्रिलमध्ये होई. ते परिक्षेचे दिवस असल्यामुळे बायकांना त्यात सहभागी होता येत नसे. असाच १९८४ साली गुजरात दौ-याहून परतल्यावर बायका दर्शनाला आल्या तेव्हां त्यांनी प्रेमाने ही तक्रार केली. महाराज त्यांचे समाधान करीत म्हणाले, अहो खरी तीर्थयात्रा तुम्हालाच घडली. तुम्ही घरी राहून तीर्थक्षेत्र देवतांचे चिंतन करीत होतात आम्ही फक्त देहाने जाऊन आलो. खरे पुण्य तुम्हालाच आहे.

असे समाधान दुसरे कोण करु शकेल ?

टिं.म.वि.त अध्यापन करीत असताना जर दुस-या दिवशी कांही कारणाने विद्यालयात जाणे शक्य नसेल तर फोनची सोय त्या काळात नसल्याने ते आधल्या दिवशी संबंधित विद्यार्थ्याकिडे जाऊन त्याला कळवीत असत.

विरारच्या कडीकरांना एका गुरुपौर्णिमेला बॉसने रजा मंजूर न केल्याने पुण्याला जाता येत नव्हते. सहाजिकच त्यांना अतिशय वाईट वाटले. अशा वेळी मन भरकटू लागते. नको ते विचार मनांत येतात. यांचेही तसेच झाले. यांनी विचार केला आपण गेलो नाही तर काय फरक पडणार आहे ? इतक्या शेकडो लोकांच्यात महाराजांना आपले थोडेच स्मरण राहाणार ? कार्यक्रम व्हायचा तो होणारच आहे तो कांही थांबणार नाही वगैरे

दुस-या दिवशी वसईचे राऊत गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने आश्रमात गेले होते. महाराज त्यांच्याशी कधी बोलले नव्हते. कधी वेळच आली नव्हती बोलण्याची. पण आज आली. दर्शनाकरता रांग लागली होती. रांगेत त्यांचा नंबर लागल्यावर त्यांनी महाराजांना नमस्कार करुन काय हार श्रीफळ दक्षिणा वगैरे अर्पण केले. आणि जाणार स्वढ्यात महाराजांनी त्यांना थांबवून विचारले, तुम्ही विरार वगैरे भागातच कुठे राहाता ना ! कडीकरांना ओळखता का ?

राऊतांनी होकार दिल्यावर त्यांच्या हातात प्रसाद देत महाराज म्हणाले, हा प्रसाद त्यांना द्याला का ? त्यांना सांगा आम्हाला त्यांची आटवण आहे बरं का !

शक्य असेल तिथे आपल्याला नको असलेली गोष्ट कशी टाळायची हे ते मोटया चातुर्याने साधत असत. आम्हाला वाटे त्यांनी रेल्वेचा

फर्स्ट क्लासने आरामात प्रवास करावा त्यांना ते नको असे. पण नकार स्पष्ट न देता खुबीने म्हणत, अहो, आमची प्रकृती चांगली आहे आम्हाला सेकंड क्लासचा प्रवास झेपतो त्रास होत नाही. शिवाय तुम्ही सगळे एकत्र प्रवास करायचा आनंद घेणार आणि आम्ही भुतासारखे एकटे फर्स्ट क्लासमध्ये बसणार हे बरोबर वाटत नाही. शिवाय फर्स्ट क्लासच्या तिकीटाकरता पैसे खर्च करण्यापेक्षा ते देवकार्याकरता खर्च करावेत. देवाला अभिषेक, महापूजा वगैरे करावी.

आश्रमातल्या मोटया महाराजांच्या देव्हा-यावरच्या फोटोला मोघेंकडून रोज हार येत असे. प्रसंगाने ते आश्रमात प्रसादाला येत असत. एकदा असाच प्रसाद होता आणि महाराजांनी आश्रमातल्या मंडळींना त्यांना आटवणीने आमंत्रण द्यायला सांगितले होते. दुस-या दिवशी हॉलमध्ये पाने घेतली होती. सगळे जण येऊन बसले आणि महाराजही येऊन बसले. त्यांनी नजर फिरवल्यावर त्यांच्या लक्षात आले की मोघे आलेले नाहीत. इकडे तर पंगतीत बसलेले लोक जेवण सुरु करायला उत्सुक होते. आता सगळयांच्या समोर मोघेंना आमंत्रण दिले होती की नाही, ते कां आले नाही वगैरे प्रश्न विचारण्यात अर्थ नव्हता. महाराजांनी एक सुंदर आयडिया केली. त्यांनी आपोशन घेण्याकरता पाणी ओंजळीत घेतले लगेच सर्वांनी घेतले आणि त्यांना माहीत होते की आता महाराज ते आपोशन घेणार म्हणून महाराजांनी घेण्याची वाट न पहाता महाराजांनी तोंडाजवळ

ओजळ नेऊन  आपोशन घेतल्यासारखे केले. झालं सर्वांनी लगेच आपोशन घेऊन जेवायला सुरवात करताच महाराज पटकन उठले आणि ऑफिसात आले. तेव्हां समजले की अनवधानाने म्हणा आणखी कशाने म्हणा मोघेंना आमंत्रण दिले गेले नव्हते. महाराजांनी ताबडतोब कोणाला तरी मोघेंच्या कडे निरोप देऊन पाटवले की महाराज त्यांच्याकरता थांबले आहेत त्यांनी लगेच यावे वगैरे. त्याप्रमाणे ते आले. पंगतीत बसलेल्यांना कोणाला पटकन समजलेच नाही काय झाले ते. प्रसंग निभावून गेला.

एका अधिकारी व्यक्तिच्या घराचा प्लॅन तयार करायचा होता. आता सर्व साधारणपणे कुटुंबातील जबाबदार व्यक्ति पुढाकार घेऊन सर्वांना कुटे विचारत बसायचे असा विचार करुन त्याला योग्य वाटेल तसा निर्णय घेत असते. पण या कुटुंबाशी महाराजांचा जवळून संबंध होता आणि महाराजांच्या सांगण्याप्रमाणे ते प्लॅन टरवणार होते. महाराजांनी आणि कुटुंबप्रमुखाने विचार विनिमय करुन प्लॅन टरवला असता आणि महाराजांनी ती जबाबदारी विश्वासू माणसावर सोपवली होती त्याने पुढची कारवाई केली असती. त्याप्रमाणे महाराजांनी त्यांच्या विश्वासातल्या व्यक्तिवर घराचा प्लॅन करायची जबाबदारी सोपवली पण त्याला अत्यंत महत्वाची आणि नाजूक सूचना केली ती अशी की ''तुम्ही एकांगी निर्णय न घेता त्यांच्याकडे जाऊन त्या सर्वांना – मुले, सूना, यजमान – एकत्र बोलावून त्यांना आधी विचारा त्यांची त्यांच्या नियोजित घराची संकल्पना काय आहे. उद्या असे व्हायला नको त्यांना काय समजते आपण आपले आपल्या विचाराने चांगले घर बांधू असे टरवून प्लॅन केला पण त्यात राहाणारे जे आहेत त्यांचा विचारच केला नाही तर ते उद्या

तुम्हाला दोष देऊ शकतात आणि म्हणू शकतात "त्यांनी घरी बांधले खरे आपण आम्हाला कसे घर हवे होते हे कुठे विचारले वगैरे"

तसेच बांधकामाकरता स्थानिक आर्किटेक्ट, सिव्हिल इंजिनियर, ठेकेदाराची नियुक्ती करावी. उद्या कांही कमी जास्त झाले असता त्यांना जबाबदार धरता येते. मुंबई पुण्याहून हे प्रोफेशनल लोक केवळ महाराजांच्या परिचयातले आहेत म्हणून नेऊन त्यांच्याकडून काम करुन घेण्यात अर्थ नाही. उद्या कांही कमी जास्त झाले बांधकामात तर इतक्या लांबून ही मंडळी वारंवार जाऊ शकणार नाहीत.

तोच दृष्टीकोन त्यांचा कार्याच्या निमित्ताने कोणतीही खरेदी करण्याचा असायचा. केवळ महाराज पुण्यात राहातात म्हणून पुण्यात सर्व खरेदी करणे अव्यवहार्य आहे असे त्यांचे मत होते. ते म्हणत यज्ञ याग असोत किंवा लग्न मुंज असो आपण स्थानिक बाजारातून खरेदी केल्यावर कांही कमी जास्त वाटले तर आपल्याला तो माल परत करायची, बदलून घेण्याची संधी असते. पुण्यात खरेदी केली आणि असे कांही झाले तर प्रत्येक वेळी काय पुण्याला येणार हे निस्तरायला ?

१९८५ साली जालन्यातल्या कादाबादमधल्या मन्नालालच्या घरी ते श्री भागवत सप्ताहाच्या निमित्ताने उतरले होते. त्यांना उतरायला स्वतंत्र सेल्फ कंटेन्ड खोली दिली होती. त्यांच्या बरोबरच्या सेवकाने रात्री महाराजांना पाय धुण्यास उटावे लागते तेव्हां दिसावे म्हणून बाथरुमचा दिवा चालू टेवला. त्याने काय विचार केला शेटजी रात्रभर दिवा चालू टेवण्यास हरकत घेणार नाहीत उलट त्यांना आनंदच होईल. त्याप्रमाणे महाराज रात्री दोन वेळा उटले आणि पाय धुऊन आले. पण दुस-या दिवशी महाराजांनी त्याला समजावताना सांगितले, रात्रभर दिवा चालू टेवायची आवश्यकता नाही. आम्ही इथे आल्यावर एकदा बटने कुटे आहेत ते पाहून घेतो आणि त्या अंदाजाने रात्री उटून तिथे जाऊन बटने लावतो. तेवढ्याने काम भागते रात्रभर दिवा टेवायची गरज नसते.

त्याच मुक्कामात त्यांच्या बरोबरच्या गृहस्थाने महाराजांचे धोतर व उपरणे धुताना २ चमचे सर्फ टाकला. णहाराजांनी नंतर त्याला त्याने किती सर्फ टाकला विचारले. त्याने सांगितले. महाराज एवढेच म्हणाले, इतका साबण फुकट घालवायची गरज नव्हती. दोन कपड्यांना असा किती साबण लागणार ?

मुंबईत त्यांच्या अनुग्रहिताकडे मुक्कामाला आले असता कोणी त्यांच्याकडे मंत्र दीक्षा घेण्यास आले. महाराजांनी यजमानांकडे एक कागदाचा तुकडा मागितला. यजमानाने विचार केला महाराजांना तुकडा कशाला द्यायचा आख्खा कागदच देऊ ना ! म्हणून त्याने ताव पेपर दिला. महाराजांनी सांगून पाहिले एवढा मोटा कागद नको पण यजमानांना पटले नाही. णहाराजांनी कागद घेतला त्यावर दोन ओळीचा मंत्र आलेल्या माणसाला लिहून दिला आणि तेवढी प ट्टी फाडून कागद परत केला कांही बोलले नाहीत.

त्यांचा व्यवस्थितपणा प्रत्येक गोष्टीत पहायला मिळत असे. धोतर बदलून सोवळे नेसताना ते धोतराच्या नि-या धरुन अशा त-हेने गुंडाळत की परत धोतर नेसताना त्यांना नि-या करायची वेळ येऊ नये.

काशीत श्राद्धाच्या वेळी ते भाताचे गोळे इतके सुंदर गोलाकार करीत की जणु कांही यंत्रातून एक सारखे काढले आहेत.

त्यांच्या पिशवीतही कुटे काय टेवले आहे हे त्यांना अगदी अंधारात जरी पिशवीत हात घातला तरी सापडत असे.

आश्रमाच्या निधीच्या गुंतवणुकीच्या दृष्टीने कोणत्या कंपनीत जास्त व्याज मिळेल याची ते भेटणा-या लोकांजवळ चौकशी करीत. पण नंतर लक्षात येई की त्यांनी जरी आपल्याला विचारले असले तरी त्यांना आधीच याची व्यवस्थित व अचूक माहीती आहे.

त्यांच्या पत्र व्यवहाराच्या बाबतीतही त्यांचा व्यवस्थितपणा दिसून येई. ते पत्रांचे तीन गठ्ठे करीत – आलेल्या पत्रांचा, उत्तर पाटवलेल्या पत्रांचा आणि उत्तर पाटवायच्या पत्रांचा. आणि त्यावर तसे लिहिलेले असे. पत्रोत्तर शक्यतो तत्परतेने देत. अगदीच कधी दौ-यावर असल्यामुळे उशीर झाला तर तशी दिलगिरी पत्रात व्यक्त करीत. प्रचंड लोकसंग्रह असल्याने पत्र व्यवहारही तेवढ्याच प्रमाणात होता. लांब राहाणा-या आणि ज्यांना पुण्याला त्यांना भेटायला येणे परवडत नाही अशा लोकांना त्यांच्या पत्राव्दारे सुस्पष्ट मार्गदर्शन असे.

१९७८ मध्ये त्यांच्याशी संपर्क आल्यानंतर एकदा असे घडले की ते मुंबईत येऊन गेले पण कळलेच नाही. जर आधी समजले असते तर दर्शन झाले असते. नंतर दर्शनाला गेल्यावर सहजी ही गोष्ट त्यांच्या कानावर घातली. त्यांनी पत्ता विचारुन घेतला आणि नंतर जेव्हां जेव्हां ते मुंबईला येत तेव्हां तेव्हां आगाऊ पत्र पाटवून

त्यांचे उतरायचे ठिकाण, किती दिवस मुक्काम, काय कार्यक्रम आहे ते कळवीत त्यामुळे त्यांच्या दर्शनाचा लाभ होत असे.

एकदा त्यांनी श्री नागले यांना पोस्ट कार्डव्दारे एक मंत्र कळवला. आता सर्व सामान्य नियमाप्रमाणे मंत्र षट्कर्णी होऊ नये. महाराजांनी आपल्या सामर्थ्याने ती ही काळजी घेतली. पोस्टमनने ते पत्र दुपारी जेव्हां घरात टाकले तेव्हां सौ नागल्यांची अडचण होती त्यांनी महाराजांचे अक्षर ओळखून त्यांच्या धाकट्या अभिजितला ते उचलून देवाच्या फळीवर ठेवायला सांगितले. त्यामुळे दुसरे कोणी वाचायचा प्रश्नच आला नाही.

## अमानित्व

श्रीगुरुमहाराज वाडीला गेले म्हणजे एक दिवस त्यांच्याबरोबर गेलेल्या भक्तांबरोबर स्नान करीत आणि त्या वेळी आपल्या पवित्र हातांनी या मंडळीवर तीर्थाचे पाणी उडवीत. महाराजांनीही आपल्यावर तसे तीर्थ प्रोक्षण करावे असे वाटून त्यांच्या अनुग्रहित मंडळींनी त्यांना तशी प्रार्थना केली. पण महाराजांनी त्यांना होकार

द्यायच्या ऐवजी प प श्री नारायणस्वामींच्या चरित्रातील प्रसंग सांगितला. तो थोडक्यात असा – नारायण स्वामी दत्तप्रभुंचे मोटे अधिकारी भक्त. त्यांची परिक्षा पहाण्याकरता दत्तप्रभुंनी वाडीच्या जवळच्या गांवातील एका कुष्ठ रोग्याला दृष्टांत देऊन सांगितले त्याने वाडीला जाऊन नारायण स्वामींबरोबर तीर्थ स्नान करावे म्हणजे त्याचे कुष्ठ जाईल. त्याप्रमाणे तो आला आणि स्वामींबरोबर स्नान करण्याकरता गेला. स्वामींच्या ते लक्षात आले आणि त्यांनी त्याच्याबरोबर स्वतः स्नान न करता त्याला मनोहर पादुकांच्या समोर नेले आणि तिथे एकट्याला स्नान करायला लावून त्याचे कुष्ठ बरे केले. वगैरे

समजणारे समजले आपल्याला महाराजांबरोबर स्नान घडणार नाही.

औरंगाबादचे एक भक्त नियमितपणे गुरुव्दादशीला वाडीला जात असत. १९९४ सालचा प्रसंग आहे. ते वाडीला गेले त्यांनी महापूजा केली आणि रात्री महाराजांना कृतज्ञतेने सांगितले की महाराजांच्यामुळे त्यांना किती आनंद मिळाला वगैरे. महाराजांनी सर्व शांतपणे ऐकून घेतले आणि नंतर म्हणाले, अहो, तुम्ही इतक्या दूरवरुन आपल्या देहाला प्रवासाचे कष्ट देऊन इथे

आलात, आपल्या खर्चाने तुम्ही दत्तप्रभुंची महापूजा केलीत त्याचे फळ म्हणून त्यांनी तुम्हाला हा आनंद दिला. आमचा संबंध येतो कुठे ?

याच गृहस्थांवर महाराजांनी कशी कृपा केली तोही प्रसंग पहाण्यासारखा आहे. असेच एके वर्षी वाडीला जाण्याकरता त्यांच्याकडे पुरेसे रोख पैसे नव्हते आणि बँकेतही नव्हते. मन तर वाडीला जाण्याकरता ओढ घेत होते आता काय करायचे ? गुरुव्दादशी जवळ आल्यावर तर ती उत्कटता शिगेला पोहोचली. एक दिवस आपल्या खात्यात मिनिमम बॅलन्स आहे हे माहीत असून ते झपाटल्यासारखे बँकेत गेले, पैसे काढायचा फॉर्म भरला आणि आश्चर्य म्हणजे त्यांना पैसे मिळाले. ते घेऊन हे घरी आले वाडीची यात्रा झाली सगळे झाले. नंतर या गृहस्थांना या चमत्काराचा उलगडा करावासा वाटून ते बँकेत गेले आणि त्यांनी विचारले यांना त्या दिवशी पैसे मिळाले कसे ? मॅनेजरने संबंधित क्लार्कला बोलावून विचारले यांच्या खात्यात पैसे नव्हते तर यांना दिले कसे ? तो म्हणाला, पैसे होते म्हणून तर दिले.

यांनी सांगितले यांनी तर पैसे भरले नसल्याने पुरेसे बॅलन्ससुद्धा नव्हते मग पैसे कसे आले ?

त्या क्लार्कने त्या दिवशीचे रजिस्टर काढून पाहिले तर दुस-या कोणी तरी भरलेले पैसे त्याने चुकून यांच्या खात्यात भरले होते.

श्रीगुरुचरित्रातल्या ३२ व्या अध्यायाचे स्मरण होते.

प पू श्रीगुरुमहाराजांच्या एका अनुग्रहिताच्या मनांत काय विकल्प आला आणि त्याने महाराजांच्याकडे जाणा-या अनुग्रहिताला विचारले, ''महाराज जर उत्तराधिकारी आहेत तर आश्रमात ते गुरुमहाराजांच्या गादीवर कां बसत नाहीत ? त्यांना विचारा''

त्याने वर तारे तोडले की मग असे समजायचे का की महाराजांना न्यूनगंड आहे, आपण गुरुमहाराजांच्याइतके सामर्थ्यशाली नाही ?

ज्याला या माणसाने विचारायला सांगितले त्याने ते प्रांजळपणे व स्वच्छ मनाने महाराजांना विचारले. वरकरणी कुत्सित वाटणा-या प्रश्नामुळे महाराजांची उत्तुंगता कशी आभाळाला पोहोचलेली आहे हे प्रगट झाले. महाराज प्रश्न ऐकून हंसून म्हणाले, अहो, गुरुमहाराज देहात असताना आम्ही त्यांच्यासमोरसुद्धा कधी बसलो नाही आणि ते देहात नाहीत असे आम्ही मानत नाही. ते आहेतच मग आम्ही त्यांच्या गादीवर कसे बसायचे ?

याला पुष्टी देणारा एक प्रसंग नमूद करावासा वाटतो. दीक्षा झाल्यावर महाराजांच्या सहवासात आश्रमामध्ये दोन दिवस राहून गेल्यावर एकाने महाराजांना त्याला या दोन दिवसात किती आनंद मिळाला ते पत्रात लिहिले. महाराजांनी उलट टपाली पाटवलेल्या पत्रात लिहिले – ईश कृपेने आपल्या मनाची गडबड थांबून आपल्याला शांती मिळाली हे वाचून समाधान वाटले. श्री महाराजांचा (म्हणजे गुरुमहाराजांचा) श्रीवासुदेव निवास येथे साक्षात निवास आहे अशी आमची भावना अनुभवाने आहे आपलीही तशीच असावी.

म्हणजे उद्या कोणी असे परत म्हणू लागला तर त्याने त्याच्या आनंदाचे श्रेय गुरुमहाराजांना द्यावे.

श्रीगुरुमहाराजांबरोबर असताना लोकांनी आपल्याला नमस्कार करु नये म्हणून ते गुरुमहाराजांच्याजवळ कधी थांबले नाहीत.

त्यांचा उत्कर्ष, लोकसंग्रह, लोकोद्धाराचे कार्य वगैरे सहन न होणारे असुरी प्रवृत्तीचे लोक होतेच. महाराज गुरुमहाराजंप्रमाणे वागत नाहीत म्हणजे सामुदायिक साधना घेत नाहीत वगैरे म्हणजे यांच्याकडे ती शक्ति जागृती करुन देण्याची योग्यता नाही इत्यादि. तेव्हां त्यांच्यापैकी एका खट माणसाने महाराजांना

विचारले आपण अमक्याला दीक्षा कशी दिलीत ? ते म्हणाले, आम्ही कोणालाच दीक्षा देत नाही. आम्ही त्या जीवाचे कल्याण होवो अशी ईश्वराजवळ प्रार्थना करतो.

त्यांना जर कोणी दैनंदिन पूजेत ठेवण्याकर पादुका त्यांच्या पायात घालून देण्याची विनंती केली तर ते आश्रमात पादुका पूजनाकरता ज्या चांदीच्या पादुका आहेत त्यांना खुबीने स्पर्श करुन देत.

एखाद्या कुटुंबात किंवा आश्रमात, स्थानात जे पूर्वापार चालत आले आहे त्यात ते कधी आपणहोऊन बदल सुचवत नसत.

समोरच्याचे मन सांभाळायचे कसे हे त्यांच्याकडून शिकावे. एका गृहस्थाकडे त्यांचे ७-८ दिवस राहाणे झाले. परत गेल्यावर त्यांनी लिहिलेल्या पत्रात म्हणतात, तुम्ही आम्हाला इतके आपुलकीने वागवले की घरची आटवणसुद्धा येऊं दिली नाहीत.

१९८० साली श्री नागल्यांच्या गांवी – हरिहरेश्वर येथे त्यांचे चार पांच दिवस राहाणे झाले. तिथून परत गेल्यावर नागल्यांच्या पत्रात

त्यांनी लिहिले हरिहरेश्वरच्या मुक्कामात चांगली विश्रांती मिळाल्याने त्यांचा मूळव्याधीचा त्रास कमी झाला.

सर्व सामान्यपणे ड्राइव्हर किंवा अन्य सेवकवर्गाची कोणी फारशी दखल घेत नाही. पण उदाहरणादाखल सांगायचे तर महाराज बीडच्या डॉ दिलीप देशमुखांकडे गेल्यावर त्यांच्या हॉस्पिटलमधल्या सर्व श्रेणीतील सेवकवर्गाची आवर्जुन चौकशी करीत. डॉक्टरांनी त्यांना पुढच्या प्रवासाकरता कारची व्यवस्था केली तर नंतर पाटवलेल्या पत्रात वाक्य असे ''तुमच्या चालकांनी इतकी सुंदर कार चालवली की आम्हाला जराही त्रास झाला नाही''

# चमत्कार

श्रीगुरुमहाराजांच्या पुण्यातिथी उत्सवात रथ यात्रा निघत असे. आश्रमाच्या भोवती फिरुन यायला तिला दोन तीन तास लागत कारण त्यात लेझिम, भजन वगैरे चाले. त्या रथात महाराज बसत. एकदा महाराज रथात बसले आणि रथयात्रा सुरु होण्यापूर्वी एक मुलगा आला आणि त्याने महाराजांना नमस्कार केला. महाराजांनी अभावितपणे बाजूला पाहिले खडीसाखर आहे का. नव्हती. हे सर्व श्री व सौ नागले आश्रमाच्या दारात उभे राहून पहात होते. सौ नागल्यांनी शशीकांतना ऑफिसातून खडीसाखर आणून महाराजांच्या बाजूला टेवण्यास सांगितले. त्याप्रमाणे शशीकांत ऑफिसमध्ये गेले आणि त्यांनी खडीसाखर मागितली. तेव्हां खडीसाखरेची छोटी प्लास्टिकची पुडी आश्रमाच्या ऑफिसात महाराजांना प्रसाद म्हणून देण्याकरता टेवलेली असे. स्वैपाकघरातून वाटी घेऊन त्यात खडी साखर टेवून त्यांनी ती महाराजांच्या बाजूला टेवली. तो मघाचा मुलगा हे पहात होता. त्याने येऊन नमस्कार केला महाराजांनी खडीसाखर दिली. झालं. नंतर रथयात्रा संपेपर्यंत किती जणांनी खडीसाखरेचा प्रसाद घेतला याचा हिशोबच नाही. यात्रा

संपल्यावर नागल्यांनी उत्सुकतेने पाहिले तर खडी साखर होती तेवढीच होती.

असाच प्रसंग १९८४ साली व्दारकेत घडला. व्दारकाधीशाचे दर्शन घेऊन सगळे बाहेर आले. पुजा-याने महाराजांच्या हातात चिमूटभर सुंटवडा की काय दिले होते. आम्हाला त्यातला कण पाहिजे होता कारण देवाचा प्रसाद देवाच्याच हातातून घ्यायचा होता. आम्हाला घेताना पाहिल्यावर तिथल्या प्रांगणात जे कोणी होते ते सगळे प्रसाद घेऊ लागले. त्या चिमूटभर प्रसादाचा किती जणांना लाभ झाला याचा हिशोबच नाही.

महाराजांनी चमत्कार केले नाहीत ते झाले.

१९८५ साली एकदा सौ ताईमहाराजांच्या आज्ञेचे पालन करण्यासंबंधात महाराजांना भेटणे आवश्यक होते. गुरुवारी सर्वश्री नागले, श्रृंगारपुरे, मुजुमदार, म्हसवडकर प्रभृती भेटले आणि टरले की शनिवारी महाराज खर्ड्याला आहेत तिथे त्यांना जाऊन भेटून ताईंनी सोपवलेल्या कामाबाबत चर्चा करायची. हा बेत कोणालाच कळू दिला नव्हता.

त्याप्रमाणे शनिवारी दुपारी ऑफिस करुन ही मंडळी म्हसवडकरांच्या कारने निघाली वाटेत श्रृंगारपुरेंकडे नागले भेटणार होते त्यांना घेऊन पुढे जायचे होते. तिथे गेल्यावर सौ श्रृंगारपुरेंनी

दार उघडले आणि गंमतीने म्हणाल्या, चोर पकडले. सर्वांना आश्चर्य वाटले. यांना कसं कळलं ? त्या म्हणाल्या, महाराजांनी कळवलं.

म्हणजे ?

हे पहा महाराजांचे पत्र.

महाराजांनी पत्र लिहून कळवले होते की ते शनिवारी खर्ड्यात नसून पुढच्या दौ-यावर जाणार आहेत तेव्हां आम्ही त्यांना नंतर पुण्यात येऊन भेटावे.

त्या काळात कुरिअर नव्हते, स्पीड पोस्ट नव्हते, आम्ही तर महाराजांना फोन केला नव्हता, मग खर्ड्यासारख्या खेडेगांवातून पत्र मुंबईला एका दिवसात येतेच कसे ? बरं पत्र तर पोस्टाचे होते पण त्यावर पोस्टाचा राऊंड स्टॅंप नव्हता.

खर्ड्यात एकदा यज्ञ चालू होता बरीच मंडळी जमली होती भंडारा व्हायचा होता आणि अचानक गांवापासून थोड्या अंतरावर पावसाचे ढग जमा झाले आणि पाऊस पडू लागला होता. एकाने महाराजांना हे येऊन सांगितले. महाराज म्हणाले, तोही प्रसादाकरता आला आहे. एक प्रसादाचे पान वाढून त्याला पुढे नेऊन टेवा म्हणजे झाले.

नंतर अन नदान वगैरे निर्विघ्नपणे पार पडले हे सांगायला नकोच.

मुंबईतल्या एका बाल भक्ताची पाट दुखत होती म्हणून त्याने इलेक्ट्रिक हीटिंग बॅग पाटीखाली घेतली शेकायला. त्या बॅगेला थर्मोस्टॅट सर्किट नसल्याने तपमानावर नियंत्रण नव्हते. त्याला शेकताना झोप लागली आणि नंतर थोडा वेळाने महाराजांनी त्याला उटवले. पहातो तो गादीने पेट घेतला होता पण याला जराही भाजले नव्हते कारण ज्वाळा खाली जात होत्या. ज्वाळा कधी अधोमुखी नसतात. पण याला चटकाही बसला नव्हता.

देऊळगांवराजातला प्रसंग आहे. एका व्यापारी गृहस्थाने स्वतः सांगितलेला. एकदा असाचा कांही धार्मिक कार्यक्रम होता आणि या गृहस्थांकडे भोजन व्यवस्था होती. यांनी मर्यादित स्वैपाकाचा शिधा आणला होता आणि प्रत्यक्षात गर्दी वाढू लागली. त्या वेळी महाराजांच्या मातोश्री आणि पिताजी दोघेही तिथे उपस्थित होते. एकंदर परिस्थिती पाहून मातोश्रींनी महाराजांना अन्नपूर्णेची प्रार्थना करण्यास सांगितली. त्याप्रमाणे महाराजांनी स्वैपाक घरात जाऊन स्वैपाकावर तीर्थ प्रोक्षण करुन अन्नपूर्णेची प्रार्थना केली आणि तेवढ्याच स्वैपाकात असंख्य लोक जेवून गेले.

असाच प्रसंग ठाण्यात १९८८ साली झाला. ठाण्यातल्या चार्टर्ड अकाऊंटंट श्री पटवर्धनांच्या ऑफिसात आपटे मुनिमजी होते. त्यांची इच्छा होती त्यांच्या ऐंद्री शांती सोहळयाकरता महाराजांनी यावे. पटवर्धनांचे आणि महाराजांचे खूपच घनिष्ठ संबंध असल्याने महाराजांनी होकार दिला. ब्राम्हण सभेत महाराजांची उतरायची व्यवस्था होती आणि तिथेच शांतीचा कार्यक्रम होणार होता. संध्याकाळी महाराजांचे प्रवचन असे. शांतीचा कार्यक्रम खाजगी असल्याने आपटेंनी आपल्या आप्तेष्टांनाच जेवायचे आमंत्रण दिले होते.

आता महाराज आलेत समजल्यावर लोकांची दर्शनाला रीघ लागायची. सकाळी आलेल्या लोकांना महाराज प्रसादाला थांबायचा आग्रह करीत. आणि मर्यादित २०-२५ माणसांकरता केलेल्या स्वैपाकात अनेक लोक जेवून जात होते. यजमानांच्या शेवटच्या दिवशी ते लक्षात आले आणि त्यांना आपली चूक समजून येऊन त्यांनी दिलगिरी व्यक्त केली. महाराजांना बोलावल्यावर अन्नदान करायचे असते हे आपल्याला समजायला पाहिजे होते असे त्यांनी प्रांजळपणे कबूल केले.

पुण्यातला प्रसंग आहे. आश्रमाजवळ राहाणारी एक भक्त बालिका रोज संध्याकाळी महाराजांच्या दर्शनाला येत असे. दर्शन घेतले की वर गुरुमहाराजांच्या खोलीत जाऊन साधना करी. नंतर महाराज घरी जाण्यापूर्वी साधना आटोपून दर्शन घेत असे. एकदा तिची साधना खूपच लांबली आणि ती खाली आली तेव्हां महाराज आधीच घरी गेल्याचे तिला समजल्यावर मनाला दर्शन झाल्याची चुटपुट लागली. ठीक आहे आता काय करणार ! घरी जाण्यापूर्वी तिने मागे औदुंबराला प्रदक्षिणा घालून परत हॉलमध्ये येऊन दर्शन घेतले आणि बाहेर पडणार एवढ्यात सहज ऑफिसमध्ये पाहिले तो महाराज खुर्चीवर येऊन बसले होते आणि त्यांच्याबरोबर सौ सवितावहिनी होत्या. हिंला आश्चर्याचा धक्का बसला कारण सर्व सामान्यपणे महाराज एकदा संध्याकाळी आश्रमातून घरी गेल्यावर परत येत नसत.

कांही असो तिला दर्शन झाल्याचा आनंद झाला. दुसरे दिवशी तिने सहज सवितावहिनींना विचारले त्या कशा काय महाराजांबरोबर आश्रमात आल्या ? त्या म्हणाल्या त्या तर आल्या नव्हत्याच पण महाराजही आश्रमातून घरी आल्यावर बाहेर पडले नव्हते.

खऱ्याच्या एका भगिनीचा अनुभव असाच विलक्षण आहे. वरच्या प्रसंगात तर महाराज देहात होते पण हा प्रसंग त्यांनी देह टेवल्यावर कांही वर्षांनी झाला आहे. यांचे यजमान ग्राम सेवक म्हणून नोकरी करीत होते. ते निवृत्त होण्यापूर्वी गेले. हिच्यावर कुटुंबाच्या पोषणाची जबाबदारी येणे स्वाभाविक होते. पण आता पेन्शन कसे मिळेल हे पहाण्याकरता ती ग्रामपंचायतीच्या ऑफिसात गेली. संबंधित अधिका-यांनी सांगितले तिने यजमानांचे सर्व्हिस बुक आणून द्यावे म्हणजे त्याच्या आधारे ते पेन्शन किती द्यायचे ते टरवतील. आता हिच्यासारख्या साध्या नोकरी न करणा-या गृहिणी स्त्रिला ऑफिसच्या नियमांची माहीती नव्हती. तिंने त्या अधिका-याला सर्व्हिस बुक म्हणजे काय विचारले. त्याने समजावले आणि सांगितले की तिच्या यजमानांच्या कागदपत्रात ते सांपडेल कारण प्रत्येक शासकीय कर्मचा-याला ते मेन्टेन करावे लागते. तिंने सर्व घर धुंडाळले पण ते कांही सांपडले नाही. कारण या गृहस्थाने ते मेन्टेनच केले नव्हते. आता सर्व्हिस बुक नाही तर पेन्शन नाही. त्या अधिका-याला कांही तरी मार्ग काढण्यास सांगितल्यावर तो म्हणाला मग निदान या गृहस्थांनी जिथे जिथे काम केले त्या त्या ऑफिसकडून तसे लिहून आणा.

तेही हीला जमवण्यासारखे नव्हते. सगळे काम टप्प झाले. मग तिने शेवटचा मार्ग अवलंबला. शद् गुरु वाचोनी सांपडेना सोय - - - -

महाराजांना कळवळून प्रार्थना केली. नंतर तिला एक स्वप्न पडले. तिला दिसले एक मोटे टेबल असून त्यावर कागदपत्रांचा ढीग आहे आणि त्याच्या बाजूला महाराज आणि तिचे वडिल बसले आहेत. महाराज ती कागदपत्रे खालवर करुन कांही तरी शोधताहेत. हिच्या वडिलांनी महाराजांना म्हटलं, महाराज, अहो, आता रात्रीचे बारा वाजलेत. तुम्ही किती वेळ हे शोधणार ? झोपा आता.

महाराज म्हणाले, ते सर्व्हिस बुक मिळाल्याशिवाय आम्ही झोपू शकत नाही''

कांही दिवसांनी पेन्शनचा चेक आला. कसा आला ? हिने तर सर्व्हिस बुक दिले नव्हते. आणि सर्व्हिस बुक नसेल तर पेन्शन कॅलक्युलेट करता येत नव्हते. ज्या अर्थी पेन्शनचा चेक आलाय त्या अर्थी ऑफिसला सर्व्हिस बुक मिळाले. मग ते कोणी दिले ?

कितीही व्यवहाररिक काळजी घेतली तरी महाराजांचा पूर्ण भरवसा ईश्वरावर होता. बहुधा १९९४ साली महाराजांना वाडीत गेले असता श्वसनाचा त्रास होऊ लागला आणि गॅस सिलिंडरची आवश्यकता निर्माण झाली. त्यांच्याबरोबरच्या माणसाने त्याची व्यवस्था केली महाराज उत्सव पूर्ण करुन जाऊ म्हणत

असतानासुद्धा त्यांच्या बरोबरच्या माणसाने काळजी नको म्हणून त्यांना पुण्याला घरी आणले वगैरे झाले.

पुढच्या वर्षी वाडीला जाण्याकरता डॉ जोशींच्या कारने ते निघाले. कारमध्ये येऊन बसले आणि नंतर गेल्या वर्षीसारखा प्रसंग आला तर धांवपळ नको म्हणून बरोबरच्या मंडळींनी आत्ताच सिलिंडर बरोबर घेतला. तो डिकीत टेवताना त्याचा आवाज ऐकून महाराज डॉ जोशींना एवढेच म्हणाले, आम्ही जे वाडीला जातो आहोत ते सिलिंडरच्या नाही तर देवाच्या भरवशावर.

१९८५ साली जालन्यातल्या श्री भागवत सप्ताहाच्या आरंभाच्या आधी महाराजांना खोकला येऊ लागला. औषध घ्यायचे का विचारल्यावर ते म्हणाले, उद्यापासून सप्ताह सुरु होतो आहे भगन्नामासारखे दुसरे औषध नाही.

मागितल्यावर कोणीही देतं किंवा सांगितल्यावर कोणीही करतं पण आपणहोऊन दुस-याचे मन ओळखून त्याला काय आवडेल ते करण्यात मजा आहे. १९९५ साली जालन्यात श्रीदत्तयागाकरता सर्व कवीश्वर कुटुंबीय आले होते. सौ सवितावहिनींचे माहेर जवळच कळंबला आहे. याग संपवून निघताना महाराज आईसाहेबांना म्हणाले, सविताचे माहेर जवळच आहे तिला चार दिवस जाऊन येऊं दे माहेरी.

एकदा समोरच्याला पारखून घेतला की त्याच्यावर ते पूर्ण विश्वास टाकीत. जालन्याच्या बांधकामाच्या संबंधात एक निवेदन तयार करायचे होते. ताई म्हणाल्या महाराजांच्याकडून लिहून घ्या. महाराजांना तसे सांगितल्यावर ते म्हणाले, आम्ही वेगळे काय लिहिणार, तुम्ही लिहायचे आणि आम्ही सही करायची.

२३.६.८२ -

प्रश्न - श्राध्दाच्या. दिवशी काय करावे ?

श्री - सर्वसाधारणपणे क्षेत्राच्या ठिकाणी जाऊन पिंड्दान व काशीयात्रा इ. करावे.
श्राद्धाच्या दिवशी ब्राह्मण न मिळाल्यास एका ब्राह्मणाला बोलावून संकल्प सोडून दक्षिणा दूध द्यावे.
शास्त्राप्रमाणे प्रत्येक क्षेत्राच्या ठिकाणी श्राद्ध विधी करावा असे आहे.

प्रत्येक जण दीक्षा घ्यायला उत्सुक असतो पण प्रत्यक्ष दीक्षा झाल्यावर त्याचा उत्साह कधी मावळतो समजत नाही. मग महाराजांच्याकडे येऊन रडगाणे सुरु होते – माझ्याकडून साधना होत नाही, जप होत नाही वगैरे.

महाराज म्हणत पुन्हा पुन्हा प्रयत्न करावा आणि तरीही साधना, जप होत नसेल तर शांत बसावे. शांत बसणे हीसुद्धा साधनाच आहे. कोणत्याही परिस्थितीत मनाचे संतुलन बिघडू न देणे महत्वाचे आहे.

दीक्षा घेतल्यावर लवकरच आपले विकार कमी होतील, होतात वगैरे चुकीचे विचार मनांत येऊ लागतात. साधक स्वतःला इतरांपेक्षा वेगळा समजू लागतो. आपले विकार शांत झाले असे त्याला वाटते पण अचानक जेव्हां एखादा विकार उफाळून वर येतो तेव्हां त्याला आपला भ्रम समजतो. महाराजांना हे विचारल्यावर ते म्हणाले, ज्या अर्थी तो विकार उफाळून आला त्या अर्थी तो गेलेला नाही ना ! आपण एका वेळी एक विकार जिंकण्याचा अभ्यास करावा. सगळे विकार कांही एका वेळेला आपल्याला त्रस्त करीत नाहीत. सगळे विकार जर शांत झाले तर तुम्ही सिद्धच झालात की ! आणि सिद्धावस्था तर शेवटची आहे.

चंचल मन सतत नवनवीत गोष्टींकडे आकर्षित होत असते. आपण दीक्षा घेताना या पुढे नोकरी व्यतिरिक्त जास्तीत जास्त वेळ साधनेला द्यायचा असे ठरवले तरी नवीन कांही तरी करावेसे वाटते. एका साधकाने दीक्षा घेतल्यावर अशाच मनस्थितीत महाराजांना एक नवीन कोर्स करु का विचारले. वास्तविक तो कोर्स करण्याची तशी आवश्यकता नव्हती. त्याच्यावाचून कांही अडलेही नव्हते तरीही चंचलता स्वस्थ बसू देईना. नशिब महाराजांना विचारायची बुद्धि झाली. महाराजांनी सांगितले, जीवनोपयोगी कोणतीही विद्या

शिकायला हरकत नाही पण तसे करण्यात आपण जे स्वेच्छेने पत्करले आहे (दीक्षा) त्याच्याशी प्रतारणा तर होणार नाही ना एवढा विचार करुन निर्णय घ्यावा.

तीर्थ क्षेत्री गेल्यावर जेवण व झोपेचा वेळ वगळता तन मन धनाने होईल तेवढी देवाची सेवा करावी.

•

आपल्याला वेळ पडली तर वाहाण शिवता आली पाहिजे याचा अर्थ असा नाही की रोज वाहाणा शिवायच्या.

सर्व सामान्य माणसाला एखाद्या मोट्या घटनेबददल उचलली जीभ लावली टाळयाला या न्यायाने कांही तरी कॉमेंट करायची संवय असते. एकाने महाराजांना इंदिरा गांधीची हत्या झाली तेव्हां म्हटले, तिची हत्या झाली तर काय झाले ? तिनेही अनेकांची हत्या केली होती वगैरे

महाराज म्हणाले, तुम्ही राजनीती कधी वाचली आहे का ? देशाच्या सुरक्षिततेसाटी देश प्रमुखाला एखाद्याची हत्या करावी लागली तर तो नैतिक गुन्हा नसतो.

महाराजांच्या अनाग्रही वृत्तीबददल बोलताना त्यांच्या एका विद्यार्थ्याने एक अनुभव सांगितली. ही घटना १९७४ सालची आहे. त्या गृहस्थांची पत्नी चांगली विदुषी होती. महाराजांना श्री वासुदेव निवास हे त्रैमासिक पुन्हा नियमितपणे प्रकाशित करायचे होते. यांच्या पत्नीने त्यात लेखन करावे असे त्यांनी तीन चार वेळा यांना सुचवले पण लेख कांही आले नाहीत. मग मात्र महाराजांनी त्यांना परत कधीही त्या बददल विचारले नाही.

मैत्री, करुणा, मुदिता उपेक्षा – सहस्त्रचंद्र दर्शन - श्रीनिवास पाटील आणि श्रीयुत क्ष च्या मुलीच्या लग्नातला प्रसंग – महाराजांचा सहस्त्रचंद्र दर्शन सोहळा १९९० साली साजरा झाला. त्या वेळी पुण्याचे जिल्हाधिकारी श्रीनिवास पाटील होते त्यांना प्रमुख पाहुणे म्हणून बोलावले होते. त्यांनी त्यांच्या भाषणात महाराजांवर स्तुतीसुमनांची मुक्त कंटे उधळण केली होती. ती ऐकल्यावर श्रोत्याला वाटावे यांच्या मनांत महाराजांबददल किती आदर आहे आणि किती नाही. पुढे दोन वर्षांनी श्री क्ष यांच्या मुलीच्या लग्नाला महाराजांना आमंत्रण होते आणि श्रीनिवास पाटील हे त्या क्ष चे खास मित्र असल्याने सकाळपासूनच हॉलवर उपस्थित होते. महाराज येऊन बसल्यावर पाटीलसाहेब त्यांच्या समोरुन अनेक वेळा आले गेले पण त्यांनी महाराजांकडे पाहिलेसुद्धा नाही. महाराजही शांत, निर्विकार, साक्षी भावाने सगळे पहात होते. ज्या गृहस्थाने

*शिकायला हरकत नाही पण तसे करण्यात आपण जे स्वेच्छेने पत्करले आहे (दीक्षा) त्याच्याशी प्रतारणा तर होणार नाही ना एवढा विचार करुन निर्णय घ्यावा.*

*तीर्थ क्षेत्री गेल्यावर जेवण व झोपेचा वेळ वगळता तन मन धनाने होईल तेवढी देवाची सेवा करावी.*

•

*आपल्याला वेळ पडली तर वाहाण शिवता आली पाहिजे याचा अर्थ असा नाही की रोज वाहाणा शिवायच्या.*

*सर्व सामान्य माणसाला एखाद्या मोटया घटनेबददल उचलली जीभ लावली टाळयाला या न्यायाने कांही तरी कॉमेंट करायची संवय असते. एकाने महाराजांना इंदिरा गांधीची हत्या झाली तेव्हां म्हटले, तिची हत्या झाली तर काय झाले ? तिनेही अनेकांची हत्या केली होती वगैरे*

*महाराज म्हणाले, तुम्ही राजनीती कधी वाचली आहे का ? देशाच्या सुरक्षिततेसाटी देश प्रमुखाला एखाद्याची हत्या करावी लागली तर तो नैतिक गुन्हा नसतो.*

त्यावर त्या म्हणाल्या, म्हणजे तुम्हाला काय म्हणायचयं ? मी काय तुमची पत्रं उघडून वाचते की काय ?

महाराज शांतपणे म्हणतात, आम्ही एवढेच म्हणतो की आमच्याकडे जी पत्रे येतात ती उघडलेली असतात.

काशीयात्रेहून आल्यावर त्यांच्या आप्तेष्टांचा आग्रह चालला होता रामेश्वरला जायचा. महाराज कांही होकार नकार देत नव्हते. शेवटी आईसाहेबांच्या आग्रहाखातर त्यांना गंमतीने विचारले, महाराज, रामेश्वरला जाण्याकरता किती तिकीटे काढायची ?

ते म्हणाले, तिकडे कांही वेणीदान नाही.

(म्हणजे आईसाहेबांना यायची गरज नाही)

श्रीगुरुचरित्रावर निरुपण करताना त्यांनी पोथीतल्या दोन तीन प्रसंगांचा अत्यंत महत्वाचा आणि मार्गदर्शनपर उलगडा केला आहे. पीठापूरमध्ये श्रीपादवल्लभांच्या घरी श्राद्ध असते आणि त्याच वेळी श्रीदत्तात्रेय माध्यान्ह काळी अतिथी वेषाने त्यांच्याकडे जातात. श्रीपादवल्लभांची आई सुमती एक क्षणभर व्दंव्दात सांपडते. आता काय करायचे ? जर अतिथीला अन्न द्यायचे म्हटले तर श्राद्धाचे

ब्राम्हण अजून जेवायचे आहेत आणि त्याला भिक्षा न घालावी तर तो विन्मुख परत गेल्याचा दोष येतो.

पण पुढच्याच क्षणी तिच्या बुद्धिने निर्णय घेतला आणि तिने अतिथीला भिक्षा दिली आणि अतिथीने आपले मूळ रुप – श्रीदत्तात्रेयांचे – प्रगट केले आणि तिला आशीर्वाद दिले.

पुढे दत्तप्रभु गाणगापूरमध्ये गेल्यावर ते एका घरी भिक्षा मागायला जातात. ती साध्वी सांगते तिचेच यजमान गांवात भिक्षा मागायला गेले आहेत ते आले की ती दत्तप्रभुंना भिक्षा देईल.

दत्तप्रभु म्हणतात तिच्याकडे जी म्हैस आहे तिचे दूध तिने दिले तरी चालेल.

मग ती सांगते की ती म्हैस वांझ आहे ती दूध देत नाही म्हणून आम्ही ती भार वाहाण्याकरता वापरतो.

दत्तप्रभु पुन्हा सांगतात ती म्हैस दूध देणारी आहे तिला दूध द्यायचे असेल तर काढून द्यावे नाही तर ते निघाले

आता ती साध्वी व्दैतात सांपडते. म्हैस दूध देणारी आहे असे हा संन्यासी महात्मा सांगतो आहे आणि प्रत्यक्ष प्रमाण आहे की ती दूध देत नाही. पण सुमतीप्रमाणेच तिची बुद्धि पालटते आणि ती दूध काढायला जाते आणि म्हैस दूध देते.

या दोन्ही साध्वींच्या बुद्धिने हे निर्णय कसे घेतले ? तर त्यांच्या आधीच्या अनेक जन्मांत त्यांच्याकडून पुष्कळ पुण्यकर्म घडली पण त्यांचे फळ त्यांना मिळाले नव्हते पण ते ईश्वराच्या खात्यात ते जमा होते आणि असे एकदम योग्य निर्णय घेण्याच्या रुपाने मिळाले. आणि साक्षात परमेश्वराला भिक्षा घालायला मिळाली.

पुण्यकर्म कधीही फुकट जात नाही. इतर कोणत्या लौकिक रुपाने मिळण्यापेक्षा ते जमा होऊन असे मिळाले तर परम भाग्य आहे. महाराज नेहमी म्हणत, खरा भक्त पुण्यकर्म करीत असला तरी देवाकडे कांही मागत नाही मग त्याचे पुण्य अशा रीतीने जमा होते आणि एकदम त्याचे फळ मिळते.

हा उलगडा मूळ पोथीत नाही.

आता तीसरा प्रसंग २०-२१ अध्यायातला आहे. त्या बाईची दोन्ही मुले जातात आणि दत्तप्रभु तिची समजूत काढायला सिद्धाच्या रुपात येतात तिला सर्व तत्वज्ञान समजावून सांगतात पण ती तिचा हट्ट सोडत नाही. तिला तिची गेलेली मुले जिवंत करुन हवी असतात. इथे महाराज म्हणतात वास्तविक स्वतः दत्तप्रभु तिला मुक्त करायला तयार होते पण तिचे संचित असे होते की ते तिला पुन्हा लौकिकात – जन्म मरणाच्या, सुख दुःखाच्या चक्रात - खेचत होते. हा उलगडाही मूळ पोथीत नाही.

ष्ट ट्ट ष्ठ स्र ड्ड द्र द्ध द्भ ठ दृ हृ ॢ ठठठठ

क्र क्र क्र ष्ठ ष्ट ट्ट ष्ठ स्र द्र द्ध द्भ ठ दृ हृ ॢ फ

ट्ट हृ द्ढ ष्ठ ठ द्र द्ध द्भ स्र ॐ ड्ढ ड्ड ड्ढ ट्ट

ट्ट हृ द्ढ ष्ठ ठ द्र द्ध द्भ स्र ॐ ड्ढ ड्ड ड्ढ ट्ट

१९८५ च्या ऑगस्टमध्ये जालन्याचा सप्ताह आटोपून महाराज पुण्याला कारने येत होते. रांजणगांवजवळ आल्यावर कारचा मागचा टायर पंक्चर झाला. चालकाने महाराजांना थोडा वेळ उतरुन बाहेर थांबावे लागेल असे विनवले. महाराज शांतपणे बाहेर आले आणि योगायोगाने रस्त्याच्या कडेला जो किलोमीटरचा दगड होता त्यावर बसले. टायर बदलून पुन्हा प्रवास सुरु केल्यावरही त्यांनी एका शब्दाने झालेल्या प्रसंगाबददल नाराजी व्यक्त केली नाही. सर्व सामान्य माणसाने किती प्रश्न विचारले असते, बडबड केली असती याची आपल्याला कल्पना आहेच.

असाच एक प्रसंग खूप पूर्वी (१९८२) हरिहरेश्वरच्या प्रवासात आला होता. घाट उतरुन पायथ्याशी आल्यावर कारचे इंजिन बिघडले आणि ते दुरुस्त व्हायला कांही तास लागले. महाराज शांतपणे जवळच असलेल्या श्री पालकरांच्या ओसरीवर बसले होते. रांजणगांवप्रमाणेच पुन्हा प्रवासाला लागल्यावरही त्यांनी एका शब्दाने घडलेल्या प्रसंगाबददल नाराजी

व्यक्त केली नाही किंवा गैरसोय झाल्याची, वेळ गेल्याची तक्रार केली नाही.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

ज्याच्याबददल आपल्याला आपलेपणा वाटतो अशा व्यक्तिकडे आपण त्याच्या दौर्बल्याचा, वैगुण्याचा किंवा दोषांचा विचार न करता भाबडेपणाने बघतो. तो जर अडचणीत आला त्याच्याकरता कांही तरी चांगले करण्याचा प्रयत्न करतो. असे करताना आपल्याला वास्तवतेचे भान राहात नाही. एका तरुणाने त्याची होती ती नोकरी ऑफिसात लोक त्रास देतात या कारणास्तव सोडली. (सध्याही तरुणवर्ग ताईमहाराजांकडे याच कारणास्तव नवीन नोकरी धरु का म्हणून विचारायला येत असतो) त्याच्याबददल सहानुभूती असलेल्या एकाने महाराजांना त्याच्याकरता दुसरी नोकरी पाहू का विचारले. हेतु असा की महाराजांना विचारुन प्रयत्न केले म्हणजे त्याला यश नक्की येईल. पण असा प्रयत्न करताना

त्याने या मुलाची मानसिकता लक्षात घेतली नाही. पण महाराजांनी घेतली. त्यांनी याला विचारले, ''तुम्हाला प्रयत्न करायला हरकत नाही पण हा मुलगा परत ती नोकरी सोडणार नाही कशावरुन ?''

हा चमकला. ह्याने विचार केला त्या बिचा-याला ऑफिसात त्रास होता म्हणून त्याला नोकरी सोडावी लागली तेव्हां तो आता नवीन नोकरीत असे होऊ देणार नाही म्हणजे सोडणार नाही नोकरी टिकवेल. ह्याला वाटत होते आपल्याला जे वाटते ते बरोबर आहे. महात्म्याची दूर अतिंद्रिय दृष्टी या सामान्य अज्ञानी जीवाच्या लक्षात आली नाही. असो.

त्या तरुणाने महाराजांनी सूचित केल्याप्रमाणे दुसरीही नोकरी सोडली.

आपण भावनेला प्राधान्य द्यायचे की भावनेला हे महाराजांनी या प्रसंगातून शिकवले.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

सर्व सामान्य जीव भक्तिमार्गाकडे वळला की त्याला आपण आता या पूर्वी न केलेले धर्माचरण करावे असे वाटते. सर्व हे सर्व स्वाभाविक आहे. यात फार

मोटे गैर आहे असे नाही. पण महात्म्यांचा दृष्टीकोन वेगळाच असतो.

महाराजांच्या एका दीक्षिताने दीक्षा घेतल्यावर गायत्री उपासनेवर कांही पुस्तके वाचली आणि आपणही गायत्रीची उपासना करावी असे त्याला तीव्रतेने वाटू लागले पण त्याची मुंज झाली नव्हती. नरसोबा वाडीत महाराजांचा मुक्काम असताना यांनी महाराजांकडे मुंजीचा विषय काढला. त्यावेळी यांचा विवाह होऊन संततीही झालेली होती.

महाराजांनी त्यांना वाडीतल्या पुजा-यांचे मत घेण्यास सांगितले. वास्तविक महाराजांना तो शास्त्रीय विचार माहीत होता पण त्या स्थानात पुजा-यांचा मान ठेवण्याच्या परंपरेने त्यांनी असे सांगितले होते.

पुजा-यांनी सांगितले की विवाहानंतर मुंज करता येत नाही याला अपवाद फक्त श्री शिवाजीमहाराजांचा आहे आणि तोसुद्धा त्यांना राज्याभिषेक करण्याकरता मुंज होणे आवश्यक होते म्हणून तो केला होता नाही तर सर्व सामान्य माणसाला तसे करता येत नाही.

महाराजांनी त्याला पुष्टी देत पुढे सांगितले की गायत्रीची उपासना करावीशी वाटणे चांगलेच आहे पण जर शास्त्राप्रमाणे तसे करता येत नसेल तर अडून राहायचे कारण नाही. आपल्याला शास्त्राने अनेक पर्याय दिलेले आहेत. आपल्या सनातन वैदिक धर्माचे तेच तर वैशिष्ट्य आहे. प्रत्येकाला उपासना स्वातंत्र्य आहे. आपल्या वर्णाश्रमानुसार उपासना करुन भगवत्प्राप्ती करुन घेता येते. कोणीही त्यापासून वंचित झालेला नाही. श्रीमंत भागवताचे सार शेवटी सांगताना सांगितले आहे ''कलियुकात भगवन्नाम संकिर्तन आणि भगवन गुणनाम संकिर्तन केले तरी पूर्ण कल्याण आहे.''

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

महाराजांचे एक अनुग्रहित महाराजांना पूर्वी प्रसिद्ध असलेले पोस्टमन ब्रॅंड तेलाचा डबा देत असत. त्यांना असे वाटे की महाराजांनी ते तेल घरात वापरावे. पुढे महाराजांनी एका पत्रात त्या गृहस्थांना लिहिले की ''तुम्ही देता ते तेल इतके उत्कृष्ट प्रतीचे आहे की समईच्या ज्योतीला जराही काजळी धरत नाही'' म्हणजे त्याला त्याच्या दानकर्माचे फळ मिळाले

आणि त्याचे भाग्य असे की ते तेल स्वैपाक घरात न वापरले जाता महाराजांच्या देवाकरता वापरले गेले.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

खरे थोर महात्मे  कितीही थोर असले तरी त्यांच्या थोरपणाचे प्रदर्शन करीत नाहीत प्रसंगाने ते व्यक्त होते.  महाराजांची बडोद्याला तीन दिवस प्रवचने झाली होती.  विषय फार महत्वाचा होता – श्रीमत भागवतात वर्णन केलेले ईश्वर स्वरुप आणि भगवत गीतेत वर्णन केलेले ईश्वर स्वरुप. अत्यंत विद्वत्ता प्रचुर अशी ती प्रवचने आहेत. त्यात बरेच टिकाणी निरनिराळ्या प्राचीन भारतीय तत्ववेत्त्यांच्या प्रसिद्ध ग्रंथातील संदर्भ श्लोक उधृत केलेले आहेत.  ते लिहून काढताना पंचाईत झाली. शुद्धतेकरता आणि अचुकतेकरता जे नीट रेकॉर्डिंग न झाल्यामुळे ऐकू न आल्यामुळे  ते महाराजांनाच विचारुन घेणे आवश्यक होते. त्यांचा फार वेळ घ्यायचा नाही म्हणून लिखाण झाल्यावर जिथे समजले नव्हते त्या पानावर

वरच्या उजव्या कोप-यात एक खूण केली होती. ते विचारुन घेण्याकरता त्यांच्याकडे गेलो. त्यांना काय विचारुन घ्यायचे आहे ते सांगितले आणि जेव्हां त्यांना वेळ मिळेल तेव्हां त्यांनी अर्धा पाऊण तास द्यावा म्हणजे त्यांना पटकन विचारुन लगेच लिहून घेता येईल अशी प्रार्थना केली. त्यांनी सर्व समजून घेतल्यावर विचारले, ''हे तुम्हाला कधी हवे आहे ?'' म्हटलं, ''आपल्या सवडीप्रमाणे'' मग ते म्हणाले, ''आम्ही आमच्याज़वळ हे लिखाण टेवून घेऊ का ? नंतर ते पाहून देऊ. ''

म्हटलं, आपल्याला ते संपूर्ण वाचायला वेळ द्यायला नको म्हणून आपल्याजवळ बसून विचारुन घेणार होतो.

त्यांनी असे सांगितले त्यांना कांही त्रास नाही ते लिखाण त्यांच्याजवळ द्यावे.

मग त्यांना म्हटलं, मग आपण सर्व वाचण्यात वेळ जाऊ नये म्हणून फक्त ज्या पानावर खूण केली आहे तेवढेच आपण पहा.

आणि त्याचे भाग्य असे की ते तेल स्वैपाक घरात न वापरले जाता महाराजांच्या देवाकरता वापरले गेले.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

खरे थोर महात्मे कितीही थोर असले तरी त्यांच्या थोरपणाचे प्रदर्शन करीत नाहीत प्रसंगाने ते व्यक्त होते. महाराजांची बडोद्याला तीन दिवस प्रवचने झाली होती. विषय फार महत्वाचा होता – श्रीमत भागवतात वर्णन केलेले ईश्वर स्वरुप आणि भगवत गीतेत वर्णन केलेले ईश्वर स्वरुप. अत्यंत विद्वत्ता प्रचुर अशी ती प्रवचने आहेत. त्यात बरेच टिकाणी निरनिराळ्या प्राचीन भारतीय तत्ववेत्त्यांच्या प्रसिद्ध ग्रंथातील संदर्भ श्लोक उधृत केलेले आहेत. ते लिहून काढताना पंचाईत झाली. शुद्धतेकरता आणि अचुकतेकरता जे नीट रेकॉर्डिंग न झाल्यामुळे ऐकू न आल्यामुळे ते महाराजांनाच विचारुन घेणे आवश्यक होते. त्यांचा फार वेळ घ्यायचा नाही म्हणून लिखाण झाल्यावर जिथे समजले नव्हते त्या पानावर

भेटायला आलेल्या व्यक्तिचा वेळही महत्वाचा आहे म्हणून दिलेल्या वेळेच्या आधी ते १५ ते २० मि तयार होऊन बसत. समोरच्याच्या सोयी गैरसोयीचा काय विचार त्यांच्या मनांत असे. १९७८ मध्ये त्यांना कांही मार्गदर्शन घेण्याकरता भेटायचे होते. त्या वेळी आश्रमात सर्वांसमोर बोलता येणार नाही म्हणून त्यांना भेटायला त्यांच्या घरी गेलो. येण्याचे कारण सांगितल्यावर त्यांनी विचारले, ''मुक्काम किती आहे ?'' म्हटलं, ''आपल्याशी बोलणे झाले की परत जाणार. आपल्याला जेव्हां सवड असेल तेव्हां सांगावे मग आजच भेटले पाहिजे असे नाही उद्या परवा केव्हांही चालेल''

कांही मिनिटांनी ते म्हणाले, ''आम्हाला ४ वा आश्रमात जायचे असते. असं करा दोन वाजता या.''

त्याप्रमाणे त्यांची भेट झाली मार्गदर्शन मिळाले पण नंतर जाणवले की मला भेटण्याकरता त्यांनी त्यांची विश्रांतीच्या वेळात कपात केली होती. कां ? तर त्यांनी असा विचार केला मी राहाणार कुठे ? आश्रमात त्यावेळी तेवढी राहाण्याची सोय नव्हती. मग जेवढी ते पुढची वेळ / दिवस देतील तेवढे मला

पुण्यात राहावे लागेल आणि ते गैरसोयीचे असेल. त्या पेक्षा आपल्याला त्रास झाला तरी चालेल पण माझी सोय पाहिली पाहिजे.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

महाराजांच्या प्रवचनाचे वैशिष्ट्य असे की ते श्रोतृवर्गाप्रमाणे विषयाची निवड आणि मांडणी करीत. बडोद्याला श्री पदेशास्त्रींच्या पुण्यतिथीनिमित्त प्रवचने होती म्हणजे त्याला येणारा श्रोतृवर्गही जाणकारच होता म्हणून त्यांनी तो विषय निवडला होता.

तसेच मलकापूरला एकदा शेतकरी समाजापुढे प्रवचन करताना त्यांनी शेतक-यांना समजेल अशी भाषा वापरल्याचे ऐकिवात आहे. शेतक-यांना क्षेत्र क्षेत्रज्ञ विवेक समजावताना त्यांनी शेत म्हणजे क्षेत्र आणि शेतकरी म्हणजे क्षेत्रज्ञ अशी सुरवात केली आणि तो विवेक समजावला.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

रत्नागिरीला गेले असता तिथल्या रेडिओ स्टेशनवर बोलण्याकरता त्यांना बोलावले होते. स्टेशन डीरेक्टरनी त्यांना महावाक्ये थोडक्यात समजावून सांगायला सांगितले. वास्तविक महावाक्यांवर विवरण करण्याकरता हजारो पाने एका पेक्षा एक अधिकारी महात्म्यांनी विस्तृत लिखाण केले आहे. तो विषयच इतका गहन आहे की सर्व सामान्यांच्या आकलनापलिकडे तर आहेच पण तो रेडिओ स्टेशननी दिलेल्या १० मिनिटात मांडणे तर ज्ञानाची कसोटीच होती. पण पूर्ण ज्ञानी अवतारी महात्म्याला काय फरक पडणार ?

महाराजांच्या हाताला घड्याळ कधीच पाहिले नव्हते पण त्यांचे वेळेच भान अचूक असे. दहा म्हणजे दहा मिनिटेच होती. अशा वेळी स्टुडिओतले तंत्रज्ञ वेळ संपत आली की थांबायची खूण करतात. पण महाराजांच्या बाबतीत ती वेळच आली नाही महाराज बरोबर ९ वाजून ३० सेकंदांनी थांबले.

ज्याच्यावर संपूर्ण तत्वज्ञानाची उभारणी आहे तो विषय त्यांनी इतक्या कमीत कमी वेळात कोणालाही समजेल अशा भाषेत प्रभावीपणे समजावला.

समारंभात अध्यक्ष म्हणून गेल्यावर तर वक्ते काय बोलले तेही महाराज अचूक शब्दात सारांश रुपाने सांगत.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

१९८३ साली काशीहून परतताना गाडी १२ तास लेट झाली आणि भुसावळला ती सकाळी ६ च्या ऐवजी संध्याकाळी ६ च्या पुढे आली. त्यांनी प्लॅटफॉर्मवरच्या नळाखाली स्नान केले पण त्यांना देवपूजा करता आली नाही. ते त्यांच्या मनाला इतके लागले की ते क्षणिक विषण्णपणे म्हणाले, आमचे कोणत्या जन्माचे पाप आडवे आले आणि आमच्या देवांची पूजा राहिली.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

जर आपल्याला सेवाकार्याच्या निमित्ताने जालना, पुणे इ ठिकाणी जावे लागले तर पूजेचे काय करायचे असे विचारल्यावर त्यांनी प्रथम ब्राम्हण मिळत असेल तर त्याला सांगावे असे सुचवले. मुंबईसारख्या ठिकाणी

प्रसंगाने देवपूजा करण्याकरता ब्राम्हण मिळणे अशक्यप्राय गोष्ट आहे. मग म्हणाले, सौ नी पूजा करावी फक्त शाळीग्राम आणि बाण याला स्पर्श करु नये, त्याची पूजा करु नये. ते एका वाटीत घालून देवातच ठेवावेत पण स्पर्श करु नये.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

८ फेब्रुवारी १९८६ रोजी अकलूजच्या डॉ जामदारांच्याकडे बोलण्याच्या ओघात महाराज म्हणाले, तीर्थयात्रा करता आली तर उत्तमच पण जर तसे जमले नाही तर तीर्थयात्रेहून आलेल्यांचे भक्तिभावाने दर्शन घेतले तरी पुण्य मिळते.

गुरुमहाराज व महाराज नरसोबा वाडीहून कोणी आला की त्याला नमस्कार करीत असत.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

नरसोबा वाडी ही दत्तप्रभुंची राजधानी आहे. कृष्णामाईमुळे तिथे तीर्थही झाले आहे. तिच्याकडे एक नदी म्हणून न पहाता देवता दृष्टीने पहावे असे महाराज सांगत. त्याकरता मोठया महाराजांनी ''श्रीकृष्णा लहरी '' लिहिली आहे. या तीर्थात स्नान

करणा-यांची पापं धुवून काढणारी कृष्णामाई असल्याने इथे स्नान करताना साबणाचा वापर करु नये असे ते सांगत.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

वाडीतल्या मुक्कामात समोरच्या अमरेश्वराचे दर्शन घेऊन येण्याचा अनेक वर्षांचा त्यांचा प्रघात होता. पूल होण्यापूर्वी ते पलिकडे पोहून जात असत. पूल झाल्यावर चालत जात. एके वर्षी एका शासकीय अधिकारी कर्मचारी व्यक्तिने त्यांना शासकीय जीपने चलण्याचा आग्रह केला. महाराजांनी त्यांना हर प्रकारे समजावून पाहिले पण ते ऐकेनात. आपण महाराजांची कांही तरी सेवा केली हे समाधान त्यांना हवे होते. शेवटी भीडस्त स्वभावाच्या महाराजांनी त्यांच्या आग्रहाप्रमाणे जीपने जाऊन अमरेश्वराचे दर्शन घेतले.

मात्र परत आल्यावर ते गंमतीने म्हणाले, ''आज आमचे गुरुदर्शनाचे सगळे पुण्य तुमची जीप घेऊन गेली.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

आश्रमात संध्याकाळी बसले असता पुण्यातील एक वृद्ध पतीपत्नी आले. त्या गृहस्थांनी महाराजांना म्हटले, ''महाराज, मी गुरु चरित्राचे पारायण करु का ?'' महाराजांनी प्रश्नार्थक नजरेने त्यांच्याकडे पाहिले तेव्हां ते पुढे म्हणाले, ''आमचा मुलगा आम्हाला मारहाण करतो''

महाराज म्हणाले, मग पारायण करुन काय होणार आहे ? त्याला पोलीसांच्या ताब्यात द्या. पोलीसांनी एकदा बडगा दाखवला की सरळ होईल तो.''

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

नीलाताई जोशी गुरुमहाराजांच्या अनुग्रहित असल्याने महाराज त्यांना गुरुभगिनी मानत. त्याही महाराजांना राखी पौर्णिमेच्या दिवशी राखी बांधायला येत. त्या येण्यापूर्वी महाराज एक (रोख रकमेचे) पाकिट तयार ठेवत आणि त्यांनी राखी बांधली की त्यांना देत.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

नीलाताईंचा भाव खूप होता. महाराजांचे देऊळगांवराजाचे बंधू निवर्तल्यानंतर त्या महाराजांना भेटायला गेल्या. सूतक होते त्यामुळे महाराजांना

आन्हिक नव्हते. ते स्नान करुन आल्यावर धोतर नेसून बसले तेव्हां नीलाताईंना राहवले नाही आणि त्यांनी सूतकाचा विचार न करता महाराजांना नमस्कार केला आणि महाराजांनी तो स्वीकारत म्हटले, ''अशा प्रसंगी भेटणे हे माता भगिनीचे कर्तव्यच आहे. ''

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

नीलाताईंच्या कल्पकतेमुळे एक हृद्य प्रसंग पाह्यला मिळाला. १९९० साली श्री वामन निवासात महाराजांचा सहस्त्रचंद्र दर्शन सोहळा संपन्न झाला. मुख्य कार्यक्रमाच्या आधल्या दिवशी नीलाताईंनी वामन निवासात निवडक मुंबईकरांना एकत्रित करुन तो प्रसंग घडवून आणला.

त्यांनी प पू श्री धुंडिराज महाराज व आईसाहेब यांचा फोटो आणून एका टेबलावर टेवला. त्याच्या पुढे श्रीफळ, दक्षिणा व धोतर जोडी आणि साडी टेवली. महाराजांना बोलावले आणि म्हणाल्या, ''आज जर पिताजी आणि मातोश्री असत्या तर त्यांना आपला हा सोहळा पहाण्यात किती धन्यता वाटली असती ''

वगैरे आणि त्यांनी महाराजांना दोन शब्द सांगण्याची प्रार्थना केली.

त्याप्रमाणे बोलताना महाराजांनी इतर गोष्टींबरोबर कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला – ''असे प्रसंग घडवून आणण्याकरता (गुरु) महाराज आपल्यासारख्या माता भगिनी मागे ठेवून गेले'' आणि हे म्हणताना त्यांचाही स्वर भरुन आला होता.

कारण हे असे मातापित्यांचे पुण्यस्मरण करणे इतर कोणालाच सुचले नव्हते.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

या समारंभाला प्रेमाचे आमंत्रण देताना महाराजांनी धारवाडच्या वे शा सं भालचंद्र शास्त्रींना पत्रात लिहिले होते '' . . . . ज्या प्रमाणे पांडवांच्या राजसूय यज्ञात स्वतः भगवान सर्व कार्य उत्तमरीत्या पार पडावे म्हणून जातीने लक्ष देत होते तसे आपण येऊन लक्ष देऊन सर्व करावे'' आत्मीयता आणि मान यांचा सुरेख संगम महाराजांनी कसा घडवून आणला.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

या सहस्त्रचंद्र दर्शन सोहळयात इतर धार्मिक अनुष्ठाने तर विद्वान वैदिक ब्राम्हणांकडून झालीच पण महाराजांना आणखी प्रिय गोष्ट म्हणजे नामस्मरण. नीलाताईंनी त्यांच्या गुरुभगिनींच्या सहकार्याने वामन निवासाच्या एका कोप-यात रोज सकाळी ६ ते दुपारी १ पर्यंत "दिगंबरा . .. दिगंबरा" या महाराजांना प्रिय अशा महामंत्राची धून केली. णहाराजांना त्याचे एवढे अप्रुप होते की इतक्या गडबडीतही ते आवर्जून धून चाललेल्या टिकाणी जाऊन कांही मिनिटे बसून धून म्हणून येत.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

वास्तविक त्यांना स्वतःचे असे सोहळे करुन घेणे अमानित्व परिपूर्ण असल्याने मान्य नव्हते पण या निमित्ताने वैदिकांना त्यांनी संपादन केलेल्या ज्ञानाचा उपयोग करण्याची संधी मिळते म्हणून त्यांनी होकार दिला.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

अमानित्व परिपूर्ण असल्याने ते कधीही आपल्या पूर्वायुष्याबददल बोलत नसत. हरिहरेश्वरला

असताना श्री नागल्यांचा अत्यंत प्रांजळ व मनापासून केलेल्या आग्रहास्तव त्यांनी एक प्रसंग सांगितल्याचे स्मरते. महाराज आणि त्यांचे समकालीन ब्राम्हण उत्तम व्यायामपटु होते. ब्रिटीश कारकिर्दीत वाडीला येऊन एकदा उगीचच त्रास देण्याच्या उददेशाने एक ब्रिटीश पोलीस घराघराची मंदिराची तपासणी करु लागला. मंदिर भ्रष्ट करतो म्हटल्यावर मग मात्र लोकांचा सात्विक संताप अनावर झाला. आता त्याला धरुन मारायचा कसा तर महाराज एका दरवाज्याच्या आतल्या बाजूला वर आडवे दबा धरुन बसले आणि तो आल्यावर वरुन त्याच्या अंगावर उडी मारुन त्याला भरपूर बदडून काढला. महाराज उंचही होते आणि मजबूत बांध्याचे होते त्यामुळे त्यांनाच हे शक्य झाले.

त्यांनी सांगितलेली आटवण एवढीच. कदाचित इतरांना सांगितल्याही असतील पण आमच्या मर्यादित भेटीत एवढीच एक ऐकायला मिळाली होती.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

आईसाहेबांनी कौतुकाने सांगितले ''हे, क्लबमध्ये जात'' क्लब म्हणजे व्यायामशाळा. महाराजांची

व्यायामाची आवड आणि गरज अगदी निवृत्तीपर्यंत होती असे श्री अशोकमहाराजांकडून ऐकले होते. साटीनंतरही महाराज सूर्य नमस्कार घालीत आणि जोर बैटका काढीत.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

१९८२ च्या चैत्रात श्री नागले यांनी महाराजांना आपल्या गांवी हरिहरेश्वर येथे नेले आणि सर्व गुरुबंधूंना बोलावले. फारच अप्रतीम सोहळा झाला. नागल्यांच्या घराला वेदकालीन ऋषींच्या आश्रमाचे गुरुकुलाचे स्वरुप आले होते.

पहाटे महाराजांची काकडारती होऊन सर्व जण साधनेला बसत. नंतर सर्व आटोपून मागच्या अंगणात पारायणाला बसत. तिथे एक आसन – खुर्ची - महाराजांकरता आणि दुसरे आसन एक संन्यासी बरोबर होते त्यांच्याकरता औदुंबराच्या पारावर टेवले होते.

पहिल्या दिवशी आन्हिक आटोपल्यावर महाराज अंगणात आले पण खुर्चीवर न बसता खाली पाट घेऊन भिंतीला टेकून बसले. कोणाला कांही समजेना

ते आसनावर कां बसत नाहीत. खूप विचार केल्यावर एकाच्या लक्षात आले की महाराजांकरता टेवलेल्या खुर्चीची सीट एक किंवा दोन इंचाने संन्याशाच्या पाटापेक्षा उंच होती. कसाही असला तरी संन्यास वेष धारण केलेल्या संन्याशाला महाराज मान देत असत. वास्तविक महाराजांच्या पुढे कोणीच दुसरा श्रेष्ठ नव्हता पण ''विद्या विनयेन शोभते''

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

या मुक्कामात यजमानांना सुरवातीलाच महाराजांनी कांही रक्कम देत म्हटले, ''आमचाही सहभाग असू द्या तुमच्यात'' वगैरे

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

श्री रेणुका निवासाचा विस्तार करुन महाराजांच्या देवाकरता स्वतंत्र जागा आणि त्यांच्या स्वतःकरता एक स्वतंत्र खोली बांधा असे प पू भगवतीस्वरुप ताईमहाराज श्री नागल्यांच्या मागे लागल्या होत्या. पण महाराज त्याला संमती देत नव्हते.

योगायोगाने त्याच वेळच्या श्रीवासुदेवनिवास या त्रैमासिकाच्या अंकात परंपरागत गुरुसेवेबददल काय

विचार सांगितले आहेत यावर श्री गुरुमहाराजांचा एक लेख आला होता. त्याचा आधार घेऊन श्री नागले आणि त्यांचे गुरुबंधू महाराजांचे मन वळवण्याकरता पुण्याला येऊन भेटले आणि गुरुमहाराजांच्या लेखाचा संदर्भ देऊन श्री रेणुका निवासाचे विस्तारित बांधकाम कसे आवश्यक आहे ते पटवून देऊ लागले. त्यांनी खुदद गुरुमहाराजांकरताच आश्रमाची निर्मित कशी करावी लागली हे सांगितल्यावर महाराज शांतपणे म्हणाले, ''अहो, १९६२ सालच्या पुरात त्यांचे २० नारायण पेटमधले घरच नष्ट झाले होते त्यांना राहायलाच जागा नव्हती. आमचे तसे नाही. आम्हाला व्यवस्थित सोय आहे. जागा काय जेवढी जास्त घेऊ तेवढी कमीच असते'' थोडक्यात काय आमच्याकरता विस्तारित बांधकाम करण्याची आवश्यकता नाही.

श्री रेणुका निवासची जागा गुरुमहाराजांनी महाराजांना दिलेली आहे. महाराजांचे शनिवार पेटेतले घर पुढे कमी पडणार आणि महाराज कांही स्वतः होऊन कांही बोलणार नाहीत हे लक्षात घेऊन त्यांनी एका दस-याच्या आधी हा प्लॉट घेऊन टेवला होता

आणि दसऱ्याच्या दिवशी स्वतः महाराजांना बरोबर आणून याचे भूमीपूजन केले होते.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

कोणत्याही संतांच्या दरबाराच्या वैभवाची आपल्याला कल्पना आहेच आपण ते प्रत्यक्ष पहातो की ते सो कॉल्ड महाराज किती दिमागदार डाम डौलात राहातात. महाराज एक तर आश्रमात राहातच नव्हते. श्री राजेश्वरशास्त्रीसारख्या विद्यार्थ्याला शिकवण्याच्या निमित्ताने सकाळी आन्हिक उरकून आश्रमात आले की प्रसाद भोजन तिथेच होई. नंतर परत तासभर शिकवणी झाली की सुमारे तास दीड तास ते वरच्या गुरुमहाराजांच्या बाजूच्या खोलीत जे साधे आसन टेवलेले असे त्यावर किंवा तीन पाट एकाला एक जोडून त्यावर उपरणे पांघरुण झोपत असत.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

एकदा बोलताना त्यांनी ''दोषज्ञ '' शब्दाचा अर्थ सांगितला. ते म्हणाले दोषज्ञ मनुष्याला समोरच्या माणसाच्यात दोष स्पष्ट दिसले तरी तो उच्चार करीत

नाही. ते फक्त गुणच पहात दोषांकडे लक्ष देत नसत.

या संदर्भात श्री शारदामातांच्या चरित्रातला एक प्रसंग स्मरतो. त्यांनी देह ठेवण्यापूर्वी त्यांना भेटायला आलेल्या बाईला विचारले, मला एक वचन देशील ? तिला वाटलं, यांना कांही तरी हवे असेल किंवा नंतर कांही करण्यासंबंधी यांची इच्छा असेल. पण तिचा अंदाज चुकला. त्या म्हणाल्या, सर्वांना माझ्या वतीने सांग दुस-यांच्यात दोष पाहाणार नाही एवढेच मला वचन द्या.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

त्यांच्या एका लाडक्या विद्यार्थ्याने सांगितले. ही घटना साधारण १९७५ सालची आहे. त्याची पत्नी चांगली विदुषी होती. आश्रमाचे त्रैमासिक पुन्हा प्रकाशित करायला सुरवात करायची होती. त्यात देण्याकरता तिने लेख द्यावेत असे महाराजांनी त्यांना सुचवले. चार पांच वेळा स्मरण देऊनही लेख आले नाहीत त्या

नंतर महाराजांनी तो विषय पुन्हा कधीच विद्यार्थ्यांकडे काढून त्यांना अवघडलेल्या (ऑकवर्ड) स्थितीत टाकले नाही.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

असे सांगतात उजव्या हाताने केलेले दान डाव्या हाताला समजू नये. महाराजांनी कोणाच्या कल्याणाकरता काय केले हे कधीच कोणाला समजले नाही. त्यांनी निरनिराळ्या देवस्थानात कोणाचे संकट इ दूर व्हावे म्हणून महापूजा, अभिषेक, नंदादीप वगैरे करता स्वतः पैसे दिले होते आणि ते ज्यांच्याकरता दिले त्यांना आजही कल्पना नाहीये ते कां सुखात आहेत.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

आश्रमाच्या पदाधिका-यांनी अपमान केला म्हणून कोणी दुरावला तर महाराज त्याला समजावताना सांगत व्यक्तिवर राग असू नये पण राहातो परंतु आश्रमावर राग धरु नये. ते प्रेम काय टेवावे.

त्यांनी आयुष्यभर माणसे जोडली. आज कोणीही म्हणू शकणार नाही की तो महाराजांकडून दुखावला गेला.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

६ जुलै १९८५ – महाराजांच्या घरी ताई येऊन राहिलेल्या होत्या. संध्याकाळी महाराज आश्रमातून आल्यावर त्यांचे आन्हिक झाल्यावर ताईंच्या आज्ञेने दिगंबराची धून सुरु केली. विशेष म्हणजे आईसाहेबांनी तासभर सुंदर न दमता धून सांगितली. आम्ही आश्चर्याने विचारले त्यांना इतकी तासभर धून कशी सांगता आली ? त्यावर त्या म्हणाल्या, ताईंनी शक्ती दिली. पुढे म्हणाल्या, लग्न होऊन वाडीला राहायला आल्यावर महाराजांनी सांगितले होते रोज मोटया महाराजांच्या ओवरीत बसून तासभर धून म्हणायची. पुढे अनेक वर्ष वाडीत असेपर्यंत ही धून करणे चालू होते. सवडीप्रमाणे महाराजही धूनला येऊन बसत. त्यामुळे हे जमले.

नंतर त्रिपदी, दत्तबावनी वगैरे झाल्यावर सगळे महाराजांच्या खोलीत आले. ताईंनी आरतीचे तबक हातात घेऊन महाराजांची ''करितो प्रेमे आणि आरती

सदगुरु रायाची '' म्हटली. महाराजांनी तबकात ५रु टाकले. अत्यंत विरळा पहायला मिळणारे विलक्षण दृष्य होते. संपूर्ण वातावरण किती भारावून गेले असेल याची वाचकांनी कल्पनाच केलेली बरी.

नारायण स्वामीच्या चरित्रात असा उल्लेख आहे की त्यांचे भजन ऐकण्याकरता अंबाबाईच्या मंदिरात अंबाबाई आणि वाडीहून दत्तप्रभु येऊन बसत असत या प्रसंगाचे स्मरण झाले.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

महाराजांना गुर्वाज्ञेप्रमाणे १९८६ नंतर आश्रमाची जबाबदारी योग्य अधिकारी व्यक्तिवर सोपवून नरसोबा वाडी । अमरेश्वरला जाऊन राहायचे होते. पण आईसाहेबांची मनाची तयारी नव्हती. कधी कधी आईसाहेबांनी पाय दुखण्याची तक्रार केली की गंमतीने म्हणत, वाडीत रोज घाटावर स्नान करण्याच्या निमित्ताने घाट उतरणे चढणे झाले नंतर प्रदक्षिणा झाल्या म्हणजे पायाच्याच काय देहाच्या कोणत्याच तक्रारी राहात नाहीत.

एरव्ही धीर गंभीर स्वभावाचे वाटणारे महाराज प्रसंगाने खूप थट्टा मस्करी करायचे.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

एकदा देऊळगांवराजात कांही मोटा कार्यक्रम टरला आणि त्याला उपस्थित राहाण्याकरता महाराजांना आमंत्रण करायला देऊळगांवची मंडळी आली होती. त्यांच्याशी घरोबा असल्याने ते मोकळेपणाने महाराजांशी बोलत. त्यातले एक गृहस्थ महाराजांना म्हणाले, आमच्या मंडळींना रोज एक डायबेटीसचे इंजेक्शन घ्यावे लागते.

महाराज दोन बोटे दाखवत हंसत म्हणाले, मंडळींना रोज दोन इंजेक्शन घ्यावी लागतात त्यामुळे आमच्या बाजूला सुपारी टेवावी लागेल चालत असेल तर पहा.

(जर पत्नी उपस्थित नसेल तर तिच्या जागी सुपारी टेवण्याची शास्त्रीय प्रथा आहे)

पुढे म्हणाले, दोन तिकीटे काढून टेवली आहेत बघायचे कोणते विमान आधी सुटते.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

जरी स्वतः शक्तिरुप असले तरी मानवी देह धारण केल्यामुळे लोक शिक्षणार्थ ते लौकिकाप्रमाणे वागत. डॉ चा सल्ला पूर्णपणे पाळत. डॉ सरदेसाईंनी त्यांना व्यायामाचा एक भाग म्हणून रोज लांब फिरायला जायला सांगितले होते. त्याप्रमाणे महाराज राजू ज्ञानपुरेला सोबतीला घेऊन चतुःश्रृंगीपर्यंत फिरुन येत पण जस जसा त्या रस्त्याला वाहानांची रहदारी वाढल्यावर त्यांनी तिकडे न जाता घराला प्रदक्षिणा करुन व्यायाम चालू टेवला. त्या आणखी एक हेतु असा की अनायासे देवाला प्रदक्षिणा होतात.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

२३.६.८२ -

प्रश्न - श्राध्दाच्या. दिवशी काय करावे ?

श्री - सर्वसाधारणपणे क्षेत्राच्या ठिकाणी जाऊन पिंड्दान व काशीयात्रा इ. करावे.
श्राद्धाच्या दिवशी ब्राह्मण न मिळाल्यास एका ब्राह्मणाला बोलावून संकल्प सोड्डून दक्षिणा दूध द्यावे.
शास्त्राप्रमाणे प्रत्येक क्षेत्राच्या ठिकाणी श्राद्ध विधी करावा असे आहे.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

२ डिसेंबर १९९१ – महाराज वाडीत एका कार्यक्रमाच्या निमित्ताने आले होते. मुंबईहून नीलाताई, वत्सलाताई, मोहरीरताई आणि त्यांचे मंडळही आले होते. दुपारी निवडक ४-५ जण महाराजांबरोबर अमरेश्वर मंदिरात आले. दर्शन वगैरे झाल्यावर वत्सलाताईंनी महाराजांचे बालपण जे श्री दीक्षितस्वामींच्या सहवासात या स्थानात गेले त्याची एखादी आठवण सांगण्याची प्रार्थना केली.

महाराजांनी दीक्षित स्वामींनी केलेल्या मोटया महाराजांच्या श्रीगुरुस्तोत्रातला (नमःश्रीगुरो मेशधीशे दयाब्धे) एक श्लोक घेतला

त्वयि भक्तिं मे वर्धय ------

आणि त्यावर बोलता बोलता ते इतके भावना विवश झाले की ओक्साबोक्शी रडू लागले. त्यांना इतके भावना विवश होऊन रडताना या प्रसंगाने एकदाच पहायला मिळाले.

याचे कारण असे की दीक्षित स्वामीमहाराज प्रथम प्रार्थना करताना म्हणतात ''हे प्रभो, माझ्या हृदयातील अज्ञानरुपी अंधकार दूर करुन भक्तिभाव वाढू दे.

मग परत त्यांना जाणीव होते आपण महाराजांकडे काय मागतो आहोत ? ते तर सर्वज्ञ आहेत आणि सर्वज्ञाला काय सांगायचे ?

यच्चतवेष्टं तत्कुरु मयि भो असमर्थ :

आपल्याला योग्य वाटेल ते करा असे मागायलाही मी असमर्थ आहे.

अशा स्वरुपाचे ते निरुपण पूर्णपणे निरिच्छ असणा-या महाराजांच्या स्वतःच्या भूमिकेचे प्रतिक होते. म्हणूनच ते त्याच्याशी एकरुप होऊ शकले.

या भूमिकेचे आणखी एका प्रसंगाने प्रगटीकरण होत असे. ते म्हणजे श्रीमत भागवतावर निरुपण करताना प्रल्हादाचे आख्यान आले की ''प्रल्हादजी म्हणतात देवा, तुझा मी अकाम भक्त आहे'' हे सांगताना महाराजांचा स्वर दाटून येत असे.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

१९९१ साली महाराजांना प पू श्री नानामहाराजांकडे कांही विचार विनिमय करण्याकरता इंदोरला जायचे होते पण ते जाताहेत म्हटल्यावर सुमारे पन्नासच्या वर मंडळी त्यांच्याबरोबर जायचा हट्ट धरुन बसली.

इंदोरला इतक्या लोकांची राहाण्याची सोय होण्यासारखी नव्हती आणि हे लोक तर कोणी ऐकायला तयार नव्हते. शेवटी महाराजांनीच आपले जाणे रद्द केले.

पुढे श्री अशोकमहाराजांकडून समजले की कांही दिवसानंतर एक दिवस महाराजांनी घरच्या मंडळींना सांगितले की ते तास दीड तास त्यांच्या खोलीचे दार बंद करुन बसणार आहेत कोणी दरवाजा टोटावू नये किंवा उघडायला सांगू नये. त्यांचे काम झाले की ते आपण होऊन दार उघडतील.

त्याप्रमाणे झाले. पुढे कांही दिवसांनी प पू नानांच्या सूनबाईकडून कळले की महाराज इंदोरला येऊन थोडा वेळ नानांना कांही विचार विनिमय करण्याकरता भेटून गेले. तेव्हां उलगडा झाला महाराजांनी त्यांच्या खोलीचा दरवाजा कां बंद केला होता.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

मी - कांही वेळेस बैठकीची वेळ झाली आणि आपल्याकडे पाहुणे असले किंवा आपण इतर ठिकाणी कामात व्यग्र असलो तर सतत जांभया येत राहून बैठक न झाल्याने मानसिक व शारीरिक अस्वस्थता येते. अशा वेळी नंतर सवड झाल्यावर बैठक केली तर चालेल का ? पण तसे केल्याने व्हावी तशी बैठक होत नाही.

श्री - त्याला इलाज नाही. नंतर सवडीने बसावे मात्र.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

झाली बैठक तर ठीक.

मी प्रश्नावली कोणीही व कुठेही पहायला हरकत नाही ना ? आश्रमातच पाहिली पाहिजे असे नाही ना ?

श्री नाही असे कांही नाही. आपल्या घरीसुद्धा पहायला हरकत नाही.

मी त्यात सुचवलेले अनुष्ठान किती दिवस चालू ठेवावे?

श्री आपले काम होईपर्यंत

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

प्रश्न - बैटकीचा कालावधी वाढल्यामुळे मासिक पारायणाचे वाचन जेवढे रोज व्हायला पाहिजे तेवढे होत नाही. त्यामुळे पारायण महिन्यात पूर्ण होत नाही.

शिवाय वाचन चालू असता निरनिराळे विचार त्रस्त करतात.

महाराज – मग काय बिघडलं ? कांही तरी वाचन झाले म्हणजे झाले. सुट्टीच्या दिवशी जास्त वाचन करावे. पारायण पुढे मागे झाले तरी हरकत नाही. समश्लोकी हा प्रासादिक ग्रंथ आहे. रोज कांही तरी वाचन झाले म्हणजे झालं. कांही तरी सत्कर्म घडावं. रोज रात्री निजण्यापूर्वी आत्मपरिक्षण करावं. सबंध दिवसात किती सत्कर्म आपल्या हातून घडली याचा विचार करावा. समर्थांनी सांगितलं आहे – उपासनेला दृढ चालवावे - - - - आपण सर्व भाव त्याच्यावर टाकला म्हणजे तो काळजी घेत असतो. प्रपंच्यात दैन्य नसले म्हणजे झालं. प्रत्येक गोष्टीची आवश्यकता असतेच असे नाही. कोणाचे कर्ज घेऊ नये. घेणेकरी दारात आला नाही म्हणजे झालं.

पण त्याच वेळी कुटुंबाकडे दुर्लक्ष करु नये. कुटुंबातल्या – विशेषतः पत्नीला संतुष्ट टेवून दानधर्म करावा. ''रामकृष्ण हरि'' म्हणून तुकाराम महाराजांची एकदा तंद्रि लागली की तल्लीन होऊन आट आट दिवस त्यातच असायचे. पण खरोखर

मनापासून तल्लीन झाल्यामुळे कुटुंबाकडे दुर्लक्ष केल्याचा दोष त्यांच्याकडे जात नाही. आपले थोडेच तसे आहे ! त्यामुळे आपल्याकडून दुर्लक्ष झाले तर आपल्याकडे दोष येतो. देवाकरता किती पैसे खर्च करायचे याबाबत नको तो कटाक्ष पाळू नये.

धर्माकरता खर्च १/५ पेक्षा थोडा जास्त झाला तरी हरकत नाही पण कमी होऊ नये. पण त्याच वेळी हेही लक्षात ठेवावे की सर्वच पैसे धर्माकरता खर्च होऊ नयेत. कुटुंबीयांना विशेषतः गृहलक्ष्मीला संतुष्ट ठेवणे हाही कर्तव्याचाच एक भाग आहे.

(वाचकांनी कृपया हे लक्षात ठेवावे की खाजगी संभाषण आहे त्यात सर्व सामान्य स्वरुपाचे मार्गदर्शन सर्वांकरता आहे नाही असे नाही पण ते तारतम्याने घ्यावे)

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

एकदा श्रींनी बोलताना दातेसरांना उदकशांतीचे महत्व सांगताना एक घटना सांगितली. एका डॉ च्या हॉस्पिटलमध्ये ऑपरेशन चालू असता रोगी दगावला. तेव्हांपासून त्या जागेत एक प्रकारचा दर्प येऊ लागला.

रंग लावून झाला, निरनिराळे फवारे मारुन झाले सगळे उपाय झाले पण दर्प कांही जाईना. एवढेच नव्हे तर आणखी कांही रोगी दगावयाला लागले.

कोणी तरी त्या डॉ ना हॉस्पिटलमध्ये उदकशांत करायला सांगितली. ती केल्यावर तो दर्प एकेक जिना चढत गच्चीतून निघून गेला.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

इतरत्र वाचायला मिळणा-या आणि या लेखनात वाचायला मिळणा-या आठवणीत मुख्य फरक आहे तो म्हणजे सर्व सामान्यपणे लोक घटनांचे, त्यांना आलेल्या चमत्काराचे वर्णन करतात. इथे घटनांचे वर्णन प्रसंगाने जरी करावे लागले तरी त्यातून महाराज आपल्याला बोध काय देतात यावर भर आहे. या ५ व्या लेखात तर सुरवातीला त्यांचे त्यांनी प्रवचन किंवा एरव्ही बोलताना व्यक्त केलेले मार्गदर्शनपर विचार आपण पहाणार आहोत. ते वाचताना तारतम्याने वाचायचे. बरेच ठिकाणी त्यांचा संदर्भ प्रश्नकर्त्यापुरता मर्यादित आहे.

- सद्गुरुंबददल मर्त्य बुद्धि नसणे ही ईश्वराची कृपाच समजावी.

- ईश्वरी अवताराचे शरीर हे चिन्मय स्वरुपी असते पांचभौतिक नसते असा सिद्धांत मोटया महाराजांनी सांगितला आहे.

- अवतारी पुरुषांचा जाणीवपूर्वक संग घडला तर ईश्वराचे अलौकिकत्व समजून येते.

- ईश्वर अदृष्य आहे म्हणून संदेह निर्माण होतो पण त्याने मानव देह धारण केला तरी विश्वास बसत नाही. मानवाला ईश्वर कसे म्हणायचे ? माझ्याप्रमाणेच त्यांचे सर्व व्यवहार चालतात.

रागव्देषादिक विकार दिसतात मग त्यांच्यात आणि माझ्यात काय फरक आहे ? आणि तो झाला की अवतारी पुरुषाची कृपा होत नाही. म्हणून ईश्वराबददल आस्तिक्य भावना आवश्यक आहे. संतांनी भौतिक शरीर धारण केल्याने त्यांचे दर्शन होऊनही त्यांच्या टिकाणी ईश्वरी साक्षात्कार होत नाही.

- पुण्यकर्म करणे हाही प्रयत्नवादच आहे. याला ईश्वराचे सहाय्य संभवनीय आहे. पण त्याकरता प्रयत्न करणा-याची बुद्धि विश्वास बाळगणारी लागते.

- केवळ भौतिकवाद मानून वागणे हाही प्रयत्नवादच आहे.

- कर्तृत्वबुद्धि बंधनकारक आहे. मी कर्ता आहे अशी भावना निर्माण झाली की आसक्ती निर्माण होते.

- काल, कर्म आणि तम या तीन गोष्टीमुळे ज्ञानाला प्रतिबंध होतो.

- तत्वज्ञानाचा विसर पडेल पण तत्वज्ञानाच्या अनुभवाचा विसर पडत नाही. तत्वज्ञान झाले तरी ते दृढ होण्याकरता प्रयत्न करावा लागतो.

- समाधीनंतर साक्षात्कार होतो.

- वाडीच्या मनोहर पादुकांचे दर्शन व्हायलाही मोठे भाग्य लागते. नाही तर पापसंचय असेल तर तेही घडणार नाही. मग दत्तप्रभुंचे दर्शन होणे किती कठिण आहे याची कल्पना येते. वाडीत केलेल्या सेवेचे फळ मिळतेच मिळते.

- महात्म्यांच्या चरित्र चिंतनाने चित्त एकाग्र होऊन मन शांत होते. योग्य मार्गदर्शनाच्या अभावी प्राणायाम वगैरे करण्याची आवश्यकता नाही.

- आपल्या जीवनात चांगले जे घडते ते गुरुकृपेने आणि वाईट घडते ते आपल्या पापाचे फळ असते. त्याच्याशी गुरुंचा कांही संबंध नाही.

- गुरुभक्ति, गुरुसेवेसारखे दुसरे साधन नाही. ईश्वर आणि गुरु एक मानून सेवा भक्ति केली म्हणजे ईश्वराचा अनादर होत नाही पण फळ मात्र मिळते.

- आपल्याला झालेला दृष्टांत, आपल्यावर झालेली कृपा साधकाने कोणाला न सांगता आपली साधना चालू ठेवावी. नाही तर अहंकार वाढीस लागतो आणि तो घातक ठरतो.

- उत्तम भक्तांना मान सन्मान इ. ची कांहीच इच्छा नसते. अखंड ईश्वराचे स्मरण घडावे, भक्ति घडावी एवढीच त्यांची इच्छा असते. त्यांना मोक्षाचीही इच्छा नसते.

- प्रारब्ध जरी आड आले तरी दत्तप्रभु ते दूर करु शकतात. भक्तवत्सल भक्ताभिमानी या आपल्या ब्रीदाचे ते पालन करतात.

- संतांच्या सेवेत द्रव्य खर्च झाले तर पुण्यसंचय वाढतो.

- स्वतः बुद्धिवादी समजून संशय घेणं, फाजिल चिकीत्सा करणं हाच आजचा युगधर्म आहे. त्याने फायदा कांहीच होत नाही.

- आपली नेहमी बहिर्वृत्ती असते. ती घातक आहे. ज्यांची अंतर्वृत्ती झालेली असते त्यांनाच ध्यानयोग साध्य होतो. टी व्ही वर जगातल्या घडामोडी पाहून साधकाला काय करायचे आहे ?

- साधक व्हायलाच कित्येक जन्म घालवावे लागतात कृपा व्हायला वेळ लागत नाही. कृपा निश्चित होते पण त्याकरता आपण आपली योग्यता वाढवायची असते. आत्मनिरिक्षण करुन आपले दोष दूर होण्याकरता अखंड ईश्वराची प्रार्थना करावी लागते.

- संतोष हा गुणही आहे आणि दोषही आहे. संतोष हा ब्राम्हणाला गुण आणि क्षत्रियाला दोष आहे. राजाने परा-कम करुन आपल्याला राज्याचा विस्तार केला पाहिजे. असंतुष्ट ब्राम्हणाचा आणि संतुष्ट राजाचा नाश होतो.

- गुरुदक्षिणा अमूकच दिली पाहिजे असा नियम नाही. अर्थात याचा अर्थ क्षमता असतानाही हात आखडता घेऊ नये.

- ज्ञान किती आहे याची आपल्याला कल्पनाच नाहीये. ते अनंत आहे. ते नुसते पुस्तकात असून उपयोगी नाही बुद्धित पाहिजे.

- लोकांना आपलं ऐकलं पाहिजे असा आग्रह उपयोगी नाही. सांगून पहावे पण नाही ऐकले तर मनाला लावून घेऊ नये.

- चांगल्या कामाचा आग्रह नको आणि वाईटाचा तर नकोच नको. कोणताच आग्रह नसणे याचा अर्थ समाधान.

- तळमळ असली म्हणजे सगळं होतं. आग्रहाने कांही होत नाही.

- ज्यांना शांती पाहिजे असेल त्यांनी श्रद्धेने साधना करुन शांती प्राप्त करुन घ्यावी.

- मनाला थांबवायचं म्हणजे चांगलाही आणि वाईटही नाही कोणचाच विचार मनांत येऊ द्यायचा नाही. ते फार कठिण आहे पण जमलं तर सगळं संपलं. कांही करायची गरज नाही.

- देव सगळ्यांचे कल्याण करतो पण विश्वास ठेवला पाहिजे.

- देऊळगांवराजाला मोठ्या उत्सवाच्या आधी तो निर्विघ्नपणे पार पडावा म्हणून पारायणे, जप वगैरे अनुष्ठाने करतात.

- काया वाचा मनाने एकरुप होऊन प्रदक्षिणा घालाव्यात. प्रदक्षिणा हे पापक्षालन करायचे मोठे साधन आहे. प्रदक्षिणा कशा घालाव्यात याचे मार्गदर्शन श्रीगुरुचरित्रात दिलेले आहे.

- तसेच नमनाचे आहे. ''कोटी ब्रम्हहत्या टळती करिता दंडवत'' जे म्हटलं आहे ते उगीच नाही.

- देवाची सेवा करताना किती सेवा करायची याचा हिशोब ठेवू नये.

- सत्पुरुषांचे अखंड स्मरण राहिले पाहिजे. जन्मभर त्याच त्याच गोष्टी करुन आपल्याला कंटाळा येत नाही. तशीच बुध्दि सत्पुरुषांचे स्मरण करताना ठेवली म्हणजे कांही कमी पडत नाही. निरंतर पुण्यकर्म ज्याच्या हातून घडताहेत सत्कर्मावाचून एक क्षणही ज्यांचा जात नाही अशा महात्म्यांचे आपल्याला

स्मरण राहावे म्हणून सत्पुरुषांचे आश्रम निर्माण होतात. तिथे व्यक्त अव्यक्त रुपाने राहून त्यांचे कार्य ते करीतच असतात. आत्मोन्नतीची इच्छा धरुन आलेल्या साधकाची तिथे इच्छा पूर्ण होते. अशा स्थानात अल्पकाळ घडलेली त्यांची संगतीही कल्याणकारक ठरते. त्यांची संगती, त्यांचे विचार ऐकल्याचे फळ साधकाला निश्चित मिळते.

- ज्यांना आत्मशांती पाहिजे त्यांनी श्रद्धेने सांगितलेली साधना करुन ती मिळवावी.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ ॐ

पुण्यातले श्री देशपांडे महाराजांकडे येऊन म्हणाले, माझी पुण्यात बदली व्हावी म्हणून मी प्रश्नावली पाहिली. त्यात शिक्षात्रयी वाचावे असा उपाय आला. ती कशी वाचू ? त्याला कांही नियम आहेत का ?

महाराज – सकाळी स्नान झाल्यावर किंवा संध्याकाळी शुचिर्भूत होऊन वाचा बाकी त्याला कांही नियम नाहीत.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ ॐ

दुस-या एका गृहस्थांनी त्यांच्या मुलाची नोकरी टिकत नाही त्यावर उपाय विचारला. महाराजांनी त्यांना त्यांची कुलदेवता

कोणती विचारल्यावर त्यांनी ''तुळजाभवानी'' असे सांगितले. ते नित्योपासना पुस्तकात छापले आहे. त्याचे श्रद्धेने सकाळ संध्याकाळ जमतील तेवढे पाट करा. म्हणजे सर्व टीक होईल. सर्व संकटावर उपयोगी पडणारे प्रभावी स्तोत्र आहे. घरातल्या बायकांनीही त्याचे पाट करायला हरकत नाही.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ ॐ

१९८६ च्या जून महिन्यात ५ तारखेला गुरुवारी नागले, श्रृंगारपुरे वगैरे निवडक गुरुबंधू भेटले आणि महाराजांच्या घराच्या विस्ताराच्या बांधकामासंबंधी त्यांना तातडीने भेटण्याकरता त्यांनी महाराज खर्ड्याला आहेत समजल्यावर ७ तारखेला शनिवारी खर्ड्याला जायचे टरवले. पण काय गंमत ७ तारखेला श्रृंगारपुरेंच्या पत्त्यावर सकाळी महाराजांच्या बरोबर राहाणा-या इसमाचे पत्र आले. त्याने त्यात लिहिले होते ''तुम्ही मुंबईकर भाग्यवान आहात. महाराजांच्या आज्ञेने हे पत्र लिहित आहे. आम्ही खर्ड्याहून निघून भूम, बार्शी, वैराग करुन सोमवारी ९ तारखेला पुण्यात येऊ. तुम्ही खर्ड्याला न येता पुण्यात येऊन भेटा.'' आमची इतक्या लांबची खेप फुकट जाऊ

नये म्हणून महाराजांनी ही काळजी घेतली होती. ते सहसा त्यांच्या शक्तिचे प्रगटीकरण करीत नसत पण इथे आवश्यक म्हणून त्यांनी केले. विशेष म्हणजे ते पत्र राजरोस पोस्टाने आलेले आहे. यात आणखी आश्चर्य वाटायचे कारण म्हणजे १९८६ साली खर्ड्यासारख्या खेडेगांवातून पोस्टाने टाकलेले पत्र मुक्कामी पोहोचायला कमीत कमी आट दिवस लागत. अशा पार्श्वभूमीवर ते पत्र दुस-या दिवशी मिळावे म्हणजे केवळ आमची गैरसोय होऊ नये म्हणून वापरलेली महाराजांची शक्ति नाही तर काय म्हणणार ?

पण इथे त्यांचेच प्रवचनातले एक वाक्य स्मरते. ते सांगत, लोक म्हणतात ज्ञानेश्वरांनी भिंत चालवली पण ज्ञानेश्वरमहाराज कधीच तसे समजले नाहीत किंवा म्हणाले नाहीत. मग भिंत कशी चालली ? चराचराशी एकरुप झालेल्या सर्वज्ञ, सर्व शक्तिमान महात्म्याच्या मनांतली इच्छा त्या वरकरणी अचेतन वाटणा-या भिंतीला समजली आणि ती निघाली. तसे विश्वरुप झालेल्या वैश्विक मनाच्या महाराजांना आमचा बेत न कळला तर नवल !

ॐ ॐ ॐ ॐ ॐ ॐ

निंबार्क भाष्य या ग्रंथाची महाराजांनी लिहिलेली प्रदीर्घ भूमिका वाचली की त्यांचे ज्ञान किती होते याची कल्पना येते. त्यात त्यांनी

वैदिक वाङ्मयाचे संदर्भ दिले तर नवल नाही पण इस्लाम, ख्रिश्चॅनिटी, पारशी धर्म ग्रंथ अवेस्ता, जैनीझम, बुद्धिझम, सगळ्यात कहर म्हणजे यहुदी लोकांचा ज्यूडाइझम चा अभ्यास पाहिला की आपण अवाक होतो. ते ज्ञानी नव्हे तर साक्षात पूर्ण ज्ञानच होते असे म्हणावे लागते. आपण विशेष भारावून जातो ज्यूडाइझमचे संदर्भ वाचताना कारण आपल्याला अगदी स्थूल मानाने का होईना बायबल, कुराण, जैन व बुद्ध तत्वज्ञान याची पुसटशी कल्पना असते पण एक तर ज्यू धर्मीय भारतात (समाजात) संख्येने नगण्य आहेत. कोणत्याही गांवात, शहरात ज्यू असला तरी आपल्या लोकांशी त्यांचा तसा कांहीच संपर्क नसतो. अगदी शेजारी किंवा ऑफिसमध्ये बरोबर काम करणारा असेल तर थोडी फार माहीती असते पण त्याच्या धर्मग्रंथाची कांहीच कल्पना नसते. अशा पार्श्वभूमीवर महाराजांनी हा सगळा अभ्यास कधी केला हा मोठा प्रश्न पडतो. म्हटलं तर तो आपल्यालाही अंतर्मुख करतो. वहिले इतर धर्म आपल्याला आपल्या वैदिक धर्माची तरी कांही माहिती आहे का प्रश्न पडतो. पण महाराजांच्या सहवासात आलेला जिज्ञासू त्यांच्याकडे पाहून आपल्या ज्ञानाच्या कक्षा रुंदवायला उद्युक्त निश्चित होत असे. आपले परम भाग्य की आपल्याला असे सर्व ज्ञानी महाराज लाभले.

जर महाराजांनी लिखाण करायचे ठरवलेच असते तर आदि शंकराचार्यांच्या तोडीस तोड वाङ्मय निर्मिती करु शकले असते. कदाचित या पूर्वी कोणीही केले नाहीत इतके ग्रंथ ते लिहू शकले असते पण ते म्हणत ज्या प्रमाणे गुरुमहाराजांनी कांही स्वतंत्र लिखाण केले नाही. कां तर ते म्हणत आमच्या गुरुंनी म्हणजे मोटया महाराजांनी इतके कांही सांगून टेवले आहे की आम्हाला सांगण्यासारखे कांही उरलेच नाही. तीच परंपरा महाराजांनी पुढे चालवून स्वतंत्र लिखाण केले नाही.

ज्ञात अशी त्यांची एकच रचना आहे. एकदा त्यांच्या चिरंजीवांनी श्री अजितरावांनी महाराजांना भोवतालच्या जगाबददल काय वाटते हे काव्यात लिहून सांगितले. त्याला जे महाराजांनी काव्यात उत्तर दिले आहे तेवढी एकच महाराजांची स्वतंत्र रचना आहे.

असो हा फार मोटा विषय आहे.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ ॐ

१९७८ साली गोष्ट आहे. त्या वेळी आश्रमात फारशी वर्दळ नसायची त्यामुळे महाराजांचा एकांतात सहवास मिळायचा. अगदी निवडक मंडळी संध्याकाळी यायची दर्शनाला. ते वरच्या गुरुमहाराजांच्या खोलीच्या बाहेरच्या खोलीत बसलेले असायचे.

सकाळी जर आले तर सहसा कोणीच नसायचे अशा वेळी त्यांच्या चरणाजवळ बसायची संधी मिळायची. आपण जरी समोर बसून राहिलो तरी ते शांतपणे पत्र लेखन करीत अधून मधून एखादे वाक्य बोलत.

पुण्याला जाण्यापूर्वी पॉल ब्रंटनचे भारतीय अध्यात्मिक रहस्याच्या शोधात पुस्तक वाचून गेलो होतो. एकदा त्यांच्यासमोर असेच बसलो असता ते पत्र लेखनात मग्न होते. त्यांना पहात राहाण्यातही आनंद होता. नीरव शांतता होती. अचानक मनांत, येऊ नये पण, विचार आला – महाराज संत वैदिक, इतर धर्म ग्रंथ व संस्कृत वाङ्मयाचे अधिकारी त्यांना पॉल ब्रंटन काय माहीत असणार ? त्यांचा कांही संबंधच नाही.

असा विचार आला आणि पत्र थांबवून महाराजांनी क्षणभर समोर माझ्याकडे पाहिले आणि परत पत्र लिहिण्यास सुरवात केली. पत्र पूर्ण करुन बाजूला टेवले आणि म्हणाले, ''हं काय म्हणताहेत तुमचे पॉल ब्रंटन ?'' हादरलोच. त्यांनी अंतर्ज्ञानाची चुणुक दाखवण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. कसे तरी स्वतःला सावरत पॉल ब्रंटन पुण्यात कसा आला होता आणि त्याची आणि तत्कालीन संत मेहेरबाबांची भेट कशी झाली काय बोलणे झाले वगैरे सविस्तर सांगितले ते थोडक्यात असे –

पॉल ब्रंटन खऱ्या ज्ञानी महात्म्याच्या शोधात भारतात आला आणि संपूर्ण भारतभर फिरला. त्याला मनासारखा गुरु कांही भेटेना. पुण्यात येऊन त्याने श्री मेहेरबाबांची भेट घेतली, त्यांच्याबरोबर चर्चा झाली, मार्गदर्शन घेण्याकरता तो चार दिवस त्यांच्याबरोबर राहिला पण नंतर त्याच्या लक्षात आले की त्याला पाहिजे असलेले मार्गदर्शन मेहेरबाबा देऊ शकणार नाहीत. त्याला असे म्हणायचे होते ते गुरु म्हणण्याच्या योग्यतेचे नव्हते. पुढे तो अरुणाचलममध्ये गेला आणि तिथे रमण महर्षिंकडून त्याला दीक्षा झाली. त्याची पुस्तके वाचून असंख्य युरोपियन जिज्ञासूंचा भारताकडे ओघ लागला. असो.

मी त्याने मेहेरबाबांच्या योग्यतेबददल जो संशय व्यक्त केला त्यावर जरा भर दिला होता. महाराजांनी सगळे शांतपणे ऐकून घेतले आणि मला म्हणाले, ''तुम्ही गोंदवलेकरमहाराजांचे चरित्र वाचले आहे. ते गुरुच्या शोधात बाहेर पडले. माणिक प्रभु, साईबाबा, गजानन महाराज, अक्कलकोट स्वामी च्याकडे गेले. प्रत्येकाने त्यांना सांगितले ''तुझा गुरु मी नाही'' शेवटी ते येहळेगांवला तुकाईकडे गेले आणि त्यांचे शिष्य झाले. पुढे ते गोंदवलेकर महाराज झाले.

मग आपण असे म्हणायचे का ज्या चौघा अवतारी महात्म्यांकडे ते गेले आणि ज्यांनी गोंदवलेकरांना सांगितले तुझा गुरु मी नाही त्यांची योग्यता नव्हती ?

नाही. त्याचा अर्थ एवढाच की त्यांना मार्गदर्शन तुकाईकडून मिळणार होते त्यामुळे या महात्म्यांनी त्यांना परत पाठवले. तसे पॉल ब्रंटनचे मार्गदर्शनाचे काम रमण महर्षिकडे होणार होते. **आपण सामान्य जीव आहोत आपण कोणाही महात्म्याच्या योग्यायोग्यतेबददल कधी भाष्य करु नये.**

एका साध्या संभाषणातून त्यांनी आयुष्यभर उपयोगी पडेल असे मार्गदर्शन केले.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ ॐ

ऑगस्ट १९८५ - जालन्यातल्या मुक्कामात असाच एकांतात सहवास मिळाला तेव्हांही असे अनेक अज्ञानयुक्त विचार दूर करणारे मार्गदर्शन मिळाले. थोडक्यात सांगतो. त्या वेळी ऑफिसमध्ये उच्चाधिका-यांकरता टाइम न्यूजवीक सारखी साप्ताहिके यायची. त्या वेळी अमेरिका आणि रशियामध्ये शीतयुद्ध

जोरात होते आणि अमेरिका अशा साप्ताहिकांच्या माध्यमातून रशिया किती वाईट सत्ता आहे आणि तिच्यापासून जगाला कसा धोका आहे असे चित्र जगापुढे टेवीत असे. आणि त्यात त्यांना ब-यापैकी यशही मिळत होते कारण फारच थोडे वाचक सूज्ञ आणि जाणकार असतात. सत्य शोधून काढण्याचा प्रयत्न करतात. नाही तर बहुतेक सगळे होयबा असतात. मीही त्यातलाच एक होतो.

महाराजांना माझे अज्ञान दूर करायचे होते म्हणून निवांत बसलो असता त्यांनी आपणहोऊन अमेरिकेचा विषय काढला. झालं. अस्मादिकांनी अमेरिकेची न्याय्य बाजू घेऊन रशियामुळे जगाला कसा धोका आहे हे टाइम आणि न्यूजवीकसारख्या प्रचार माध्यमात वाचलेल्या माहीतीच्या आधारे तारे तोडायला सुरवात केली.

महाराजांनी सगळे शांतपणे ऐकून घेऊन मग माझ्यासमोर संपूर्ण जगाचा राजकीय तौलनात्मक नकाशा उभा केला. कोणताही इंग्रजी पेपर किंवा साप्ताहिक न वाचणा-या, बी बी सी न ऐकणा-या महाराजांचे आंतरराष्ट्रिय राजकारणाचे सखोल व संपूर्ण ज्ञान पाहून थक्क झालो.

विस्तारभयास्तव तपशील देत नाही पण त्यांनी मला जे समजावले ते असे की **अमेरिका करते ती प्रत्येक गोष्ट बरोबर आहे आणि**

**रशिया करते ती प्रत्येक गोष्ट चुकीची आणि जगाला धोका निर्माण करणारी आहे असे नाही.**

आज अमेरिका जगातल्या महत्वाच्या देशात काय उत्पात घडवून आणते आहे हे आपण पहातोच आहोत.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ ॐ

अष्टावधानी म्हणा किंवा चतुरस्त्र म्हणा विकास त्यांना मान्य होता. दैवी शक्ती सोडली तर मानवी पातळीवर ते कधी खढे वाचन करीत त्यांचे त्यांनाच माहीत. कालीदासाप्रमाणेच पु ल देशपांड्यांसारख्या नामवंत साहित्यिकाच्या प्रत्येक पुस्तकातली वाक्य न वाक्य ते सहज उधृत करीत. एका कॉलेज कन्यकेने त्यांच्याशी भारतातून पळून जाऊन शेजारच्या देशात आश्रय घेतलेल्या कुख्यात तस्कराचा विषय काढला तेव्हांही असेच झाले. तिंला वाटले महाराजांना या माफियाची काय कल्पना असणार ? पण महाराजांना त्याची इत्थ्यंभूत माहीती होती.

त्यांनी एक (आपल्याला गंमतीदार वाटणारा) तत्व विचार सांगितला होता. ते म्हणाले, **जेव्हां आपल्याला ज्ञान मिळवायचे असते तेव्हां आपण असा विचार करायचा की मला उदंड आयुष्य आहे**

आणि मी जास्तीत जास्त ज्ञान मिळवीन पण जेव्हां पारमार्थिक विचार करायचा त्या वेळी असे म्हणायचे, पुढच्या क्षणाचा भरवसा नाही जे कांही पारमार्थिक म्हणा अध्यात्मिक साधायचे ते या क्षणी.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ ॐ

**आजच्या जीवघेण्या स्पर्धात्मक जगात खंबीरपणे घट्ट पाय रोवून टिकायचे असेल तर आपली योग्यता जास्तीत जास्त वाढवली पाहिजे.**

इथे त्यांनी दैववाद आणलेला नाही.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ ॐ

२८ एप्रिल १९८७ – स्थळ – नरसोबा वाडी

डॉ भातलवंड्यांनी महाराजांना विचारले मानसिक जप करताना संख्येकडे लक्ष कसे देणार ?

महाराज म्हणाले, मानसिक जप हा केव्हांही चांगलाच. त्याची संख्या कमी होणे स्वाभाविक आहे. तो करताना संख्येकडे तसे लक्ष देण्याची गरजही नाही. ज्यांना शक्य असेल त्यांनी मानसपूजाही करायला हरकत नाही. त्यात सगळयाचा अंतर्भाव होतो. त्यात

तन्मयता साधते ती महत्वाची आहे. दीक्षा घेतलेल्या साधकाने कसोशीने यम नियमांचे पालन करावे. ती शास्त्राज्ञा म्हणजे साक्षात ईश्वराची आज्ञा समजून आचरण टेवावे. श्रीगुरुचरित्रात आहारासंबंधी सांगितलेले नियम हे आयुर्वेदिक आचार संहिता लक्षात घेऊन पूर्वजांनी सांगितले आहेत. बुद्धिची त्यामुळे जपणुक होऊन ती विकसित होते. ऋतंभरा प्रज्ञा जिला म्हणतात ती जागृत होते.

साधनेत यश मिळवायचे म्हणजे आधी पौरुष प्रयत्न हवेत. मग सद् गुरुकृपेने ईशकृपेने त्यात यश, सिद्धी मिळते. आपण कांहीच न करता सगळे सद् गुरु करतील वगैरे म्हणणे अयोग्य आहे.

मारुतीरायांनी आपल्या योग सामर्थ्याच्या जोरावर समुद्र पार केला आणि तसे करण्यात यश मिळाल्यावर ते म्हणाले केवळ रामरायाच्या कृपेने हे घडले नाही तर माझ्यासारख्या या झाडावरुन त्या झाडावर उड्या मारणा-या वानराचे हे काम नव्हे.

नंतर महाराजांनी मोटया महाराजांचे उदाहरण दिले. मोटया महाराजांनी सर्व प्रथम व्दिसाहस्त्री हा ग्रंथ दत्तप्रभुंच्या आज्ञेने माणगांवमध्ये असताना लिहिला. पुढे कित्येक वर्षांनी समोर मूळ ग्रंथ नसताना त्यावर अत्यंत महत्वाची समजली जाणारी टीका लिहिली. त्या वेळी लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात, रामो हरिसुद्धा ज्याला नीट उच्चारता येत नाही त्याच्या हातून हे लेखन होणे शक्य नाही. केवळ

दत्तप्रभुंची कृपा म्हणून हे लेखन घडले. तसेच श्रीकृष्णा लहरीच्या शेवटी ते म्हणतात कृष्णा तीरावर (नरसोबा वाडी) स्थित झालेला जो परमात्मा आहे त्याने प्रेरणा दिली म्हणून हे लेखन घडले.

आपण गुरुस्मरणपूर्वक आधी प्रयत्न करुन यश मिळाल्यावर त्याचे श्रेय गुरुंना देणे अधिक चांगले.

मुंबईचे एक गृहस्थ बरेच दिवस त्यांना नोकरी सोडून महाराजांच्या सेवेत येऊन राहाण्याची परवानगी मागत होते. त्यांना दोन लहान मुले होती. महाराजांनी त्यांना आधी सांसारिक जबाबदा-या पूर्ण करुन मग सेवेत येण्याचा विचार करावा असे प्रत्येक वेळी सांगितले तरी त्यांचा दुराग्रह कायमच.

असेच मागे लागल्यावर महाराजांनी त्यांना तेच तेच परत समजावले आणि ते गेल्यावर जे महाराज म्हणाले ते महत्वाचे आहे. महाराज म्हणाले, ज्याला सेवा करायची आहे तो नोकरी सोडून सेवेकरता येईल आणि विचारेल आता मी काय करु ? हे गृहस्थ आम्हाला ओलीस टेवायला पहाताहेत. म्हणजे यांच्या संसाराची सगळी जबाबदारी आम्ही घ्यायची म्हणजे हे सेवा करणार वगैरे

ॐ ॐ ॐ ॐ ॐ ॐ

१९८७ साली प पू श्री नानामहाराज दादरमधल्या जुवेकरांकडे आले होते आणि महाराज त्यांच्या दर्शनाला आले. महाराजांचे यथोचित स्वागत झाले. आंत आल्यावर महाराजांनी नानांना अत्यंत भक्तिभावाने साष्टांग नमस्कार घातला. दोघांच्या मनस्थितीचे काय वर्णन करणार ? नानांच्या डोळयात आनंदाश्रू आले. नाना म्हणाले, ‘‘तुम्ही आम्हाला वामनरावांची उणीव कधी भासू दिली नाही. तुमच्या नांवात जे सामर्थ्य आहे त्यावर आमचे सगळे कार्य चालले आहे.‘‘

महाराज म्हणाले, कांही भक्त पादुकारुपाने परमेश्वराला आपल्या जवळ टेवतात पण आपण परमेश् वराचे एवढे प्रिय भक्त आहात की त्याला आपले हृदय सोडून जावेसेच वाटत नाही.

स्वामीप्रसाद रंगात रंगलो मी या गीतात म्हणतात, ‘‘कोण पुण्य फळले रंग दर्शन- - - -‘‘ तसे झाले. त्यांचीच कृपा म्हणून हे दिव्य शब्द ऐकायला मिळाले.

श्रीदत्तमहात्म्यात श्रीदत्त व रेणुकेच्या संवादाचेही स्मरण होते. त्यांनीही एकमेकांची अशीच स्तुती केलेली आहे.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ ॐ

१९८७ सालच्या जानेवारीत कुरवपूरमध्ये महाराजांचा श्री भागवत सप्ताह चालू होता तेव्हां एका प्रसंगाने झालेले मार्गदर्शन –

साधक – रागद्वेषादिक विकार मधूनच उफाळून आले की स्वतःचीच लाज वाटते. काय करायचे समजत नाही.

महाराज – मन शांत टेवण्याचा प्रयत्न करावा. मन पूर्णपणे ताब्यात येणे म्हणजे ती शेवटीच अवस्था आहे. सिद्धावस्था तिला म्हणतात. तो पर्यंत हे असेच चालू राहाणार. संत महात्म्यांच्या सहवासात (जाणीवपूर्वक) राहिले म्हणजे मार्गदर्शन मिळते. ते काय बोलतात, कसे वागतात याचा अभ्यास केला म्हणजे सगळे शिक्षण मिळते. पूर्वी मुली सासरी गेल्या म्हणजे कसे वागायचे याचे शिक्षण त्यांना वडिलधा-या मंडळींकडून मिळत असे. त्याकरता आजच्यासारखे कोर्स नव्हते.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ ॐ

१९८३ मध्ये महाराजांनी प पू भगवती स्वरुप ताईमहाराजांचा ''साक्षात भगवती'' म्हणून पुणेकरांना परिचय करुन दिल्यापासून त्या बराच काळ पुण्यात महाराजांच्या घरी राहात. त्यांच्या सामर्थ्याचा कीर्ती सुगंध महाराजांच्याकडे येणा-या शिष्यांपर्यंतही पोहोचला होता. त्यात एक गुरुमहाराजांचे उत्तम साधक होते. हे साधक त्यांच्या मित्र परिवारासह महाराजांना भेटायला क्वचित कधी तरी जात असत. त्या गृहस्थांच्या कानावर ताईमहाराजांची कीर्ती आली होती पण ते ताईच्या दर्शनाला जात नव्हते. त्यांच्या मनांत काय

होते ते एकदा एका प्रसंगाने स्पष्ट झाले. हे त्यांच्या परिवारासह महाराजांच्या दर्शनाला आल्यावर महाराज त्यांना म्हणाले, ''काय हो, तुम्ही कधी जालन्याला गेला होता का ? ही बाकीची मंडळी जाऊन आली. अन्नदान, नामस्मरण वगैरे कसे करतात, संसारात अनासक्तीने राहून परमार्थ कसा साधायचा हे ताईकडून तुम्हाला शिकायला मिळेल. चिकित्सक बुद्धिने मोटमोटयांनी ताईच्या आंत बाहेर तपासण्याचा प्रयत्न केला पण त्यांना हवे असलेले त्यांच्या हाताला कांहीच लागले नाही. शुद्ध अंतःकरणाने पाहिले म्हणजे ताईच्या दिव्य स्वरुपाची प्रचिती येते.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ ॐ

कै श्री मधुकर कोटूरकर गुरुमहाराजांचे निस्सीम भक्त. ते उत्तम ज्योतिषी होते. आपल्या ज्ञानाचा त्यांनी समाजसेवेकरता निरपेक्षपणे उपयोग केला. कधी कोणाकडून एक पैसा घेतला नाही. श्री महाराज त्यांच्याकडे मुंबईच्या भक्तांना मार्गदर्शन घेण्यास पाटवत असत. त्यांनी एकदा गुरुमहाराजांची पाद्यपूजा घरी केल्यावर महाराजांनी त्यांची काय इच्छा आहे विचारले. कोटूरकर म्हणाले, महाराज मला एवढाच वर द्या की जेव्हां जेव्हां मी आपले स्मरण करीन तेव्हां आपण माझ्यासमोर प्रगट होऊन मला मार्गदर्शन करा.

गुरुमहाराज आश्चर्य चकित होऊन गहिंवरल्या स्वरात म्हणाले, आजपर्यंत मी कोणाच्या बंधनात सांपडलो नव्हतो पण आज तूं मला बांधून घेतलेस''

महाराजांनी दिलेला शब्द कोटूरकरांचा शेवट होईपर्यंत पाळला. असो. एका महत्वाच्या अनुभवाकडे वळू.

१९८६ च्या जून महिन्यात त्यांचा मुलगा राजू बी एस्सी झाला आणि त्याला एम एस्सी पी एच डी करायची इच्छा होती. पण सांसारिक जबाबदारीमुळे कोटूरकरांना ते शक्य नव्हते. महाराज जेव्हां माटुंग्याला आले तेव्हां कोटूरकरांनी त्यांना भेटून हे सर्व सांगितले. महाराज एवढेच म्हणाले, तो शिकतोय ना शिकू द्या. सर्व कांही गुरुमहाराजांवर सोडून तुम्ही स्वस्थ राहा आणि पहा काय होते ते.

महाराजांनी कितीही सांगितले तरी प्रत्यक्ष परिस्थिती डोळयासमोर असल्याने निश्चिंत राहाणे अवघड होते. महाराजांनी कांही चमत्कारच केला तरच हे शक्य होते. आणि अघटित तरी काय घडणार ? पैसे कसे उभे राहाणार ? विचार करुन थकले. महाराजांनी सांगितल्याप्रमाणे साधनेत गुरुमहाराजांना प्रार्थना केल्यावर ते म्हणाले, ''दत्तमहाराजांच्या शब्दावर विश्वास टेवून निश्चिंत राहा''

नंतर दोन दिवसांनी राजूच्या कॉलेजमधल्या एक प्रोफेसरबाई कोटूरकरांकडे सकाळी ६ वा आल्या आणि त्यांनी येण्याचे कारण

सांगितले ते ऐकून कोटूरकर चाटच पडले. त्या म्हणाल्या, काल रात्री मी माझ्या अभ्यासिकेत वाचत बसले होते. तिथे कोणीच नव्हते अचानक थोडा वेळाने मला आवाज ऐकू आला ''गरजू विद्यार्थ्याला मदत करावी'' प्रथम मला वाटलं मला भास होतोय पण तो आवाज पुन्हा पुन्हा येत राहिला. शेवटी बराच वेळ झाल्यावर मी वैतागून विचारले, कोण गरजू विद्यार्थी आणि मी कोणाला मदत करु ?''

तेव्हां माझ्या अभ्यासिकेत एक वृद्ध तेजस्वी व्यक्ति प्रगट झाली. त्यांनी सांगितले ''अहो, आपला राजू नाही का ! त्याला मदत करा''आणि ते अदृष्य झाले. म्हणून मी कांही रक्कम घेऊन आले आहे ती घ्या नाही तर ते गृहस्थ मला स्वस्थ बसू देणार नाहीत. कोटूरकरांनी त्या प्रोफेसरबाईंना स्पष्ट सांगितले की त्यांचे पैसे घेणे सोपे आहे पण परत कसे करणार ? त्यांची ऐपत नाही परत करण्याची.

तेव्हां त्या म्हणाल्या, ते मी व राजू बघून घेऊ. आत्ता त्याच्या शिक्षणात खंड पडू नये म्हणून तुम्ही हे पैसे टेवून घ्या.

कोटूरकर अवाकच झाले. त्यांनी पैसे स्वीकारले.

या धक्क्यातून सावरण्यापूर्वीच आणखी एक धक्का बसला. एक दोन दिवसातच त्यांच्याकडे त्यांचे एक परिचित येऊन म्हणाले, त्यांनी त्यांच्या मुलांच्या शिक्षणाकरता कांही पैसे बाजूला टेवले होते. त्या

मुलांना कांही शिक्षणात रस नाही उगीच ते पैसे इकडे तिकडे जाण्यापेक्षा कोटूरकरांनी त्यांच्या राजूच्या शिक्षणाकरता वापरावेत. परतफेडीचे नंतर पाहू. वगैरे

तीसरा धक्का आणखी मोटा होता. एका गृहस्थाची पत्रिका पाहून त्याला उपाय सांगितल्यावर तो म्हणाला त्याला कोटूरकरांच्या मुलाकरता आर्थिक मदत करायची इच्छा आहे आणि ती कोटूरकरांनी स्वीकारावी. एवढेच नव्हे तर राजूला अमेरिकेत जायचे असेल तर तो स्पॉन्सर करायला तयार आहे.

आता मात्र कोटूरकर चक्कर येऊन पडणारच होते. ते महाराजांकडे आले आणि आपल्या अश्रुंनी कृतज्ञतेने महाराजांच्या चरणावर अभिषेक केला. त्या वेळी सौ ताईमहाराजही उपस्थित होत्या.

अमानित्वाने परिपूर्ण भरलेले महाराज स्वतःकडे कशाला श्रेय घेतील ? ते म्हणाले, कोटूरकर, राजूच्या नशिबात शिक्षणाचा योग होता. तुमचे पूर्व संचित पुण्य आणि गुरुमहाराजांच्या कृपेने हे सर्व घडले.

ॐ ॐ ॐ ॐ ॐ ॐ

क्र ष्ठ ष्ट ट्ट ष्ठ स्र ड्ड द्र द्ध ड्ढ ठ दृ ह्र ञ

क्र क्र क्र ष्ठ ष्ट ट्ट ष्ठ स्र ड्ड द्र द्ध ड्ढ ठ दृ ह्र ञ फ

ट्ट ह्र छ्र ष्ठ ठ द्र द्ध ड्ढ स्र ॐ ड्ड ड्ड ड्ड ट्ट

ट्ट ह्र छ्र ष्ठ ठ द्र द्ध ड्ढ स्र ॐ ड्ड ड्ड ड्ड ट्ट